
# इतिहास व राज्यशास्त्र

## इयत्ता दहावी



शासन निर्णय क्रमांक : अभ्यास-२११६/(प्र.क्र.४३/१६) एसडी-४ दिनांक २५.४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दिनांक २९.१२.२०१७ रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

# इतिहास व राज्यशास्त्र

## इयत्ता दहावी

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

29N3VK

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA App द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q.R. Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक व प्रत्येक पाठामध्ये असलेल्या Q.R.Code द्वारे त्या पाठासंबंधित अध्ययन-अध्यापनासाठी उपयुक्त दृक्-श्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : २०१८

© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४११ ००४.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे या पुस्तकाचे सर्व हक्क राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

**इतिहास विषय समिती**

डॉ. सदानंद मोरे, अध्यक्ष
श्री. मोहन शेटे, सदस्य
श्री. पांडुरंग बलकवडे, सदस्य
डॉ. शुभांगना अत्रे, सदस्य
डॉ. सोमनाथ रोडे, सदस्य
श्री. बापूसाहेब शिंदे, सदस्य
श्री. बाळकृष्ण चोपडे, सदस्य
श्री. प्रशांत सरूडकर, सदस्य
श्री. मोगल जाधव, सदस्य-सचिव

**नागरिकशास्त्र विषय समिती**

डॉ. श्रीकांत परांजपे, अध्यक्ष
प्रा. साधना कुलकर्णी, सदस्य
डॉ. प्रकाश पवार, सदस्य
प्रा. अजिंक्य गायकवाड, सदस्य
प्रा. संगिता आहेर, सदस्य
डॉ. मोहन काशीकर, सदस्य
श्री. वैजनाथ काळे, सदस्य
श्री. मोगल जाधव, सदस्य-सचिव

**इतिहास व नागरिकशास्त्र अभ्यास गट**

श्री. राहुल प्रभू
श्री. संजय वझरेकर
श्री. सुभाष राठोड
सौ. सुनीता दळवी
प्रा. शिवानी लिमये
श्री. भाऊसाहेब उमाटे
डॉ. नागनाथ येवले
श्री. सदानंद डोंगरे
श्री. रवींद्र पाटील
सौ. रूपाली गिरकर
डॉ. मिनाक्षी उपाध्याय
डॉ. रावसाहेब शेळके
डॉ. सतीश चापले
श्री. विशाल कुलकर्णी
प्रा. शेखर पाटील
श्री. रामदास ठाकर
डॉ. अजित आपटे
डॉ. मोहन खडसे
सौ. शिवकन्या कदेरकर
श्री. गौतम डांगे
डॉ. व्यंकटेश खरात
श्री. रविंद्र जिंदे
डॉ. प्रभाकर लोंढे
डॉ. मंजिरी भालेराव
प्रा. शशि निघोजकर

**लेखक**

**इतिहास**

डॉ. शुभांगना अत्रे
डॉ. गणेश राऊत

**राज्यशास्त्र**

डॉ. वैभवी पळसुले

**मुखपृष्ठ व सजावट**

श्री. देवदत्त प्रकाश बलकवडे

**अक्षरजुळणी**

मुद्रा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे

**कागद**

७० जी.एस.एम.क्रिमवोव्ह

**मुद्रणादेश**

N/PB/2018-19/QTY.- 50,000

**मुद्रक**

M/s. VIJAYALAXMI CREATIONS, NAGPUR

**संयोजक**

श्री. मोगल जाधव
विशेषाधिकारी, इतिहास व नागरिकशास्त्र
सौ. वर्षा सरोदे
विषय सहायक, इतिहास व नागरिकशास्त्र
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

**निर्मिती**

श्री. सच्चितानंद आफळे,
मुख्य निर्मिती अधिकारी
श्री. प्रभाकर परब,
निर्मिती अधिकारी
श्री. शशांक कणिकदळे,
सहायक निर्मिती अधिकारी

**प्रकाशक**

श्री. विवेक उत्तम गोसावी, नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई-२५.

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## राष्ट्रगीत

जनगणमन–अधिनायक जय हे
भारत–भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत–भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

विद्यार्थी मित्रांनो,

इयत्ता तिसरी ते पाचवीपर्यंत इतिहास व नागरिकशास्त्र विषयाचे अध्ययन तुम्ही 'परिसर अभ्यास'मध्ये केले आहे. इयत्ता सहावीपासून अभ्यासक्रमात इतिहास व नागरिकशास्त्र हे स्वतंत्र विषय आहेत. इयत्ता सहावीपासून या दोन्ही विषयांचा समावेश एकाच पाठ्यपुस्तकात करण्यात आला आहे. इयत्ता दहावीचे पाठ्यपुस्तक तुमच्या हाती देताना आम्हांला आनंद वाटतो.

पाठ्यपुस्तकाची रचना विषय नीट समजावा, मनोरंजक वाटावा, या हेतूने केलेली आहे. या पाठ्यपुस्तकाच्या अभ्यासाने ज्ञानाबरोबरच तुम्हांला आनंद मिळावा असे आम्हांला वाटते. त्यासाठी पाठ्यपुस्तकात रंगीत चित्रे दिलेली आहेत. पाठ्यपुस्तकातील प्रत्येक पाठ लक्षपूर्वक अभ्यासावा. त्यातील जो भाग तुम्हांला समजणार नाही तो भाग शिक्षक, पालक यांच्याकडून समजावून घ्यावा. दिलेल्या चौकटींतील मजकूर तुमच्या ज्ञानात भरच घालेल ! अधिक माहितीसाठी 'ॲप'च्या माध्यमातून क्यू.आर.कोडद्‌वारे प्रत्येक पाठासंबंधी उपयुक्त दृक्‌-श्राव्य साहित्य आपणांस उपलब्ध होईल. त्याचा अध्ययनासाठी निश्चितच उपयोग होईल. इतिहास हा विषय रंजक असून तो आपला मित्र आहे, असे समजून हे पुस्तक अभ्यासले तर तुम्हांला त्याची गोडी निश्चितपणे लागेल.

इतिहासाच्या भागात 'उपयोजित इतिहास' दिलेला आहे. इतिहास हा एक कुतुहलाचा विषय आणि छंद म्हणून अनेकांच्या आवडीचा असतो. परंतु तो शालेय अभ्यासक्रमात खरोखरीच किती आवश्यक आहे, यावर विशेष लक्ष केंद्रित केल्यास पुढील आयुष्यात विद्यार्थ्यांना कोणत्या प्रकारच्या व्यावसायिक संधी उपलब्ध होऊ शकतील, त्यांनी अंगीकारलेल्या व्यवसायात त्यांना त्या विषयाच्या अभ्यासाचा काही विशेष लाभ होईल का, यासंबंधी अनेकांच्या मनात साशंकता असते. आवश्यक माहिती उपलब्ध नसल्यामुळे ही साशंकता दूर करणे कठीण जाते. ती माहिती या पाठ्यपुस्तकाद्‌वारे 'इतिहास' या विषयात उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. रोजच्या जीवनातील कोणतीही गोष्ट असो, व्यवसायाचे कोणतेही क्षेत्र असो, त्या त्या गोष्टींचा, त्या त्या व्यावसायिक क्षेत्रांच्या विकासाचा स्वतःचा इतिहास असतो. त्या इतिहासाच्या ज्ञानाचा व्यवसायातील कौशल्यवाढीसाठी उपयोग होतो, ही बाब या पाठ्यपुस्तकात स्पष्ट केलेली आहे.

राज्यशास्त्राच्या भागात 'भारतीय संविधानाची वाटचाल' याविषयी माहिती देण्यात आली आहे. यामध्ये निवडणूक प्रक्रियेची माहिती, राष्ट्रीय व प्रादेशिक पातळीवरील प्रमुख राजकीय पक्ष, त्यांची भूमिका, लोकशाहीला सक्षम करणाऱ्या सामाजिक व राजकीय चळवळी तसेच भारतीय लोकशाहीसमोरील आव्हाने यांबाबत चर्चा केलेली आहे. या वर्गातील विद्यार्थी लवकरच मतदार होणार आहेत. या नव्या भूमिकेसाठी विद्यार्थ्यांना सक्षम करण्यासाठी पाठ्यपुस्तकातील आशय उपयुक्त आहे.



**(डॉ.सुनिल मगर)**
संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

पुणे
दिनांक : १८ मार्च २०१८, गुढीपाडवा
भारतीय सौर दिनांक : २७ फाल्गुन १९३९

# – शिक्षकांसाठी –

'इतिहास' हा एक कुतुहलाचा विषय आणि छंद म्हणून अनेकांच्या आवडीचा असतो. परंतु तो शालेय अभ्यासक्रमात खरोखरीच किती आवश्यक आहे, त्यावर विशेष लक्ष केंद्रित केल्यास पुढील आयुष्यात मुलांना कोणत्या प्रकारच्या व्यावसायिक संधी उपलब्ध होऊ शकतील किंवा त्यांनी अंगीकारलेल्या व्यवसायात त्यांना त्या विषयाच्या अभ्यासाचा काही विशेष लाभ होईल का, यासंबंधी बहुतेकांच्या मनात साशंकता असते. आवश्यक माहिती उपलब्ध नसल्यामुळे ही साशंकता दूर करणे कठीण भासते. ती माहिती या पाठ्यपुस्तकाद्‌वारे उपलब्ध करून देण्यात आली आहे.

इतिहासाची अभ्यासपद्‌धती आणि इतिहासलेखन म्हणजे काय, तसेच इतिहासलेखनाचा इतिहास या गोष्टींची माहिती विद्यार्थ्यांना आतापर्यंत फक्त महाविद्यालयीन आणि विद्यापीठीय पातळीवरच करून दिली जात असे. शालेय अभ्यासक्रमात त्याचा समावेश केला गेला नव्हता. त्यामुळे इतिहासाची शास्त्रशुद्‌ध पद्‌धती म्हणजे काय, याबद्‌दल विद्यार्थ्यांच्या मनात संभ्रम निर्माण होण्याची शक्यता विचारात घेऊन, या पाठ्यपुस्तकात इतिहासलेखन या विषयावर पहिल्या दोन पाठांत सुलभ पद्‌धतीने थोडक्यात माहिती दिलेली आहे.

फक्त विविध राजसत्ता आणि त्यांच्यामधील युद्धे तसेच थोर योद्ध्यांच्या पराक्रमाच्या कथा एवढ्यापुरताच इतिहास मर्यादित नसतो, या गोष्टीची जाणीव शालेय विद्यार्थ्यांना इतिहासाच्या पाठ्यपुस्तकांमधून वेळोवेळी करून देण्यात आलेली आहे. तरीही या गोष्टींच्या पलीकडचा इतिहास म्हणजे नेमके काय आणि इतिहासाचा वर्तमानाशी प्रत्यक्ष संबंध कसा असतो, याचे आकलन करून घेण्याची संधी शालेय विद्यार्थ्यांना प्राप्त होत नव्हती, ही बाब विशेषत्वाने डोळ्यांसमोर ठेवून दहावीच्या अभ्यासक्रमाची आखणी केली गेली. या पाठ्यपुस्तकातील पाठांची आखणीही त्या अनुषंगाने केलेली आहे.

वास्तविक पाहता इतिहासाचे रोजच्या व्यावहारिक जीवनाशी अत्यंत घट्ट नाते आहे. ते स्पष्ट करणारी 'उपयोजित इतिहास' किंवा 'जनांसाठी इतिहास' ही नवीन ज्ञानशाखा गेल्या काही दशकांमध्ये विकसित होऊ लागलेली आहे. परदेशांमधील विद्यापीठांमधून या विषयाचे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. या पाठ्यपुस्तकात या नवीन विषयाची माहिती करून देण्याबरोबरच विविध व्यवसायांतील मूल्यवर्धित सेवांसाठी इतिहासाच्या सखोल अभ्यासाची तसेच असा अभ्यास असणाऱ्या जाणकार इतिहासकारांची आवश्यकता कशी भासते, तेही सांगितले आहे. त्यासाठीचे अभ्यासक्रम आणि ते अभ्यासक्रम जिथे उपलब्ध आहेत अशा संस्थांची माहिती करून दिलेली आहे.

रोजच्या जीवनातील कोणतीही गोष्ट असो, व्यवसायाचे कोणतेही क्षेत्र असो, त्या त्या गोष्टीचा, त्या त्या व्यावसायिक क्षेत्राच्या विकासाचा स्वतःचा इतिहास असतो आणि त्या इतिहासाच्या ज्ञानाचा व्यवसायातील कौशल्यवृद्‌धीसाठी उपयोग होतो, ही बाब या पाठ्यपुस्तकात स्पष्ट केलेली आहे.

महाविद्यालयीन प्रवेशाच्या उंबरठ्यावर उभे असलेल्या दहावीच्या विद्यार्थ्यास पदवी मिळवण्यासाठी आणि पुढील आयुष्यातील प्रगतीसाठी अनुकूल व्यवसाय निवडता यावा म्हणून योग्य दिशा कशी ठरवायची याबद्‌दल अनेक प्रश्न असतात. विशेषतः इतिहास विषयामध्ये प्रावीण्य मिळवण्याची इच्छा असणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर मार्गदर्शन देणारी पुस्तके अभावानेच उपलब्ध आहेत. या पाठ्यपुस्तकाद्‌वारे ती त्रुटी भरून काढण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यासाठी उपयुक्त माहितीबरोबर रंजक माहिती आणि संयुक्तिक चित्रे यांचाही समावेश करण्यात आला आहे.

शालेय पातळीवरील नागरिकशास्त्र आणि राज्यशास्त्र विषयाच्या अभ्यासक्रमात सामाजिक-राजकीय परिसराची ओळख इथपासून ते आंतरराष्ट्रीय संबंध आणि आपल्या देशातील राजकीय प्रक्रियांचे स्वरूप इतका व्यापक आशय समाविष्ट केला आहे. या आशयाची अध्ययन उद्‌दिष्टे आपण अध्यापनातून साध्य करालच, पण त्याचबरोबर इयत्ता दहावीत मात्र वर्गातील आंतरक्रिया माहितीवजा असू नयेत. त्या दैनंदिन घटना व घडामोडींशी जोडल्या जाव्यात. भारतीय लोकशाहीसमोर आव्हाने नक्कीच आहेत, परंतु लोकशाही बळकट करणाऱ्या परंपराही मोठ्या प्रमाणावर निर्माण झाल्या आहेत. त्याचे वस्तुनिष्ठ विवेचन चर्चा, संवाद याद्‌वारे होऊ शकेल. छोट्या गटांमधून विद्यार्थ्यांना अभिव्यक्त होण्यास संधी असावी.

पाठ्यपुस्तकातील आशयाची मांडणी विद्यार्थ्यांमध्ये नवे काही तरी शिकण्याची उर्मी निर्माण करणारी आहे. त्याला शिक्षक व पालक पूर्ण पाठिंबा देतील, यात शंका नाही.

## क्षमता विधाने

| क्र. | घटक | क्षमता |
|---|---|---|
| १. | प्राचीन ते आधुनिक कालखंडातील इतिहासाचे चिकित्सक समालोचन | • इतिहासलेखनाची परंपरा स्पष्ट करणे.<br>• इतिहासलेखनाचे शास्त्र विकसित होण्यात अनेक पाश्चात्त्य विचारवंतांचा हातभार लागला हे जाणून घेणे.<br>• भारतीय इतिहासातील विविध कालखंडाचा चिकित्सक, तुलनात्मक अभ्यास करता येणे.<br>• भारतात तसेच जगात झालेल्या ऐतिहासिक संशोधनाची माहिती मिळवता येणे.<br>• इतिहास हा शास्त्रशुद्ध अभ्यासविषय आहे हे सांगता येणे. |
| २. | उपयोजित इतिहास | • उपयोजित इतिहासाची संकल्पना सांगता येणे.<br>• इतिहासाचे विविध विषयात व जीवनात होणारे उपयोजन समजून घेणे व आचरणात आणणे.<br>• ऐतिहासिक घटनांचे समकालीनत्व ओळखता येणे.<br>• ऐतिहासिक लेखनातील विविध विचार प्रवाहांची ओळख करून घेणे. |
| ३. | प्रसारमाध्यमे आणि इतिहास | • विविध प्रसारमाध्यमे व इतिहास यांच्यातील सहसंबंध ओळखता येणे.<br>• विविध प्रसारमाध्यमातील माहितीच्या आधारे तटस्थपणे स्वतःचा ऐतिहासिक दृष्टिकोन विकसित करता येणे.<br>• संबंधित व्यवसायातील व्यावसायिक क्षेत्रांची माहिती मिळवणे. |
| ४. | मनोरंजनाची माध्यमे आणि इतिहास | • मनोरंजनाची आवश्यकता स्पष्ट करता येणे.<br>• मनोरंजनाची माध्यमे व इतिहास यांच्यातील परस्पर संबंधांचे विश्लेषण करता येणे.<br>• मनोरंजनाच्या माध्यमांत होणारे बदल जाणून घेणे. |
| ५. | कला, क्रीडा व साहित्य क्षेत्र आणि इतिहास | • भारतातील विविध कलांची माहिती सांगता येणे.<br>• भारतीयांच्या वेगवेगळ्या खेळातील कामगिरीविषयी अभिमान बाळगणे व त्यातून प्रेरणा घेणे.<br>• कला, क्रीडा व साहित्य क्षेत्रांतील विविध घटकांची माहिती सांगणे.<br>• कला, क्रीडा व साहित्य यांचे ऐतिहासिक उपयोजन सांगता येणे. |
| ६. | पर्यटन आणि इतिहास | • पर्यटन क्षेत्रासाठी इतिहासाचा उपयोग होऊ शकतो हे जाणणे.<br>• आपल्या देशातील पर्यटनाच्या संधी सांगता येणे.<br>• पर्यटन अनेकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देते हे जाणणे.<br>• इतिहास आणि पर्यटन यांचा सहसंबंध समजून घेणे. |
| ७. | इतिहास व अन्य क्षेत्रे | • इतिहासाच्या अभ्यासातील संग्रहालयांचे/ग्रंथालयांचे महत्त्व सांगता येणे.<br>• इतिहासाच्या अभ्यासातून वस्तुनिष्ठ विश्लेषण करता येते ही भावना विकसित करणे.<br>• इतिहासाचा अन्य अभ्यासक्षेत्रांशी समन्वय साधणे. |

# अनुक्रमणिका

## उपयोजित इतिहास


| क्र. | पाठाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | इतिहासलेखन : पाश्चात्त्य परंपरा | १ |
| २. | इतिहासलेखन : भारतीय परंपरा | ७ |
| ३. | उपयोजित इतिहास | १५ |
| ४. | भारतीय कलांचा इतिहास | २२ |
| ५. | प्रसारमाध्यमे आणि इतिहास | ३२ |
| ६. | मनोरंजनाची माध्यमे आणि इतिहास | ३९ |
| ७. | खेळ आणि इतिहास | ४६ |
| ८. | पर्यटन आणि इतिहास | ५२ |
| ९. | ऐतिहासिक ठेव्यांचे जतन | ५९ |

# १. इतिहासलेखन : पाश्चात्त्य परंपरा

**१.१ इतिहासलेखनाची परंपरा**
**१.२ आधुनिक इतिहासलेखन**
**१.३ युरोपमधील वैज्ञानिक दृष्टिकोनाचा विकास आणि इतिहासलेखन**
**१.४ महत्त्वाचे विचारवंत**

गतकाळात घडून गेलेल्या घटनांची क्रमशः संगती लावून त्यांचे आकलन करून घेणे या उद्‌दिष्टाने इतिहासाचे संशोधन, लेखन आणि अभ्यास केला जातो. ही एक अखंडितपणे चालणारी प्रक्रिया असते.

वैज्ञानिक ज्ञानशाखांमध्ये उपलब्ध ज्ञानाची सत्यता पडताळून पाहण्यासाठी प्रायोगिक पद्‌धती आणि प्रत्यक्ष निरीक्षण यांचा अवलंब केला जातो. या पद्‌धतीच्या आधारे विविध घटनांच्या संदर्भातील सार्वकालिक आणि सार्वत्रिक नियम मांडणे आणि ते नियम पुन्हा पुन्हा सिद्‌ध करता येणे शक्य असते.

इतिहास संशोधनामध्ये प्रायोगिक पद्‌धती, प्रत्यक्ष निरीक्षण यांचा अवलंब करणे शक्य नसते कारण इतिहासातील घटना घडून गेलेल्या असतात, तेव्हा त्यांच्या निरीक्षणासाठी आपण तेथे नसतो व त्या घटनांची पुनरावृत्ती करता येत नाही. तसेच सार्वकालिक आणि सार्वत्रिक नियम मांडणे आणि ते नियम सिद्‌ध करता येणे शक्य नसते.

सर्वप्रथम ऐतिहासिक दस्तऐवज लिहिण्यासाठी ज्या भाषेचा आणि लिपीचा वापर केला गेला असेल, त्यांचे वाचन करण्यासाठी आणि त्याचा अर्थ समजण्यासाठी ती भाषा आणि लिपी जाणणाऱ्या तज्ज्ञाची आवश्यकता असते. त्यानंतर अक्षरवटिका म्हणजे अक्षराचे वळण, लेखकाची भाषाशैली, वापरलेल्या कागदाच्या निर्मितीचा काळ आणि कागदाचा प्रकार, अधिकारदर्शक मुद्रा यांसारख्या विविध गोष्टींचे जाणकार संबंधित दस्तऐवज अस्सल आहे की नाही, हे ठरवण्यास मदत करू शकतात. त्यानंतर इतिहासतज्ज्ञ ऐतिहासिक संदर्भाच्या तौलनिक विश्लेषणाच्या आधारे दस्तऐवजातील माहितीच्या विश्वासार्हतेची पडताळणी करू शकतात.

**इतिहास संशोधन पद्‌धती**



इतिहास संशोधनास साहाय्यभूत होणाऱ्या विविध ज्ञानशाखा व संस्था आहेत. उदा., पुरातत्त्व, अभिलेखागार, हस्तलिखितांचा अभ्यास, पुराभिलेख, अक्षरवटिकाशास्त्र, भाषारचनाशास्त्र, नाणकशास्त्र, वंशावळींचा अभ्यास, इत्यादी.

## १.१ इतिहासलेखनाची परंपरा

इतिहासात उपलब्ध पुराव्यांचे चिकित्सापूर्वक संशोधन करून, भूतकाळात घडून गेलेल्या घटनांची मांडणी कशी केली जाते, हे आपण पाहिले. अशी मांडणी करण्याच्या लेखनपद्धतीला इतिहासलेखन असे म्हणतात. अशा प्रकारे इतिहासाची चिकित्सापूर्वक मांडणी करणाऱ्या संशोधकाला इतिहासकार असे म्हटले जाते.

अर्थातच इतिहासाची मांडणी करताना भूतकाळात घडून गेलेल्या प्रत्येक घटनेची नोंद घेणे आणि तिचे ज्ञान करून देणे, इतिहासकाराला शक्य नसते. इतिहासाची मांडणी करताना इतिहासकार भूतकाळातल्या कोणत्या घटनांची निवड करतो, हे त्याला वाचकांपर्यंत काय पोचवायचे आहे यावर अवलंबून असते. निवडलेल्या घटना आणि त्यांची मांडणी करताना अवलंबलेला वैचारिक दृष्टिकोन या गोष्टी इतिहासकाराच्या लेखनाची शैली निश्चित करतात.

जगभरातील प्राचीन संस्कृतींमध्ये अशा प्रकारे इतिहासलेखन करण्याची परंपरा नव्हती. परंतु त्या लोकांना भूतकाळाची जाणीव किंवा जिज्ञासा नव्हती असे म्हणता येणार नाही. वडीलधाऱ्या व्यक्तींकडून ऐकलेल्या पूर्वजांच्या जीवनाच्या, पराक्रमाच्या गोष्टी पुढच्या पिढीपर्यंत पोचवण्याची आवश्यकता त्या काळीही भासत होती. गुहाचित्रांद्वारे स्मृतींचे जतन, कहाण्यांचे कथन, गीत आणि पोवाड्यांचे गायन यांसारख्या परंपरा जगभरातील संस्कृतींमध्ये अतिप्राचीन काळापासून अस्तित्वात होत्या. आधुनिक इतिहासलेखनात त्या परंपरांचा साधनांच्या स्वरूपात उपयोग केला जातो.

**माहीत आहे का तुम्हांला ?**



फ्रान्स येथील लुव्र या संग्रहालयातील सर्वाधिक प्राचीन शिलालेख

वरील चित्रात हातात ढाल आणि भाला घेतलेल्या सैनिकांची शिस्तबद्ध रांग आणि त्यांचे नेतृत्व करणारे सेनानी दिसत आहेत.

ऐतिहासिक घटनांच्या लिखित नोंदी करण्याच्या परंपरेची सुरुवात मेसोपेटोमियातील सुमेर संस्कृतीमध्ये झाली, असे सद्यपरिस्थितीत म्हणता येईल. सुमेर साम्राज्यात होऊन गेलेले राजे, त्यांच्यामधील संघर्षाच्या कहाण्या यांची वर्णने तत्कालीन शिलालेखांमध्ये जतन केलेली आहेत. त्यातील सर्वाधिक प्राचीन शिलालेख सुमारे ४५०० वर्षांपूर्वी सुमेरमधील दोन राज्यांमध्ये झालेल्या युद्धाची नोंद करणारा असून, तो सध्या फ्रान्समधील लुव्र या जगप्रसिद्ध संग्रहालयात ठेवलेला आहे.

## १.२ आधुनिक इतिहासलेखन

आधुनिक इतिहासलेखनाच्या पद्धतीची चार प्रमुख वैशिष्ट्ये सांगितली जातात :

(१) ही पद्धती शास्त्रशुद्ध आहे. तिची सुरुवात योग्य प्रश्नांची मांडणी करण्यापासून होते.

(२) हे प्रश्न मानवकेंद्रित असतात. म्हणजेच ते भूतकाळातील विविध मानवी समाजाच्या सदस्यांनी विशिष्ट कालावधीत केलेल्या कृतींसंबंधी असतात. इतिहासात त्या कृतींचा संबंध दैवी घटना किंवा

देवदेवतांच्या कथाकहाण्यांशी जोडण्याचा प्रयत्न केला जात नाही.

(३) या प्रश्नांच्या इतिहासातील उत्तरांना विश्वासार्ह पुराव्यांचा आधार असतो. त्यामुळे इतिहासाची मांडणी तर्कसुसंगत असते.

(४) मानवजातीने भूतकाळात केलेल्या कृतींच्या आधारे मानवजातीच्या वाटचालीचा वेध इतिहासात घेतला जातो.

वरील वैशिष्ट्यांनी युक्त असलेल्या आधुनिक इतिहासलेखनाच्या परंपरेची बीजे प्राचीन ग्रीक इतिहासकारांच्या लेखनात आढळतात, असे मानले जाते. 'हिस्टरी' हा शब्द ग्रीक भाषेतील आहे. इ.स.पू ५ व्या शतकात होऊन गेलेल्या हिरोडोटस या ग्रीक इतिहासकाराने तो प्रथम त्याच्या 'द हिस्टरिज्' या ग्रंथाच्या शीर्षकासाठी वापरला.

## १.३ युरोपमधील वैज्ञानिक दृष्टिकोनाचा विकास आणि इतिहासलेखन

इसवी सनाच्या अठराव्या शतकाच्या काळापर्यंत युरोपमध्ये तत्वज्ञान आणि विज्ञान या क्षेत्रांमध्ये लक्षणीय प्रगती झाली. वैज्ञानिक पद्धतीचा उपयोग करून सामाजिक आणि ऐतिहासिक वास्तवांचाही अभ्यास करता येणे शक्य आहे, असा विश्वास विचारवंतांना वाटू लागला होता. पुढील काळात युरोप-अमेरिकेमध्ये इतिहास आणि इतिहासलेखन या विषयांसंबंधी खूप विचारमंथन झाले; इतिहासलेखनामध्ये वस्तुनिष्ठतेला महत्व येत गेले.

अठराव्या शतकाच्या आधी युरोपमधील विद्यापीठांमध्ये सर्वत्र ईश्वरविषयक चर्चा आणि तत्संबंधीचे तत्वज्ञान या विषयांनाच अधिक महत्व दिले गेले होते. परंतु हे चित्र हळूहळू बदलू लागले. इसवी सन १७३७ मध्ये जर्मनीमधील गॉटिंगेन विद्यापीठाची स्थापना झाली. या विद्यापीठात प्रथमच इतिहास या विषयाला स्वतंत्र स्थान प्राप्त झाले. त्या पाठोपाठ जर्मनीमधील इतर विद्यापीठेही इतिहासाच्या अभ्यासाची केंद्रे बनली.

## १.४ महत्वाचे विचारवंत


इतिहासलेखनाचे शास्त्र विकसित होण्यात अनेक विचारवंतांचा हातभार लागला. त्यांतील काही महत्वाच्या विचारवंतांची माहिती घेऊया.

**रेने देकार्त (१५९६ – १६५०) :** इतिहासलेखनासाठी वापरल्या जाणाऱ्या ऐतिहासिक साधनांची विशेषतः कागदपत्रांची विश्वासार्हता तपासून घेणे आवश्यक आहे, असे मत आग्रहाने मांडले जात होते. त्यामध्ये रेने देकार्त हा फ्रेंच तत्वज्ञ अग्रभागी होता. त्याने लिहिलेल्या 'डिस्कोर्स ऑन द मेथड' या ग्रंथातील एक नियम शास्त्रशुद्ध संशोधनाच्या दृष्टीने फारच महत्वाचा मानला जातो. 'एखादी गोष्ट सत्य आहे असे निःसंशयरित्या प्रस्थापित होत नाही तोपर्यंत तिचा स्वीकार कदापि करू नये' हा तो नियम होय.



रेने देकार्त

**व्हॉल्टेअर (१६९४-१७७८) :** व्हॉल्टेअरचे मूळ नाव फ्रान्स्वा मरी अरूए असे होते. व्हॉल्टेअर या फ्रेंच तत्वज्ञाने इतिहासलेखनासाठी केवळ वस्तुनिष्ठ सत्य आणि घटनांचा कालक्रम एवढ्यावरच लक्ष केंद्रित न करता तत्कालीन समाजाच्या परंपरा, व्यापार, आर्थिक व्यवस्था, शेती इत्यादी गोष्टींचा विचार करणे आवश्यक आहे, हा विचार मांडला. त्यामुळे इतिहासाची मांडणी करताना मानवी जीवनाचा सर्वांगीण विचार व्हायला हवा, हा विचार पुढे आला. त्या दृष्टीने व्हॉल्टेअर आधुनिक इतिहासलेखनाचा जनक होता असे म्हणता येईल.



व्हॉल्टेअर

**जॉर्ज विल्हेम फ्रेडरिक हेगेल (१७७०-१८३१) :** या जर्मन तत्वज्ञाने ऐतिहासिक वास्तव तर्कशुद्ध



जॉर्ज विल्हेम फ्रेडरिक हेगेल

पद्धतीने मांडले गेले पाहिजे यावर भर दिला. इतिहासातील घटनाक्रम प्रगतीचे टप्पे दर्शवणारा असतो. त्याचबरोबर इतिहासाची मांडणी इतिहासकाराला वेळोवेळी उपलब्ध होत असलेल्या पुराव्यांनुसार बदलत जाणे स्वाभाविक असते, असे प्रतिपादन त्याने केले. त्याच्या विवेचनामुळे इतिहासाच्या अभ्यासपद्धती विज्ञानाच्या पद्धतींपेक्षा वेगळ्या असल्या तरी त्या कमी प्रतीच्या नाहीत, अशी अनेक तत्त्वज्ञांची खात्री पटली. 'एनसायक्लोपिडिया ऑफ फिलॉसॉफिकल सायन्सेस' या ग्रंथामध्ये त्याची व्याख्याने आणि लेख यांचे संकलन आहे. हेगेलने लिहिलेले 'रिझन इन हिस्टरी' हे पुस्तक प्रसिद्ध आहे.

**जाणून घ्या.**


हेगेलच्या मते कोणत्याही घटनेचा अर्थ लावण्यासाठी तिची वर्गवारी दोन विरोधी प्रकारांत करावी लागते. त्याशिवाय मानवी मनाला त्या घटनेचे आकलन होत नाही. उदाहरणार्थ; खरे-खोटे, चांगले-वाईट. या पद्धतीला 'द्वंद्ववाद' (डायलेक्टिक्स्) असे म्हटले जाते. या पद्धतीत प्रथम एक सिद्धान्त मांडला जातो. त्यानंतर त्या सिद्धान्ताला छेद देणारा प्रतिसिद्धान्त मांडला जातो. त्या दोन्ही सिद्धान्तांच्या तर्काधिष्ठित ऊहापोहानंतर त्या दोहोंचे सार ज्यात सामावलेले आहे अशा सिद्धान्ताची समन्वयात्मक मांडणी केली जाते.

**लिओपॉल्ड व्हॉन रांके (१७९५-१८८६) :** एकोणिसाव्या शतकातील इतिहासलेखनाच्या पद्धतीवर प्रामुख्याने बर्लिन विद्यापीठातील लिओपॉल्ड व्हॉन रांके याच्या विचारांचा प्रभाव होता. त्याने इतिहास संशोधनाची चिकित्सक पद्धती कशी असावी ते सांगितले. मूळ दस्तऐवजांच्या आधारे प्राप्त झालेली माहिती ही सर्वाधिक महत्त्वाची आहे, यावर त्याने भर दिला. तसेच ऐतिहासिक घटनांशी संबंधित असलेल्या सर्व प्रकारची कागदपत्रे आणि दस्तऐवज यांचा कसून शोध घेणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्याने सांगितले. अशा पद्धतीने ऐतिहासिक सत्यापर्यंत पोचता येणे शक्य आहे, असा विश्वास त्याने व्यक्त केला. इतिहासलेखनातील काल्पनिकतेवर त्याने टीका केली. त्याने जागतिक इतिहासाच्या मांडणीवर भर दिला. 'द थिअरी अँड प्रॅक्टिस ऑफ हिस्टरी' आणि 'द सिक्रेट ऑफ वर्ल्ड हिस्टरी' या ग्रंथांमध्ये त्याच्या विविध लेखांचे संकलन आहे.



लिओपॉल्ड व्हॉन रांके

**कार्ल मार्क्स (१८१८-१८८३) :** एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात कार्ल मार्क्स याने मांडलेल्या सिद्धान्तांमुळे इतिहासाच्या दृष्टिकोनात महत्त्वाचा बदल घडवून आणणारी वैचारिक प्रणाली अस्तित्वात आली. इतिहास अमूर्त कल्पनांचा नसून जिवंत माणसांचा असतो. माणसामाणसांमधील नातेसंबंध त्यांच्या मूलभूत गरजा भागवण्यासाठी उपलब्ध असलेल्या उत्पादन साधनांच्या स्वरूपावर व मालकीवर अवलंबून असतात. समाजातील वेगवेगळ्या घटकांना ही साधने समप्रमाणात उपलब्ध होत नाहीत. त्यातून समाजाची वर्गावर आधारित विषम विभागणी होऊन वर्गसंघर्ष निर्माण होतो. मानवी इतिहास अशा



कार्ल मार्क्स

वर्गसंघर्षाचा इतिहास असून ज्या वर्गाच्या ताब्यात उत्पादन साधने असतात तो इतर वर्गांचे आर्थिक शोषण करतो, अशी मांडणी त्याने केली. त्याचा 'दास कॅपिटल' हा ग्रंथ जगप्रसिद्ध आहे.

**ॲनल्स प्रणाली :** विसाव्या शतकाच्या सुरुवातीस फ्रान्समध्ये ॲनल्स नावाने ओळखली जाणारी इतिहासलेखनाची प्रणाली उदयाला आली. ॲनल्स प्रणालीमुळे इतिहासलेखनाला एक वेगळीच दिशा मिळाली. इतिहासाचा अभ्यास फक्त राजकीय घडामोडी, राजे, महान नेते आणि त्या अनुषंगाने राजकारण, मुत्सद्देगिरी, युद्धे यांच्यावर केंद्रित न करता तत्कालीन हवामान, स्थानिक लोक, शेती, व्यापार, तंत्रज्ञान, दळणवळण, संपर्काची साधने, सामाजिक विभागणी आणि समूहाची मानसिकता यांसारख्या विषयांचा अभ्यास करणेही महत्वाचे मानले जाऊ लागले. ॲनल्स प्रणाली सुरू करण्याचे आणि तिचा विकास करण्याचे श्रेय फ्रेंच इतिहासकारांना दिले जाते.

### स्त्रीवादी इतिहासलेखन

स्त्रीवादी इतिहासलेखन म्हणजे स्त्रियांच्या दृष्टिकोनातून केलेली इतिहासाची पुनर्रचना. सीमॉं-द-बोव्हा या फ्रेंच विदुषीने स्त्रीवादाची मूलभूत भूमिका सिद्ध केली. स्त्रीवादी इतिहासलेखनामध्ये स्त्रियांचा अंतर्भाव करण्याबरोबर इतिहासलेखनाच्या क्षेत्रातील पुरुषप्रधान दृष्टिकोनाचा पुनर्विचार करण्यावर भर दिला गेला. त्यानंतर स्त्रियांच्या आयुष्याशी निगडित नोकरी, रोजगार, ट्रेड युनियन, त्यांच्यासाठी काम करणाऱ्या संस्था, स्त्रियांचे कौटुंबिक आयुष्य यांसारख्या विविध पैलूंचा सविस्तर विचार करणारे संशाधेन सुरू झाले. १९९० नंतर 'स्त्री' हा एक स्वतंत्र सामाजिक वर्ग मानून इतिहास लिहिण्यावर भर दिला गेलेला दिसतो.

**मायकेल फुको (१९२६-१९८४) :** विसाव्या शतकातील फ्रेंच इतिहासकार मायकेल फुको याच्या लिखाणातून इतिहासलेखनाची एक नवी संकल्पना पुढे आली. त्याच्या 'आर्केऑलॉजी ऑफ नॉलेज' या ग्रंथामध्ये त्याने इतिहासाची कालक्रमानुसार अखंड मांडणी करण्याची पद्धत चुकीची आहे, असे प्रतिपादन केले. पुरातत्वामध्ये अंतिम सत्यापर्यंत पोचणे हे उद्दिष्ट नसून भूतकाळातील स्थित्यंतरांचे स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न असतो याकडे त्याने लक्ष वेधले. फुको याने इतिहासातील स्थित्यंतरांचे स्पष्टीकरण देण्यावर भर दिला. म्हणून त्याने या पद्धतीला ज्ञानाचे पुरातत्व असे म्हटले.


मायकेल फुको

इतिहासकारांनी पूर्वी विचारात न घेतलेल्या मनोविकृती, वैद्यकशास्त्र, तुरुंगव्यवस्था यांसारख्या विषयांचा त्याने इतिहासाच्या दृष्टीतून विचार केला.

आधुनिक इतिहासलेखनाची व्याप्ती अशा रीतीने सतत विस्तारत गेली. साहित्य, स्थापत्य, शिल्पकला, चित्रकला, संगीतकला, नृत्यकला, नाट्यकला, चित्रपटनिर्मिती, दूरदर्शन यांसारख्या विविध विषयांचे स्वतंत्र इतिहास लिहिले जाऊ लागले.

## स्वाध्याय

**१. (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

(१) आधुनिक इतिहास लेखनाचा जनक .......... यास म्हणता येईल.
(अ) व्हॉल्टेअर (ब) रेने देकार्त
(क) लिओपोल्ड रांके (ड) कार्ल मार्क्स

(२) आर्केऑलॉजी ऑफ नॉलेज हा ग्रंथ ......... याने लिहिला.
(अ) कार्ल मार्क्स (ब) मायकेल फुको
(क) लुसिआँ फेबर (ड) व्हॉल्टेअर

**(ब) पुढीलपैकी चुकीची जोडी दुरुस्त करून पुन्हा लिहा.**

(१) जॉर्ज विल्हेम फ्रेडरिक हेगेल – रिझन इन हिस्टरी
(२) लिओपॉल्ड व्हॉन रांके – द थिअरी ॲण्ड प्रॅक्टिस ऑफ हिस्टरी
(३) हिरोडोटस – द हिस्टरीज्
(४) कार्ल मार्क्स – डिसकोर्स ऑन द मेथड

**२. पुढील संकल्पना स्पष्ट करा.**

(१) द्‌वंद्‌ववाद (२) ॲनल्स प्रणाली


**३. पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

(१) स्त्रियांच्या आयुष्याशी निगडित विविध पैलूंवर विचार करणारे संशोधन सुरू झाले.
(२) फुको यांच्या लेखनपद्‌धतीला ज्ञानाचे पुरातत्व म्हटले आहे.

**४. पुढील प्रश्नांची २५ ते ३० शब्दांत उत्तरे लिहा.**

(१) इतिहासलेखन म्हणजे काय ?
(२) रेने देकार्त यांनी इतिहासलेखनात कोणत्या मताचा आग्रह धरला ?
(३) व्हॉल्टेअर यांना आधुनिक इतिहासलेखनाचे जनक असे का म्हटले जाते ?

**५. पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा.**




**६. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

(१) कार्ल मार्क्स यांचा वर्गसिद्‌धान्त स्पष्ट करा.
(२) आधुनिक इतिहासलेखन पद्‌धतीची चार वैशिष्ट्ये कोणती ?
(३) स्त्रीवादी इतिहासलेखन म्हणजे काय ?
(४) लिओपॉल्ड व्हॉन रांके यांचा इतिहासविषयक दृष्टिकोन स्पष्ट करा.

**उपक्रम**

तुम्हांला आवडणाऱ्या कोणत्याही एका विषयावर विस्तृत माहिती मिळवा व त्याचा इतिहास लिहा. उदा.,
* पेन (लेखणी)चा इतिहास
* मुद्रणकलेचा इतिहास
* संगणकाचा इतिहास

29HYX8

# २. इतिहासलेखन : भारतीय परंपरा

२.१ भारतीय इतिहासलेखनाची वाटचाल

२.२ भारतीय इतिहासलेख : विविध तात्त्विक प्रणाली

## २.१ भारतीय इतिहासलेखनाची वाटचाल

इतिहासलेखनाच्या पाश्चात्त्य परंपरेची ओळख आपण पहिल्या पाठात करून घेतली. या पाठात आपण भारतीय इतिहासलेखनाच्या परंपरेबद्दल माहिती घेणार आहोत.

**प्राचीन काळातील इतिहासलेखन :** प्राचीन भारतामध्ये पूर्वजांचे पराक्रम, दैवतपरंपरा, सामाजिक स्थित्यंतरे इत्यादींच्या स्मृती केवळ मौखिक परंपरेने जपल्या जात होत्या.

हडप्पा संस्कृतीमध्ये मिळालेल्या प्राचीन लेखांच्या आधारे भारतामध्ये लेखनकला इसवी सनापूर्वी तिसऱ्या सहस्रकापासून किंवा त्याही पूर्वीपासून अस्तित्वात होती असे दिसते; परंतु हडप्पा संस्कृतीची लिपी वाचण्यात अजूनही यश मिळाले नाही.

भारतातील ऐतिहासिक स्वरूपाचे सर्वाधिक प्राचीन लिखित साहित्य हे कोरीव लेखांच्या स्वरूपातील आहे. त्यांची सुरुवात मौर्य सम्राट अशोकाच्या काळापासून म्हणजे इसवी सनापूर्वी तिसऱ्या शतकापासून होते. सम्राट अशोकाचे कोरीव लेख हे प्रस्तरांवर आणि दगडी स्तंभांवर कोरलेले आहेत.

इसवी सनाच्या पहिल्या शतकापासून धातूची नाणी, मूर्ती आणि शिल्पे, ताम्रपट इत्यादींवरील कोरीव लेख उपलब्ध होऊ लागतात. यांमधून महत्त्वाची ऐतिहासिक माहिती मिळते. या सर्व प्रकारच्या कोरीव लेखांमुळे संबंधित राजाचा काळ, वंशावळ, राज्यविस्तार, तत्कालीन शासनव्यवस्था, महत्त्वाच्या राजकीय घडामोडी, तत्कालीन सामाजिक रचना, हवामान, दुष्काळ यांसारख्या महत्त्वाच्या बाबींची माहिती मिळते.

**हे समजून घ्या.**



**सोहगौडा ताम्रपट :** हा ताम्रपट सोहगौडा (जिल्हा गोरखपूर, उत्तर प्रदेश) येथे सापडला. हा ताम्रपट मौर्य काळातील असावा असे मानले जाते. ताम्रपटावरील कोरीव लेख ब्राह्मी लीपीत आहे. लेखाच्या सुरुवातीस जी चिन्हे आहेत त्यातील पारासहित असलेला वृक्ष तसेच पर्वत (एकावर एक असलेल्या तीन कमानी) ही चिन्हे प्राचीन आहत नाण्यांवरही आढळतात. चार खांबांवर उभे असलेले दुमजली इमारतीप्रमाणे दिसणारे चिन्ह कोठारघरांचे निदर्शक असावेत, असे अभ्यासकांचे मत आहे. या कोठारघरांमधील धान्य जपून वापरण्यात यावे, असा आदेश त्या लेखात दिलेला आहे. दुष्काळजन्य परिस्थितीचे निवारण करण्यासाठी काय काळजी घ्यावी, या संदर्भातील हा आदेश असावा, असे मानले जाते.

प्राचीन भारतीय साहित्यामध्ये रामायण, महाभारत ही महाकाव्ये, पुराणे, जैन आणि बौद्ध ग्रंथ, धर्मग्रंथांखेरीज भारतीय ग्रंथकारांनी लिहिलेले ऐतिहासिक स्वरूपाचे साहित्य तसेच परकीय प्रवाशांची

प्रवासवर्णने ही इतिहासलेखनाची महत्वाची साधने मानली जातात.

प्राचीन काळातील राजांची चरित्रे तसेच राजघराण्यांचे इतिहास सांगणारे लेखन हे भारतीय इतिहासलेखनाच्या वाटचालीतील महत्वाचे टप्पे आहेत. इसवी सनाच्या सातव्या शतकात बाणभट्ट या कवीने लिहिलेले 'हर्षचरित' हे संस्कृत काव्य ऐतिहासिक चरित्रग्रंथाच्या स्वरूपाचे आहे. त्यामध्ये तत्कालीन सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक आणि सांस्कृतिक जीवनाचे वास्तववादी चित्रण केलेले आहे.

**मध्ययुगीन काळातील इतिहासलेखन :** इसवी सनाच्या १२व्या शतकात कल्हण याने लिहिलेला 'राजतरंगिणी' हा काश्मीरच्या इतिहासावरील ग्रंथ आहे. इतिहासलेखन शास्त्रशुद्ध कसे असावे, याच्या आधुनिक संकल्पनेशी हा ग्रंथ जवळचे नाते सांगतो. त्यामध्ये अनेक कोरीव लेख, नाणी, प्राचीन वास्तूंचे अवशेष, राजकुलांच्या अधिकृत नोंदी आणि स्थानिक परंपरा अशा अनेक साधनांचा चिकित्सक अभ्यास करून आपण हा ग्रंथ रचला, असा उल्लेख कल्हणाने केला आहे.

मध्ययुगीन भारतामध्ये मुस्लीम राज्यकर्त्यांच्या दरबारातील इतिहासकारांच्या लेखनावर अरबी आणि फारसी इतिहासलेखनाच्या परंपरेचा प्रभाव असलेला दिसतो. मध्ययुगीन मुस्लीम इतिहासकारांमध्ये झियाउद्दीन बरनी हा एक महत्वाचा इतिहासकार होता. 'तारीख-इ-फिरुजशाही' या त्याच्या ग्रंथात त्याने इतिहासलेखनाचा हेतू स्पष्ट केला आहे. त्याच्या मते इतिहासकाराचे कर्तव्य फक्त राज्यकर्त्यांच्या पराक्रमाचे आणि कल्याणकारी धोरणांचे वर्णन करून संपत नाही तर त्यांच्या दोषांचे आणि चुकीच्या धोरणांचे चिकित्सक विवेचनही त्याने करायला हवे. एवढेच नव्हे तर संबंधित काळातील विद्‍वान व्यक्ती, अभ्यासक, साहित्यिक आणि संत यांचा सांस्कृतिक जीवनातील प्रभावही लक्षात घ्यायला हवा. बरनीच्या या विचारसरणीमुळे इतिहासलेखनाची व्याप्ती अधिक विस्तारली.



**माहीत आहे का तुम्हांला ?**

अल्बेरूनीने विविध ज्ञानशाखांमध्ये भारतीयांनी केलेली कामगिरी आणि भारतातील समाजजीवन यासंबंधीची माहिती अरेबिक भाषेमध्ये लिहून ठेवली. पुढील काळात अनेक परदेशी इतिहासकारांनी भारताविषयी माहिती देणारे ग्रंथ लिहिले. त्यातील हसन निजामी लिखित ताजुल-मासिर, मिन्हाज-इ-सिराज लिखित तबाकत-इ-नासिरी, अमीर खुस्रो याचे विपुल लेखन, तुझुक-इ-तिमुरी हे तैमूरलंग याचे आत्मचरित्र, याह्या बिन अहमद सरहिंदी लिखित तारीख-इ-मुबारकशाही यांसारखे ग्रंथ महत्वाचे आहेत. त्यांच्या लेखनातून आपल्याला भारतातील मध्ययुगीन कालखंडासंबंधी महत्वाची माहिती मिळते.

परदेशी प्रवाशांनी लिहून ठेवलेले वृत्तांतही भारताच्या इतिहासाची महत्वाची साधने आहेत. इब्न बतूता, अब्दुल रझ्झाक, मार्को पोलो, निकोलो कॉन्ती, बार्बोसा आणि डॉमिंगोस पेस हे त्यांपैकी होत. त्यांच्या लेखनातून मध्ययुगीन भारतासंबंधीची ऐतिहासिक माहिती मिळते. ईश्वरदास नागर, भीमसेन सक्सेना, खाफी खान आणि निकोलाय मनुची हे बादशाह औरंगजेबच्या काळातील इतिहासकार होते. मुघल काळातील इतिहास समजून घेण्यासाठी त्यांचे लेखन अत्यंत महत्वाचे आहे.

मुघल बादशहांच्या दरबारातील इतिहासकारांच्या लेखनात राज्यकर्त्यांची स्तुती आणि त्यांच्याबद्‍दलची निष्ठा या पैलूंना विशेष महत्त्व प्राप्त झाले. त्याखेरीज त्यांच्या वर्णनात समर्पक पद्य उतारे आणि सुंदर चित्रांचा अंतर्भाव करण्याची पद्‍धतही सुरू झालेली दिसते. मुघल साम्राज्याचा संस्थापक बाबर याचे आत्मचरित्र 'तुझुक-इ-बाबरी'मध्ये त्याला कराव्या लागलेल्या युद्‍धांची वर्णने आहेत. त्याच्या बरोबरीने त्याने प्रवास केलेल्या प्रदेशांची आणि शहरांची वर्णने, तेथील स्थानिक अर्थव्यवस्था आणि रीतीरिवाज, वनस्पतीसृष्टी यांची बारकाईने केलेली निरीक्षणे यांचाही समावेश आहे.

इतिहासलेखनाच्या चिकित्सक पद्‍धतीच्या दृष्टीने अबुल फजल याने लिहिलेल्या 'अकबरनामा'

या ग्रंथाचे विशेष महत्त्व आहे. अधिकृत नोंदीच्या आधारे ऐतिहासिक कागदपत्रांचे काळजीपूर्वक केलेले संकलन आणि त्यातील माहितीच्या विश्वासार्हतेची कसून केलेली छाननी ही अबुल फजलने अवलंबलेली संशोधनपद्धती पूर्वग्रहविरहित आणि वास्तववादी होती असे मानले जाते.


'बखर' हा ऐतिहासिक साहित्यातील एक महत्त्वाचा प्रकार आहे. शूरवीरांचे गुणगान, ऐतिहासिक घडामोडी, लढाया, थोर पुरुषांची चरित्रे यांविषयीचे लेखन आपणांस बखरीत वाचायला मिळते.

मराठी भाषेत विविध प्रकारच्या बखरी उपलब्ध आहेत. यांतील एक महत्त्वाची बखर 'सभासद बखर' होय. छत्रपती राजाराम महाराजांच्या कारकिर्दीत कृष्णाजी अनंत सभासद यांनी सदर बखर लिहिली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीची माहिती यातून मिळते.

'भाऊसाहेबांची बखर' या बखरीत पानिपतच्या लढाईचे वर्णन आहे. याच विषयावर आधारित 'पानिपतची बखर' अशीही स्वतंत्र बखर आहे. 'होळकरांची कैफियत' या बखरीतून आपणांस होळकरांचे घराणे आणि त्यांचे योगदान समजते.

बखरींचे चरित्रात्मक, वंशानुचरित्रात्मक, प्रसंग वर्णनात्मक, पंथीय, आत्मचरित्रपर, कैफियत, पौराणिक आणि राजनीतिपर असे प्रकार आहेत.

**आधुनिक काळातील इतिहासलेखन आणि ब्रिटिश इतिहासकाळ :** विसाव्या शतकात ब्रिटिशांच्या राजवटीत भारतीय पुरातत्त्वाच्या अभ्यासास सुरुवात झाली. भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण खात्याचे पहिले सरसंचालक अलेक्झांडर कनिंगहॅमच्या देखरेखीखाली अनेक प्राचीन स्थळांचे उत्खनन केले गेले. त्यासाठी त्यांनी प्रामुख्याने बौद्ध ग्रंथामध्ये उल्लेख असलेल्या स्थळांवर लक्ष केंद्रित केले. पुढे जॉन मार्शल याच्या कारकिर्दीत हडप्पा संस्कृतीचा शोध लागला आणि भारतीय संस्कृतीचा इतिहास इसवी सनापूर्वी तिसऱ्या सहस्रकापर्यंत किंवा त्याहूनही पूर्वीपर्यंत जाऊ शकतो


अलेक्झांडर कनिंगहॅम


जॉन मार्शल

हे सिद्ध झाले.

भारतात आलेल्या अनेक ब्रिटिश अधिकाऱ्यांनी भारतीय इतिहासासंबंधी लेखन केले. त्यांनी केलेल्या लेखनावर ब्रिटिशांच्या वसाहतवादी धोरणाचा प्रभाव असलेला दिसतो.

जेम्स मिल याने लिहिलेल्या 'द हिस्टरी ऑफ ब्रिटिश इंडिया' या ग्रंथाचे तीन खंड १८१७ साली प्रसिद्ध झाले. ब्रिटिश इतिहासकाराने भारतीय इतिहासावर लिहिलेला हा पहिला ग्रंथ. त्याच्या लेखनात वस्तुनिष्ठ दृष्टिकोनाचा अभाव आणि भारतीय संस्कृतीच्या विविध पैलूंसंबंधीचा पूर्वग्रहदूषित दृष्टिकोन स्पष्टपणे उमटलेला दिसतो.


जेम्स मिल

सन १८४१ मध्ये माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन यांनी 'द हिस्टरी ऑफ इंडिया' हा ग्रंथ लिहिला. माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन हे मुंबईचे गव्हर्नर (१८१९-१८२७) होते.

भारताच्या इतिहासामध्ये मराठी साम्राज्याच्या कालखंडाचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. मराठी साम्राज्याचा इतिहास लिहिणाऱ्या ब्रिटिश अधिकाऱ्यांमध्ये जेम्स ग्रँट डफ याचे नाव महत्त्वाचे आहे. त्याने 'ए हिस्टरी ऑफ द मराठाज्' हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथाचे तीन खंड आहेत. भारतीय संस्कृती आणि इतिहास यांना कमी लेखण्याची

ब्रिटिश अधिकाऱ्यांची प्रवृत्ती ग्रँट डफ याच्या लेखनातही उमटलेली दिसते. अशीच प्रवृत्ती राजस्थानचा इतिहास लिहिताना कर्नल टॉडसारख्या अधिकाऱ्याच्या लेखनात आढळते. विल्यम विल्सन हंटर याने हिंदुस्थानचा द्विखंडात्मक इतिहास लिहिला. त्यामध्ये त्याची निःपक्षपाती वृत्ती दिसते.

डफ याच्या इतिहासलेखनाच्या मर्यादा नीलकंठ जनार्दन कीर्तने आणि वि. का. राजवाडे यांनी एकोणिसाव्या शतकात दाखवून दिल्या.

## २.२ भारतीय इतिहासलेखन : विविध तात्त्विक प्रणाली

**वसाहतवादी इतिहासलेखन :** भारतीय इतिहासाचा अभ्यास आणि लेखन करणाऱ्या सुरुवातीच्या इतिहासकारांमध्ये प्रामुख्याने ब्रिटिश अधिकारी तसेच ख्रिश्चन धर्मप्रसारकांचा अंतर्भाव होता. भारतीय संस्कृती गौण दर्जाची आहे, या पूर्वग्रहाचे प्रतिबिंब त्यांच्यामधील काहींच्या लेखनात स्पष्टपणे उमटलेले दिसते. वसाहतवादी ब्रिटिश सत्तेच्या समर्थनासाठी त्यांच्या इतिहासलेखनाचा वापर केला गेला. १९२२ ते १९३७ च्या दरम्यान प्रसिद्ध झालेले 'केंब्रिज हिस्टरी ऑफ इंडिया' या ग्रंथाचे पाच खंड हे वसाहतवादी इतिहासलेखनाचे ठळक उदाहरण आहे.


**प्राच्यवादी इतिहासलेखन :** युरोपमधील अभ्यासकांमध्ये पूर्वेकडील संस्कृती आणि देश यांच्याबद्दल कुतूहल जागृत झालेले होते. त्याबद्दल आदर, कौतुक असलेले काही अभ्यासक त्यांच्यामध्ये होते. त्यांना प्राच्यवादी म्हटले जाते.

प्राच्यवादी अभ्यासकांनी संस्कृत आणि युरोपीय भाषांमधील साधर्म्याचा अभ्यास केला. वैदिक वाङ्मय आणि संस्कृत साहित्याचा अभ्यास करण्यावर प्राच्यवादी विद्वानांचा भर होता. त्यातून या भाषांची जननी असणारी एक प्राचीन इंडो-युरोपीय भाषा होती, अशी कल्पना मांडली गेली.

इसवी सन १७८४ मध्ये सर विल्यम जोन्स यांनी कोलकाता येथे एशियाटिक सोसायटीची स्थापना केली. त्याद्वारे प्राचीन भारतीय वाङ्मय आणि इतिहास यांच्या अभ्यासास चालना मिळाली.


विल्यम जोन्स

प्राच्यवादी अभ्यासकांमध्ये फ्रेडरिक मॅक्समुलर या जर्मन अभ्यासकाचा प्रामुख्याने उल्लेख करायला हवा. त्याच्या दृष्टीने संस्कृत भाषा ही इंडो-युरोपीय भाषागटातील अतिप्राचीन शाखा होती. संस्कृत साहित्यात त्याला विशेष रस होता. त्याने 'हितोपदेश' या संस्कृत ग्रंथाचा जर्मन भाषेत अनुवाद केला. तसेच 'द सेक्रेड बुक्स ऑफ द ईस्ट' या नावाने ५० खंड संपादित केले. त्याने ऋग्वेदाचे संकलन करण्याचे काम केले. ते सहा खंडांमध्ये प्रसिद्ध झाले आहे. त्याने ऋग्वेदाचा जर्मन भाषेत अनुवाद केला होता.


फ्रेडरिक मॅक्सम्युलर

अलीकडच्या काळात प्राच्यविद्यावंतांच्या लेखनामागील छुपे साम्राज्यवादी हितसंबंध प्रकाशात आणण्याचे काम एडवर्ड सैद या विद्वानाने केले.

**राष्ट्रवादी इतिहासलेखन :** एकोणिसाव्या-विसाव्या शतकामध्ये इंग्रजी शिक्षणपद्धतीमध्ये शिकून तयार झालेल्या भारतीय इतिहासकारांच्या लेखनामध्ये भारताच्या प्राचीन वैभवाचा अभिमान आणि भारतीयांची आत्मजाणीव जागृत करण्याकडे असलेला कल दिसतो. त्यांच्या लेखनास राष्ट्रवादी इतिहासलेखन असे म्हटले जाते. महाराष्ट्रातील राष्ट्रवादी इतिहास लेखनास विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्यापासून प्रेरणा मिळाली. ब्रिटिश अधिकाऱ्यांनी लिहिलेल्या प्राचीन भारताच्या पूर्वग्रहदूषित इतिहासाला त्यांनी विरोध केला. अशा प्रकारे राष्ट्रवादी लेखन करणाऱ्या इतिहासकारांनी भारताच्या इतिहासातील सुवर्णकाळ शोधण्याचा प्रयत्न केला. असे करत असताना प्रसंगी

ऐतिहासिक वास्तवाची चिकित्सापूर्वक छाननी करण्याकडे दुर्लक्ष केले गेले, असा आक्षेपही त्यांच्यावर घेतला जातो. महादेव गोविंद रानडे, रामकृष्ण गोपाळ भांडारकर, विनायक दामोदर सावरकर, राजेंद्रलाल मिश्र, रमेशचंद्र मजुमदार, काशीप्रसाद जयस्वाल, राधाकुमुद मुखर्जी, भगवानलाल इंद्रजी, वासुदेव विष्णु मिराशी, अनंत सदाशिव आळतेकर ही काही राष्ट्रवादी इतिहासकारांची नावे उदाहरणादाखल देता येतील.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

'द राईज ऑफ द मराठा पॉवर' या ग्रंथात न्या.महादेव गोविंद रानडे यांनी मराठा सत्तेच्या उदयाची पार्श्वभूमी विस्ताराने मांडली. मराठी सत्तेचा उदय म्हणजे अचानक पेटलेला वणवा नसून त्याची सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक क्षेत्रांतील तयारी बराच काळ महाराष्ट्रात चालू होती, हे त्यांनी प्रतिपादले.

इतिहासलेखन, भाषाशास्त्र, व्युत्पत्ती, व्याकरण अशा अनेक विषयांवर मूलभूत संशोधन करणारे आणि मराठी भाषेतून लेखन करणारे इतिहासकार म्हणून राजवाडे परिचित आहेत. आपला इतिहास आपण लिहिला पाहिजे, याचा पुरस्कार त्यांनी केला. 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' असे शीर्षक असणारे २२ खंड त्यांनी संपादित केले. त्यांतील त्यांच्या प्रस्तावना अत्यंत अभ्यासपूर्ण आहेत. ''इतिहास म्हणजे भूतकालीन समाजाचे सर्वांगीण समग्र जीवनदर्शन. केवळ राजकीय घडामोडी, सत्तांतरासाठी कटकारस्थाने आणि युद्धे यांच्याच हकिकती नव्हेत'', असे त्यांचे मत होते. अस्सल कागदपत्रांच्याच आधारे इतिहास लिहिला पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता.



वि. का. राजवाडे

**माहीत आहे का तुम्हांला ?**

इतिहास संशोधनाच्या कार्यासाठी वि.का.राजवाडे यांनी पुण्यात ७ जुलै १९१० रोजी भारत इतिहास संशोधक मंडळ स्थापन केले.

''मानवी इतिहास काल व स्थल यांनी बद्‌ध झालेला आहे. कोणत्याही प्रसंगाचे वर्णन द्यायचे म्हटले म्हणजे त्या प्रसंगाचा परिष्कार* विशिष्ट कालावर व विशिष्ट स्थलावर पसरवून दाखवला पाहिजे.

काल, स्थल व व्यक्ती या त्रयीची जी सांगड तिलाच प्रसंग वा ऐतिहासिक प्रसंग ही संज्ञा देता येते.''

*(अंतिम चित्रण)

**– वि.का.राजवाडे**

भारतीयांनी ब्रिटिशांविरुद्‌ध दिलेल्या स्वातंत्र्यलढ्याला प्रेरणा देण्यासाठी राष्ट्रवादी इतिहासलेखनाचा उपयोग झाला. त्यामध्ये स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकरांनी लिहिलेले 'द इंडियन वॉर ऑफ इन्डिपेन्डन्स 1857' (१८५७ चे 'स्वातंत्र्यसमर') या पुस्तकाचे विशेष महत्त्व आहे.



स्वातंत्र्यवीर सावरकर

राष्ट्रवादी इतिहासलेखनाच्या प्रभावामुळे प्रादेशिक इतिहास लिहिण्यालाही चालना मिळाली. दक्षिण भारताच्या भौगोलिक वैशिष्ट्यांकडे आणि इतिहासाकडे इतिहासकारांचे स्वतंत्रपणे लक्ष वेधले गेले.

**स्वातंत्र्योत्तर काळातील इतिहासलेखन :** एकीकडे राजघराण्यांच्या इतिहासावर भर देणारे इतिहासलेखन केले जात असतानाच सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक इतिहासही लिहिण्यास सुरुवात

झाली होती. स्वातंत्र्योत्तर काळात समाज, विज्ञान, अर्थव्यवस्था, राजकीय प्रणाली, धार्मिक विचारसरणी, सांस्कृतिक पैलू यांचा इतिहास अभ्यासण्याची आवश्यकता विचारवंतांना वाटू लागली. या काळातील इतिहासलेखनात प्रामुख्याने तीन नवे वैचारिक प्रवाह आढळतात. (१) मार्क्सवादी इतिहास (२) वंचितांचा (सबऑल्टर्न) इतिहास (३) स्त्रीवादी इतिहास.

**मार्क्सवादी इतिहास :** मार्क्सवादी इतिहासकारांच्या लेखनात आर्थिक व्यवस्थेतील उत्पादनाची साधने, पद्धती आणि उत्पादनाच्या प्रक्रियेतील मानवी संबंध यांचा विचार मध्यवर्ती होता. प्रत्येक सामाजिक घटनेचा सर्वसामान्य लोकांवर काय परिणाम होतो याचे विश्लेषण करणे हे मार्क्सवादी इतिहासलेखनाचे महत्त्वाचे सूत्र होते.


मार्क्सवादी इतिहासकारांनी जातिव्यवस्थेत होत गेलेल्या बदलांचा अभ्यास केला. भारतामध्ये मार्क्सवादी इतिहासलेखन पद्धतीचा अवलंब प्रभावी रीतीने करणाऱ्या इतिहासकारांमध्ये दामोदर धर्मानंद कोसंबी, कॉम्रेड श्रीपाद अमृत डांगे, रामशरण शर्मा, कॉम्रेड शरद पाटील इत्यादींचे योगदान महत्त्वाचे आहे. डांगे हे भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या संस्थापक सदस्यांपैकी एक होते. त्यांचे 'प्रिमिटिव्ह कम्युनिझम टु स्लेव्हरी' हे पुस्तक मार्क्सवादी इतिहासलेखनाचे उदाहरण आहे.


दामोदर कोसंबी

**वंचितांचा (सबऑल्टर्न) इतिहास :** वंचित समूहांचा इतिहास लिहिण्याची सुरुवात मार्क्सवादी इतिहासलेखनाच्या परंपरेतूनच झाली, असे म्हणता येईल. इतिहासलेखनाची सुरुवात समाजाच्या तळाशी असलेल्या सर्वसामान्य लोकांच्या स्तरापासून करायला पाहिजे, ही कल्पना मांडण्यामध्ये अँटोनिओ ग्रामची या इटालियन तत्त्वज्ञाचे स्थान महत्त्वाचे आहे.

वंचितांचा इतिहास लिहिण्यासाठी लोकपरंपरा हे एक महत्त्वाचे साधन मानले गेले आहे. वंचितांच्या इतिहासाला एक महत्त्वाची विचारसरणी म्हणून स्थान मिळवून देण्याचे महत्त्वाचे कार्य रणजित गुहा या भारतीय इतिहासकाराने केले. परंतु त्यापूर्वीच भारतामध्ये वंचितांच्या इतिहासाचा विचार महात्मा जोतीराव फुले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या लेखनातून दिसतो.

महात्मा फुले यांनी 'गुलामगिरी' या पुस्तकात शूद्रातिशूद्रांचा इतिहास नव्याने उलगडून दाखवला. धर्माच्या नावाखाली स्त्रिया, शूद्र व अतिशूद्र यांच्या होणाऱ्या शोषणाकडे लक्ष वेधले.


महात्मा जोतीराव फुले

भारताच्या सांस्कृतिक आणि राजकीय घडणीत दलित वर्गाचा मोठा वाटा आहे. भारताच्या वसाहतवादी आणि राष्ट्रवादी इतिहासलेखनात त्याकडे दुर्लक्ष केले गेले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी ही गोष्ट केंद्रस्थानी ठेवून सतत लेखन केले. त्यांनी केलेल्या विपुल लेखनापैकी 'हू वेअर द शूद्राज' आणि 'द अनटचेबल्स्' हे ग्रंथ वंचितांच्या इतिहासाचे उदाहरण म्हणून सांगता येतील.


डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**स्त्रीवादी इतिहास :** भारतीय इतिहासलेखनाच्या क्षेत्रात सुरुवातीस प्रामुख्याने पुरुष अभ्यासक कार्यरत असल्यामुळे भारतीय इतिहासातील स्त्रियांचे स्थान आणि त्यांची कामगिरी हा विषय तुलनेने दुर्लक्षित राहिला होता. त्यावर अधिक प्रकाश टाकणे हे स्त्रीवादी इतिहासकारांपुढे पहिले आव्हान होते. तसेच स्त्रियांनी निर्मिलेल्या साहित्याचे संशोधन आणि संकलन करणेही आवश्यक होते. इतिहासातील स्त्रियांच्या स्थानाचा विचार नव्याने होणे आवश्यक होते.

एकोणिसाव्या शतकात स्त्रियांविषयी लेखन करणाऱ्या लेखिकांमध्ये ताराबाई शिंदे यांचे नाव अग्रणी आहे. त्यांनी पुरुषप्रधान व्यवस्था आणि जातिव्यवस्था यांना विरोध करणारे लेखन केले. सन १८८२ मध्ये प्रसिद्ध झालेले 'स्त्रीपुरुष तुलना' हे त्यांचे पुस्तक भारतातील पहिले स्त्रीवादी लेखन समजले जाते. सन १८८८ मध्ये पंडिता रमाबाई यांचे 'द हाय कास्ट हिंदु वुमन' हे पुस्तक प्रसिद्ध झाले.



ताराबाई शिंदे

स्वातंत्र्योत्तर काळात झालेले लेखन स्त्रियांना घरी आणि कामाच्या ठिकाणी मिळणारी वागणूक, त्यांचा राजकीय समतेचा हक्क यांसारख्या विषयांवर केंद्रित झालेले दिसते. अलीकडच्या काळात प्रसिद्ध झालेल्या स्त्रीवादी लेखनात मीरा कोसंबी यांच्या 'क्रॉसिंग थ्रेशोल्डस् : फेमिनिस्ट एस्सेज इन सोशल हिस्टरी' या पुस्तकाचा उल्लेख करता येईल. त्यात महाराष्ट्रातील पंडिता रमाबाई, भारतातील पहिल्या कार्यरत स्त्री डॉक्टर रखमाबाई यांसारख्या स्त्रियांच्या जीवनावरील निबंध आहेत. महाराष्ट्रामध्ये दलित स्त्रियांच्या दृष्टिकोनातून सामाजिक वर्ग, जात इत्यादी बाबींच्या संदर्भात लेखन केले गेले. त्यामध्ये शर्मिला रेगे यांचे लेखन महत्त्वाचे आहे. 'रायटिंग कास्ट, रायटिंग जेंडर : रिडिंग दलित वुमेन्स् टेस्टिमोनीज' यामध्ये दलित स्त्रियांच्या आत्मचरित्रावर त्यांनी लिहिलेल्या निबंधांचे संकलन आहे.

विशिष्ट विचारप्रणालीचा आश्रय न करता इतिहास लिहिणाऱ्यांमध्ये सर यदुनाथ सरकार, सुरेंद्रनाथ सेन, रियासतकार गो.स.सरदेसाई, त्र्यंबक शंकर शेजवलकर यांचा नामोल्लेख करावा लागतो.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

गोविंद सखाराम सरदेसाई यांनी 'मराठी रियासत' प्रकाशित करून मराठी इतिहासलेखन क्षेत्रात मोठी कामगिरी केली. त्यांचे हे कार्य इतके लोकप्रिय झाले, की समाज त्यांना 'रियासतकार' या नावाने ओळखू लागला. त्यांनी मराठ्यांचा समग्र इतिहास अनेक खंडांत प्रकाशित केला आहे.

अलीकडच्या काळात य.दि.फडके, रामचंद्र गुहा इत्यादी संशोधकांनी आधुनिक इतिहासलेखनात महत्त्वाची कामगिरी बजावली आहे.

भारतीय इतिहासलेखनावर भारतात उदयाला आलेल्या सामाजिक आणि राजकीय चळवळींचा प्रभाव होता. त्यांच्या बरोबरीने भारतीय इतिहासलेखनाची परंपरा स्वतंत्रपणे आणि समृद्धरित्या विकसित होत गेलेली दिसते.

## स्वाध्याय

**१. (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

(१) भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण खात्याचे पहिले सरसंचालक ........... हे होत.
(अ) अलेक्झांडर कनिंगहॅम
(ब) विल्यम जोन्स
(क) जॉन मार्शल
(ड) फ्रेडरिक मॅक्सम्युलर

(२) हितोपदेश या संस्कृत ग्रंथाचा जर्मन भाषेत अनुवाद .......... यांनी केला.
(अ) जेम्स मिल
(ब) फ्रेडरिक मॅक्सम्युलर
(क) माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन
(ड) जॉन मार्शल

(ब) पुढीलपैकी चुकीची जोडी दुरुस्त करून पुन्हा लिहा.

(१) हू वेअर द शूद्राज – वंचितांचा इतिहास

(२) स्त्रीपुरुष तुलना – स्त्रीवादी लेखन

(३) द इंडियन वॉर ऑफ इन्डिपेन्डन्स 1857 – मार्क्सवादी इतिहास

(४) ग्रँड डफ – वसाहतवादी इतिहास

२. पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.

(१) प्रादेशिक इतिहासलेखनाला चालना मिळाली.

(२) बखर हा ऐतिहासिक साहित्यातील महत्त्वाचा प्रकार आहे.

३. पुढील प्रश्नांची २५ ते ३० शब्दांत उत्तरे लिहा.

(१) मुघल सम्राट बाबर याच्या आत्मचरित्रात कोणत्या बाबींचा समावेश आहे ?

(२) राष्ट्रवादी इतिहासलेखनात स्वातंत्र्यवीर सावरकरांचे योगदान कोणते ?

४. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.


(१) मार्क्सवादी इतिहासलेखन म्हणजे काय ?

(२) इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांचे इतिहास लेखनातील योगदान स्पष्ट करा.

५. (अ) पुढील तक्ता पूर्ण करा.

| | |
|---|---|
| जेम्स मिल | द हिस्टरी ऑफ ब्रिटिश इंडिया |
| जेम्स ग्रँड डफ | ............................ |
| ................. | द हिस्टरी ऑफ इंडिया |
| श्री.अ.डांगे | ............................ |
| ................. | हू वेअर द शूद्राज |

(ब) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा.




६. पुढील संकल्पना स्पष्ट करा.

(१) प्राच्यवादी इतिहासलेखन

(२) राष्ट्रवादी इतिहासलेखन

(३) वंचितांचा इतिहास

**उपक्रम**

पाठात उल्लेख केलेल्या विविध इतिहासकारांच्या कार्याची माहिती देणारे सचित्र हस्तलिखित आंतरजालाच्या साहाय्याने तयार करा.

2A6UYV

# ३. उपयोजित इतिहास

३.१ उपयोजित इतिहास म्हणजे काय ?
३.२ उपयोजित इतिहास आणि विविध विषयांमधील संशोधन
३.३ उपयोजित इतिहास आणि वर्तमानकाळ
३.४ सांस्कृतिक आणि नैसर्गिक वारशाचे व्यवस्थापन
३.५ संबंधित व्यावसायिक क्षेत्रे

## ३.१ उपयोजित इतिहास म्हणजे काय ?

'उपयोजित इतिहास' या संज्ञेसाठी 'जनांसाठी इतिहास' (पब्लिक हिस्टरी) असा पर्यायी शब्दप्रयोग प्रचारात आहे. भूतकाळातील घटनांसंबंधींचे जे ज्ञान इतिहासाद्‌वारे प्राप्त होते, त्याचा उपयोग वर्तमान आणि भविष्यकाळात सर्व लोकांना कसा होईल,

**जाणून घ्या.**

**जनांसाठी इतिहास :** इतिहासाविषयी लोकांच्या मनात अनेक गैरसमज असतात. उदा., इतिहास हा विषय फक्त इतिहासकारांसाठी आणि इतिहास विषयाचा अभ्यास करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी असतो, दैनंदिन जीवनात इतिहासासारख्या विषयाचा काही उपयोग नसतो, इतिहासासारखा विषय आर्थिकदृष्ट्या उत्पादक क्षेत्रांशी जोडला जाऊ शकत नाही, इत्यादी.

अशा गैरसमजांवर मात करत इतिहासाची नाळ लोकांच्या वर्तमानातील जीवनसरणीशी जोडणारे क्षेत्र म्हणजे 'जनांसाठी इतिहास'.

परदेशातील अनेक विद्यापीठांमध्ये जनांसाठी इतिहास या विषयातील अभ्यासक्रम शिकवले जातात. भारतात बंगळुरू येथे 'सृष्टि इन्स्टिट्यूट ऑफ आर्ट डिझाईन अँड टेक्नॉलॉजी' या संस्थेत 'सेंटर फॉर पब्लिक हिस्टरी' हा स्वतंत्र विभाग आहे. तिथे या विषयातील प्रकल्प आणि संशोधनाचे काम चालते.

याचा विचार उपयोजित इतिहास या विषयाद्‌वारे केला जातो. वर्तमानातील सामाजिक आव्हानांवर उपाययोजना करणे, सामाजिक उपयुक्ततेचे निर्णय घेणे यांसारख्या गोष्टींसाठी पूर्वी होऊन गेलेल्या घटनांचे विश्लेषण दिशादर्शक ठरते. त्यासाठी इतिहासाचे ज्ञान आवश्यक असते.

उपयोजित इतिहासाच्या क्षेत्रात केवळ तज्ज्ञ व्यक्तींचाच नव्हे तर सर्वसामान्य लोकांचा विविध अंगांनी सहभाग असू शकतो. संग्रहालये, प्राचीन स्थळे यांना भेट देणारे पर्यटक या नात्याने त्यांचा सहभाग महत्त्वाचा असतो. पर्यटनामुळे लोकांमध्ये इतिहासासंबंधीची आवड वाढीस लागते. समाजमनामध्ये इतिहासाची जाणीव निर्माण होते. तसेच त्यांच्या स्वतःच्या शहरात किंवा गावात असणाऱ्या प्राचीन स्थळांच्या जतन आणि संवर्धनाच्या प्रकल्पांमध्येही ते सहभागी होऊ शकतात.

## ३.२ उपयोजित इतिहास आणि विविध विषयांमधील संशोधन

इतिहास भूतकाळात घडून गेलेल्या घटनांशी संबंधित असतो. वर्तमानात दिसणाऱ्या मानवी जीवनाची घडण ही त्या घटनांवरच आधारलेली असते. या घटना राजकारण, सामाजिक-धार्मिक संघटन, तत्वज्ञान, तंत्रज्ञान आणि विज्ञान यांसारख्या विविध क्षेत्रांमध्ये घडलेल्या असतात. प्रत्येक क्षेत्रातील ज्ञानसंचयाचा स्वतंत्र इतिहास असतो. त्या त्या क्षेत्रातील पुढील वाटचालीची दिशा या ज्ञानसंचयाच्या स्थितीवर अवलंबून असते. त्या अनुषंगाने अनेक विषयांच्या संशोधनात इतिहासाची संशोधनपद्‌धती उपयुक्त ठरते. उदाहरणार्थ,

**१. तत्वज्ञान :** विविध विचारसरणींचा उगम, त्यामागील वैचारिक परंपरा आणि त्या विचारसरणींच्या वाटचालीचा इतिहास समजून घेणे. यासाठी

तत्वज्ञानाचा इतिहास अभ्यासावा लागतो. तत्वज्ञान समजून घेताना ते तत्वज्ञान ज्या भाषेतून व्यक्त झाले त्या भाषेच्या इतिहासाचाही उपयोग होतो.

**२. विज्ञान :** वैज्ञानिक शोध आणि सिद्धान्त यांचा कालक्रम आणि त्या शोधांमागील कारणपरंपरेची साखळी समजावून घेणे. यासाठी विज्ञानाचा इतिहास अभ्यासावा लागतो. गरज ही शोधाची जननी असते, असे म्हटले जाते. अनेकदा वैज्ञानिक शोध हे मानवी गरजांची पूर्ती आणि जिज्ञासेचे समाधान करण्याच्या प्रयत्नातून लागलेले असतात. त्यासाठी आधी अस्तित्वात असलेल्या वैज्ञानिक ज्ञानाचा उपयोग केला जातो. या शोधांमागील कारणपरंपरा, कालक्रम समजून घेण्यासाठी विज्ञानाच्या इतिहासाचे ज्ञान उपयोगी पडते.

**३. तंत्रज्ञान :** कृषी उत्पादन, वस्तूंचे उत्पादन, स्थापत्य, अभियांत्रिकी इत्यादींमध्ये होत गेलेले बदल आणि त्यामागील कारणपरंपरेची साखळी समजावून घेणे. यासाठी तंत्रज्ञानाचा इतिहास अभ्यासावा लागतो. वैज्ञानिक शोध आणि तंत्रज्ञानातील प्रगती परस्परावलंबी असतात. मानवाच्या उत्क्रांतीच्या वाटचालीत दगडी हत्यारे घडवण्यापासून ते कृषीउत्पादनाच्या विकासापर्यंत त्याला समजलेले विज्ञान आणि त्यावर आधारलेले तंत्रज्ञान अत्यंत महत्वाचे होते. पुढे विज्ञानाच्या प्रगतीमुळे उत्पादन प्रक्रियांचे यांत्रिकीकरण होत गेले. ते कसे होत गेले, विज्ञान आणि तंत्रज्ञान कसे नेहमीच एकमेकांवर अवलंबून असतात, हे समजण्यासाठी तंत्रज्ञानाचा इतिहास समजावून घेणे आवश्यक असते.

**४. उद्योगधंदे आणि व्यापार :** उद्योगधंदे आणि व्यापार यांमुळे मानवी समाजांमधील परस्पर व्यवहाराचे क्षेत्र विस्तारते. त्यामुळे सांस्कृतिक संबंधांचे जाळेही सतत विकसत असते. उद्योगधंदे आणि व्यापाराच्या व्यवस्थापनाचाच हा एक भाग असतो. त्यांचा इतिहास समजावून घेणे महत्त्वाचे असते. बाजार आणि व्यापार यांचे स्वरूप बदलत गेले, या सर्वांमागील मानवी नात्यांचे स्वरूप आणि समाजरचना बदलत गेली. हा सर्व प्रवास समजण्यासाठी सांस्कृतिक घडण, सामाजिक रचना, आर्थिक व्यवस्था इत्यादींचा इतिहास अभ्यासावा लागतो.

**५. व्यवस्थापनशास्त्र :** उत्पादनाची संसाधने, मनुष्यबळ आणि उत्पादनाच्या विविध प्रक्रिया, बाजार आणि विक्री यांच्या व्यवस्थापनाच्या साखळीत त्यासंबंधातील भूतकालीन यंत्रणा कशा होत्या, हे समजावून घेणे आवश्यक असते. या साखळीत गुंतलेल्या विविध स्तरांवरील लोकांची परंपरागत मानसिकता समजावून घेण्यासाठी या सर्वांचा डोलारा ज्या वेगवेगळ्या सामाजिक आणि आर्थिक संस्थांच्या संघटनावर अवलंबून असतो, त्यांचा इतिहास समजला तर वर्तमानात विविध पातळ्यांवरील व्यवस्थापन करणे सोपे होते.

**६. कला :** विविध कलाक्षेत्रांमधील अभिव्यक्ती व त्यामागील वैचारिक-भावनिक-सांस्कृतिक परंपरांच्या आधाराने झालेला कलांचा विकास समजावून घेणे महत्त्वाचे असते. कोणत्याही कलाविष्काराचे मर्म, कलाकृतीच्या निर्मात्याची मानसिकता आणि विशिष्ट कलाशैलीच्या विकासाचा क्रम सांस्कृतिक इतिहासाच्या अभ्यासाद्वारे समजू शकतो.

**७. मानव्य ज्ञानशाखा :** इतिहास, पुरातत्व, समाजशास्त्र, मानवशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र यांसारख्या ज्ञानशाखांचा उगम आणि विकास यांचा इतिहास समजावून घेणे हे या ज्ञानशाखांच्या अभ्यासाचा आवश्यक भाग आहे. तत्वज्ञान ही विज्ञान आणि इतर सर्वच ज्ञानशाखांची जननी मानली जाते. वैश्विक पसारा आणि मानवाचे त्यातील अस्तित्व यांचा परस्परसंबंध समजून घेण्याच्या जिज्ञासेतून जगभरातील सर्वच मानवी समाजांमध्ये त्यासंबंधीची अनुमाने लोक बांधू लागले. त्यातून

जगाच्या उत्पत्तीसंबंधीच्या कथा, सृष्टिचक्र आणि मानवी जीवनासंबंधीची मिथके, देव-देवतांसंबंधीच्या कल्पना आणि त्या देवदेवतांना प्रसन्न करण्यासाठी केलेले विधी, त्यासंबंधीचे तात्त्विक विवेचन यांचा विकास झाला. प्राचीन लोकांनी केलेल्या या गोष्टींविषयींच्या विचारात तत्त्वज्ञानाची बीजे आहेत. इथे उल्लेख केलेल्या मानव्यशाखेतील विविध शाखांच्या विकासाला तत्त्वज्ञानातील सिद्धान्तांचा पाया आहे. इतिहासाच्या आधारे या वाटचालीचे आकलन होऊ शकते.

## ३.३ उपयोजित इतिहास आणि वर्तमानकाळ

इतिहासाचा दैनंदिन व्यवहारामध्ये उपयोग काय, असा प्रश्न नेहमी विचारला जातो. उपयोजित इतिहास म्हणजे काय या प्रश्नाच्या उत्तरात वरील प्रश्नाचे उत्तरही आपोआप मिळते. भूतकाळाचे मूर्त आणि अमूर्त स्वरूपातील अनेक अवशेष वर्तमानकाळात अस्तित्वात असतात. त्यांच्याबद्दल आपल्या मनात कुतूहल असते, आत्मीयता असते. त्यांच्या अस्तित्वाचा इतिहास आपल्याला समजावून घ्यावासा वाटतो कारण ते आपल्या पूर्वजांनी निर्माण केलेल्या कलाकृतींचे, परंपरांचे अवशेष असतात. तो आपला सांस्कृतिक वारसा असतो. ती आपली ओळख असते. त्याच्या इतिहासाचे ज्ञान आपल्याला आपल्या उगमाकडे घेऊन जाणारे असते. त्यामुळे तो सांस्कृतिक वारसा आपल्या आणि पुढील पिढ्यांच्या हितासाठी दीर्घकाळ जतन करण्याची, त्याचे संवर्धन करण्याची आवश्यकता निर्माण होते. उपयोजित इतिहासाच्या आधारे मूर्त आणि अमूर्त स्वरूपातील सांस्कृतिक वारशाचे जतन आणि संवर्धन करता येते. त्यामुळे व्यवसायाच्या अनेक संधी निर्माण होतात. थोडक्यात सांगायचे म्हणजे इतिहासाच्या आधारे वर्तमानकाळाचे यथायोग्य आकलन आणि भविष्यकाळासाठी दिशादर्शन, असे उपयोजित इतिहासाचे वर्णन करता येईल.

## ३.४ सांस्कृतिक आणि नैसर्गिक वारशाचे व्यवस्थापन

**(अ) सांस्कृतिक वारसा :** हा मानवनिर्मित असतो. तो मूर्त आणि अमूर्त अशा दोन प्रकारचा असतो.

**१. मूर्त सांस्कृतिक वारसा :** या प्रकारात प्राचीन स्थळे, वास्तू, वस्तू, हस्तलिखिते, शिल्पे, चित्रे इत्यादींचा समावेश होतो.

**२. अमूर्त सांस्कृतिक वारसा :** या प्रकारात पुढील गोष्टींचा समावेश होतो.

- मौखिक परंपरा आणि त्यासाठी उपयोगात आणली जाणारी भाषा.
- पारंपरिक ज्ञान.
- सणसमारंभ साजरे करण्याच्या सामाजिक पद्धती आणि धार्मिक विधी.
- कला सादरीकरणाच्या पद्धती.
- विशिष्ट पारंपरिक कौशल्ये.
- अशा परंपरा, पद्धती, कौशल्ये इत्यादींचे प्रतिनिधित्व करणारे समूह, गट.

**(ब) नैसर्गिक वारसा :** निसर्गातील जैववैविध्याचा विचार नैसर्गिक वारशाच्या संकल्पनेत केलेला आहे. त्यामध्ये पुढील गोष्टींचा समावेश होतो :

(१) प्राणी (२) वनस्पतीसृष्टी (३) त्यांच्या अस्तित्वासाठी आवश्यक असणाऱ्या परिसंस्था आणि भूरचनात्मक वैशिष्ट्ये.

पुढील मानवी पिढ्यांच्या हितासाठी आपल्या वारशाचे जतन होणे आवश्यक आहे. नामशेष होण्याच्या वाटेवर असलेल्या सांस्कृतिक आणि नैसर्गिक वारशाचे जतन आणि संवर्धन व्हावे या हेतूने युनेस्को या जागतिक संघटनेने काही दिशादर्शक तत्त्वे जाहीर केलेली आहेत. त्या दिशादर्शक तत्त्वांच्या आधाराने जागतिक वारशाच्या पदास पात्र ठरणारी स्थळे, परंपरा यांची यादी जाहीर केली जाते.



### एका दृष्टिक्षेपात :

**भारतातील जागतिक मौखिक आणि अमूर्त वारसा यादीत समाविष्ट झालेल्या परंपरा :**

२००१ : 'कुटियट्टम' ही केरळमधील संस्कृत नाट्यपरंपरा.
२००३ : वैदिक पठणपरंपरा.
२००५ : उत्तर भारतातील 'रामलीला' सादरीकरण
२००९ : गढवाल (उत्तराखंड) येथील 'रम्मन' धार्मिक उत्सव आणि विधीनाट्य.
२०१० : राजस्थानचे कालबेलिया लोकसंगीत आणि लोकनृत्य.
२०१० : पश्चिम बंगाल, झारखंड आणि ओडिशा येथील छाऊ नृत्य.
२०१० : केरळातील 'मुडियेट्टू' विधीनाट्य आणि नृत्यनाट्य.
२०१२ : लडाख, जम्मू आणि काश्मीर येथील बौद्‌ध मंत्रपठणाची परंपरा.
२०१३ : मणिपूर येथील 'संकीर्तन' परंपरा.
२०१४ : पंजाबमधील ठठेरा जमातीची तांब्याची आणि पितळी भांडी बनवण्याची कलापरंपरा.
२०१६ : नवरोज
२०१६ : योग

**भारतातील जागतिक वारसा स्थळे – सांस्कृतिक**

१९८३ : आग्र्याचा किल्ला
१९८३ : अजिंठा लेणी
१९८३ : वेरूळ लेणी
१९८३ : ताजमहाल
१९८४ : महाबलीपुरम येथील मंदिरे
१९८४ : कोणार्क सूर्यमंदिर
१९८६ : गोव्यातील चर्चेस आणि कॉन्व्हेन्ट्स
१९८६ : फत्तेपूर सिक्री
१९८६ : हंपी येथील वास्तूसंकुल
१९८६ : खजुराहो येथील मंदिरे
१९८७ : घारापुरी (एलिफन्टा) लेणी
१९८७, २००४ : चोळ मंदिरे–तंजावरचे बृहदिश्वर मंदिर, गंगैकोंडचोळीश्वरमचे बृहदीश्वर मंदिर आणि दारासुरमचे ऐरावतेश्वर मंदिर
१९८७ : पट्टदकल येथील मंदिरे
१९८९ : सांचीचा स्तूप
१९९३ : हुमायूनची कबर
१९९३ : कुतुबमिनार आणि परिसरातील वास्तू
१९९९ : (१) दार्जिलिंग हिमालयन रेल्वे, (२) नीलगिरी माउन्टन रेल्वे, (३) द काल्का शिमला रेल्वे
२००२ : बोधगया येथील महाबोधी मंदिर आणि परिसर
२००३ : भीमबेटका येथील शैलाश्रय
२००४ : चंपानेर–पावागढ पुरातत्त्वीय स्थळ
२००४ : छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई
२००७ : लाल किल्ला, दिल्ली
२०१० : जंतर मंतर, जयपूर
२०१३ : राजस्थानमधील पर्वतीय किल्ले
२०१४ : गुजरातमधील पाटण येथील 'रानी–की–बाव'
२०१६ : नालंदा महाविहार पुरातत्त्वीय स्थळ
२०१६ : चंडिगढ येथील कॅपिटल कॉम्प्लेक्स
२०१७ : अहमदाबाद–ऐतिहासिक शहर

**भारतातील जागतिक वारसा स्थळे – नैसर्गिक**

१९८५ : काझीरंगा राष्ट्रीय उद्यान
१९८५ : केवलदेव राष्ट्रीय उद्यान
१९८५ : मानस वन्यजीव अभयारण्य
१९८७ : सुंदरबन राष्ट्रीय उद्यान
१९८८, २००५ : नंदादेवी आणि व्हॅली ऑफ फ्लॉवर्स राष्ट्रीय उद्याने
२०१२ : पश्चिम घाट
२०१४ : ग्रेट हिमालयन पार्क

**भारतातील मिश्र स्वरूपाचे जागतिक वारसास्थळ**

२०१६ : कांचनगंगा राष्ट्रीय उद्यान

युनेस्कोच्या जागतिक नैसर्गिक वारशाच्या यादीत पश्चिम घाटाचा समावेश २०१२ मध्ये केला गेला आहे. सातारा जिल्ह्यातील कास पठार पश्चिम



कैलास मंदिर, वेरूळ

घाटरांगांमध्येच आहे. सांस्कृतिक आणि नैसर्गिक वारशाचे व्यवस्थापन हे उपयोजित इतिहासाचे एक प्रमुख अंग आहे. या वारशाचे जतन आणि संवर्धन करण्याचे बहुतांश काम भारत सरकारचे पुरातत्त्व खाते आणि भारतातील प्रत्येक राज्य शासनाची पुरातत्त्व खाती करत असतात. इनटॅक ही (इंडियन नॅशनल ट्रस्ट फॉर आर्ट अँड कल्चरल हेरिटेज) स्वयंसेवी संस्था या क्षेत्रात १९८४ पासून कार्यरत आहे. सांस्कृतिक आणि नैसर्गिक वारशाच्या स्थळांच्या जतन आणि संवर्धनाच्या प्रकल्पांमध्ये अनेक विषयांतील तज्ज्ञांचा सहभाग आवश्यक असतो. त्या सर्वांमध्ये संबंधित स्थळाच्या सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय इतिहासाची जाणीव निर्माण करण्याचे काम उपयोजित इतिहासाद्‌वारे करता येते. त्यामुळे :

(१) प्रकल्पांतर्गत वारसास्थळाचे मूळ स्वरूप न बदलता जतन आणि संवर्धनाची कामे करणे शक्य होते.

(२) स्थानिक समाजाची घडण आणि मानसिकता, त्यांच्यापुढे असणारी वर्तमानातील विविध आव्हाने, स्थानिक लोकांच्या अपेक्षा यांचा आढावा घेता येतो.

(३) सांस्कृतिक वारसास्थळांचे जतन आणि संवर्धन करत असताना स्थानिक लोकांच्या भावना दुखावल्या जाऊ नयेत यासाठी कराव्या लागणाऱ्या उपाययोजनांचे नियोजन करता येते.

(४) स्थानिक लोकांना त्या प्रकल्पात सामील करून घेता येते.

(५) स्थानिक लोकांच्या परंपरागत कौशल्यांना प्रोत्साहन देऊ शकतील, अशा उद्योग व्यवसायांना चालना मिळावी, यासाठी पद्‌धतशीर नियोजन करणे शक्य होते.

## ३.५ संबंधित व्यावसायिक क्षेत्रे

पुढे उल्लेख केलेल्या क्षेत्रांशी संबंधित कायदेशीर नियम आणि सार्वजनिक धोरणे ठरवण्यासाठी इतिहासाचे ज्ञान पूरक ठरते.

१. संग्रहालये आणि अभिलेखागार
२. ऐतिहासिक स्थळांचे जतन आणि संवर्धन
३. पर्यटन आणि आतिथ्य
४. मनोरंजन आणि संपर्क माध्यमे

### माहीत आहे का तुम्हांला ?



पुरावस्तूंचे वर्णन करणारी मातीची वटिका

जगातील सर्वांत प्राचीन समजले जाणारे (इ.स.पू. ६ वे शतक) संग्रहालय मेसोपोटेमियातील 'उर' या प्राचीन शहराचे उत्खनन करताना सापडले. हे उत्खनन ब्रिटिश पुरातत्त्वज्ञ सर लिओनार्ड वुली यांनी १९२२ ते १९३४ या काळात केले होते. हे संग्रहालय एनिगॉल्डी नावाच्या मेसोपोटेमियाच्या राजकन्येने बांधले होते. ती स्वतः त्या संग्रहालयाची संग्रहपाल म्हणून काम पाहत असे.

या संग्रहालयात सापडलेल्या प्राचीन वस्तूंसोबत त्या वस्तूंचे सविस्तर वर्णन करणाऱ्या मातीच्या वटिका (clay tablets) होत्या.

## माहीत आहे का तुम्हांला ?



इंडियन म्युझियम - कोलकाता

कोलकाता येथे असलेले 'इंडियन म्युझियम' याची स्थापना एशियाटिक सोसायटीतर्फे सन १८१४ मध्ये झाली. नॅथानिएल वॉलिक हे डॅनिश वनस्पतीशास्त्रज्ञ त्याचे संस्थापक आणि पहिले संग्रहपाल होते. इथे दिलेले संग्रहालयाचे छायाचित्र १९०५ सालचे आहे. संग्रहालयाचे कला, पुरातत्त्व आणि मानवशास्त्र असे तीन प्रमुख विभाग असून त्यांच्याशी संलग्न असलेले जतन, प्रकाशन, छायाचित्रण, प्रदर्शन-सादरीकरण, प्रतिकृती निर्मिती, प्रशिक्षण, ग्रंथालय, सुरक्षा असे विभाग आहेत.

यातील प्रत्येक क्षेत्राच्या व्यवस्थापनासाठी विशेष कौशल्ये प्राप्त असलेल्या मनुष्यबळाची आवश्यकता असते. उदा., स्थापत्यविशारद, अभियंता, इतिहासकार, पुरातत्त्वज्ञ, संग्रहपाल, समाजशास्त्रज्ञ, अभिलेखागार व्यवस्थापक, कायदेतज्ज्ञ, छायाचित्रण तज्ज्ञ इत्यादी. ही यादी एवढ्यावरच संपत नाही. प्राचीन स्थळे, वास्तू आणि वस्तू यांच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचे सर्व तज्ज्ञांना पुरेसे ज्ञान असणे आवश्यक असते. उपयोजित इतिहासाच्या क्षेत्रातील प्रकल्पांमुळे वर उल्लेख केलेल्या क्षेत्रांमध्ये व्यवसायाच्या अनेक संधी उपलब्ध होऊ शकतात.

### माहीत करून घ्या.

अभिलेखागारांमध्ये महत्त्वाची जुनी कागदपत्रे, दप्तरे, जुने चित्रपट, इत्यादी जतन करून ठेवली जातात.

भारताचे राष्ट्रीय अभिलेखागार दिल्लीमध्ये आहे. भारतातील प्रत्येक राज्याचे स्वतंत्र अभिलेखागार आहे.

### वैशिष्ट्यपूर्ण अभिलेखागार

पुण्यामध्ये 'नॅशनल फिल्म अर्काइव्ह' (राष्ट्रीय फिल्म संग्रहालय) या संस्थेची मुख्य कचेरी आहे. भारत सरकारच्या माहिती आणि प्रसारण खात्याचा माध्यम विभाग म्हणून सन १९६४ मध्ये त्याची स्थापना झाली. त्यामागे प्रमुख तीन उद्देश होते.

- भविष्यातील पिढ्यांसाठी दुर्मीळ भारतीय चित्रपटांचा शोध घेणे, ते मिळवणे आणि चित्रपटांच्या त्या वारशाचे जतन करणे.
- चित्रपटांशी संबंधित महत्त्वाच्या बाबींचे वर्गीकरण करणे, त्यांच्या कायमस्वरूपी नोंदी तयार करणे आणि संशोधन करणे;
- चित्रपट संस्कृतीच्या प्रसाराचे केंद्र प्रस्थापित करणे.

या पाठामध्ये आपण पाहिले, की 'उपयोजित इतिहास' हे कार्यक्षेत्र लोकांमध्ये इतिहासासंबंधीचे प्रबोधन कसे करता येईल, आपल्या सांस्कृतिक आणि नैसर्गिक वारशाचे जतन आणि संवर्धन करण्याविषयी समाजात जागृती कशी निर्माण करता येईल, त्यासाठी इतिहासाच्या ज्ञानाचा उपयोग कसा करता येईल, त्या अनुषंगाने व्यावसायिक कौशल्ये आणि उद्योगव्यवसायांच्या क्षेत्रात वाढ कशी करता येईल, इत्यादी गोष्टींचा विचार आणि नियोजन करण्याचे काम उपयोजित इतिहासात केले जाते.

ऐतिहासिक आणि सार्वजनिक स्थळांचे विद्रुपीकरण होऊ नये, त्यांचे पुढील पिढ्यांच्या हितासाठी योग्यरित्या जतन-संवर्धन व्हावे म्हणून हे आवश्यक आहे.



## स्वाध्याय

**१. (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

(१) जगातील सर्वांत प्राचीन संग्रहालय ........... या शहराचे उत्खनन करताना सापडले.
(अ) दिल्ली (ब) हडप्पा
(क) उर (ड) कोलकाता

(२) भारताचे राष्ट्रीय अभिलेखागार .......... येथे आहे.
(अ) दिल्ली (ब) कोलकाता
(क) मुंबई (ड) चेन्नई

**(ब) पुढीलपैकी चुकीची जोडी दुरुस्त करून पुन्हा लिहा.**

(१) कुटियट्टम - केरळमधील संस्कृत नाट्यपरंपरा
(२) रम्मन - पश्चिम बंगालमधील नृत्य
(३) रामलीला - उत्तर भारतातील सादरीकरण
(४) कालबेलिया - राजस्थानचे लोकसंगीत आणि लोकनृत्य

**२. पुढील संकल्पना स्पष्ट करा.**

(१) उपयोजित इतिहास
(२) अभिलेखागार

**३. पुढील प्रश्नांची २५ ते ३० शब्दांत उत्तरे लिहा.**

(१) 'जनांसाठी इतिहास' ही संकल्पना स्पष्ट करा.
(२) ऐतिहासिक वारसास्थळांच्या संदर्भात युनेस्कोने कोणते कार्य केले आहे ?
(३) सांस्कृतिक वारसास्थळांच्या यादीतील महाराष्ट्रातील ठिकाणे कोणती हे शोधून लिहा.

**४. पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा.**

सांस्कृतिक वारसा
मूर्त ........................ ........................ ........................
अमूर्त ........................ ........................ ........................

**५. पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

(१) तंत्रज्ञानाचा इतिहास अभ्यासावा लागतो.
(२) जागतिक वारशाच्या पदास पात्र ठरणारी स्थळे, परंपरा यांची यादी युनेस्कोद्‌वारे जाहीर केली जाते.

**६. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

(१) पुढील विषयांच्या संशोधनात इतिहासाची संशोधन पद्‌धती कशी उपयुक्त ठरेल ते स्पष्ट करा.
(अ) विज्ञान (ब) कला (क) व्यवस्थापनशास्त्र
(२) उपयोजित इतिहासाचा वर्तमानकाळाशी कसा सहसंबंध असतो ?
(३) इतिहासाच्या साधनांचे जतन व्हावे यासाठी किमान १० उपाय सुचवा.
(४) नैसर्गिक आणि सांस्कृतिक वारसा जतन करण्याच्या प्रकल्पातून कोणत्या गोष्टी साध्य होतात ?

**उपक्रम**

भारताच्या नकाशा आराखड्यात वारसास्थळे दाखवा.

2AFR1I

# ४. भारतीय कलांचा इतिहास

४.१ कला म्हणजे काय ?
४.२ भारतातील दृक्कला परंपरा
४.३ भारतातील ललित/आंगिक कला परंपरा
४.४ कला, उपयोजित कला आणि व्यवसायाच्या संधी

## ४.१ कला म्हणजे काय ?

स्वतःला आलेले अनुभव आणि त्यातून प्राप्त झालेले ज्ञान तसेच मनातील भावभावना इतरांपर्यंत पोचवाव्या, ही प्रत्येक व्यक्तीची सहजप्रवृत्ती असते. या सहजप्रवृत्तीच्या प्रेरणेतून जेव्हा एखादी सौंदर्यपूर्ण निर्मिती केली जाते, तेव्हा तिला कला असे म्हटले जाते. कलानिर्मितीच्या मुळाशी कलाकाराची कल्पकता, संवेदनशीलता, भावनाशीलता आणि कौशल्य हे घटक अत्यंत महत्त्वाचे असतात.

**दृक्कला आणि ललित कला :** 'दृक्कला' आणि 'ललित कला' अशी कलाप्रकारांची विभागणी केली जाते. ललित कलांना आंगिक कला असेही म्हटले जाते. दृक्कलांचा उगम प्रागैतिहासिक काळातच झाला, हे दर्शवणारे अनेक कला नमुने जगभरातील अश्मयुगीन गुहांमधून प्राप्त झालेले आहेत.

**लोककला आणि अभिजात कला :** कलेच्या 'लोककला' आणि 'अभिजात कला' अशा दोन परंपरा मानल्या जातात. 'लोककला' ही एक अश्मयुगीन काळापासून अखंडितपणे चालत आलेली परंपरा आहे. तिचा आविष्कार हा लोकांच्या रोजच्या जगण्याचा भाग असतो. त्यामुळे या परंपरेतील अभिव्यक्ती अधिक उत्स्फूर्त असते. लोककलेची निर्मिती समूहातील लोकांच्या प्रत्यक्ष सहभागातून होते. 'अभिजात कला' ही प्रमाणित नियमांच्या चौकटीत बांधलेली असते. ती आत्मसात करण्यासाठी दीर्घकालीन प्रशिक्षणाची आवश्यकता असते.

**कलाशैली :** कलानिर्मितीची प्रत्येक कलाकाराची स्वतंत्र पद्धत म्हणजे शैली असते. एखादी पद्धत जेव्हा परंपरेचे स्वरूप धारण करते तेव्हा ती पद्धत विशिष्ट कलाशैली म्हणून ओळखली जाऊ लागते. प्रत्येक संस्कृतीमध्ये वेगवेगळ्या कालखंडाशी आणि प्रदेशाशी निगडित असलेल्या वैशिष्ट्यपूर्ण कलाशैली विकसित होतात. त्या शैलींच्या आधारे त्या त्या संस्कृतीमधील कलेच्या इतिहासाचा अभ्यास करता येतो.



**मराठा चित्रशैली :** कलाशैलीचे उदाहरण म्हणून मराठा चित्रशैलीचा विचार करता येईल.साधारणपणे इसवी सनाच्या सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात मराठा चित्रशैली विकसित होण्यास सुरुवात झाली. या शैलीतील चित्रे रंगीत असून ती भित्तिचित्र आणि हस्तलिखितांमधील लघुचित्रांच्या स्वरूपातील आहेत. वाई, मेणवली, सातारा यांसारख्या ठिकाणी जुन्या वाड्यांमधून मराठा चित्रशैलीतील काही भित्तिचित्रे पाहण्यास मिळतात. मराठा चित्रशैलीवर राजपूत चित्रशैलीचा आणि युरोपीय चित्रशैलीचा प्रभाव पडलेला दिसतो.

एखादी विशिष्ट चित्रशैली ज्या काळात विकसित झाली असेल, त्या काळातील राहणीमान, पोशाख, रीतीरिवाज इत्यादी गोष्टींचा अभ्यास त्या शैलीतील चित्रांच्या आधारे करता येतो.

## ४.२ भारतातील दृक्कला परंपरा



भित्तिचित्र : बोधिसत्त्व पद्मपाणि

दृक्कलांमध्ये चित्रकला आणि शिल्पकला यांचा समावेश होतो.

**चित्रकला :** चित्रकला द्विमितीय असते. उदा., निसर्गचित्र, वस्तुचित्र, व्यक्तिचित्र, वास्तूंचे आरेखन इत्यादी चित्रे रेखाटली जातात. त्यासाठी शिलाखंड, भिंती, कागद, सुती किंवा रेशमी कापडाचे फलक, मातीची भांडी यांसारख्या माध्यमांचा उपयोग केला जातो. उदा., अजिंठा लेण्यातील बोधिसत्त्व पद्मपाणिचे भित्तिचित्र.

**लोकचित्रकला शैली :** अश्मयुगीन काळातील गुहाचित्रे अनेक देशांमध्ये आढळून येतात.

भारतामध्ये मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, बिहार, उत्तराखंड, कर्नाटक, आंध्र प्रदेश आणि तेलंगणा या राज्यांमध्ये गुहाचित्रे असलेली स्थळे आहेत. मध्य प्रदेशातील भीमबेटका येथील गुहाचित्रे प्रसिद्ध आहेत. भीमबेटकाचा समावेश जागतिक सांस्कृतिक वारसास्थळांमध्ये करण्यात आलेला आहे.

गुहाचित्रांमध्ये मनुष्याकृती, प्राणी आणि काही भौमितिक आकृतींचा समावेश असतो. पुराश्मयुग ते शेतीची सुरुवात होईपर्यंतच्या काळापर्यंत या चित्रांची शैली, त्यांचा विषय यामध्ये बदल होत गेलेले आढळतात. चित्रांमध्ये नवीन प्राणी आणि वनस्पती यांचा समावेश झालेला दिसतो, तसेच मनुष्याकृतींच्या रेखाटनाच्या पद्धतीत आणि वापरलेल्या रंगांमध्ये सुद्धा फरक होत जातो. या चित्रांमध्ये काळा, लाल, पांढरा यांसारखे नैसर्गिक द्रव्यांपासून तयार केलेले रंग वापरलेले असतात. त्या त्या काळातील लोकांचे त्यांच्या परिसरासंबंधीचे ज्ञान आणि नैसर्गिक स्रोतांचा उपयोग करून घेण्याचे तंत्रज्ञान यांचा विकास कसा होत गेला, याची कल्पना या चित्रांद्वारे करता येऊ शकते.

लोकचित्रकलेची परंपरा गुहाचित्रांच्या परंपरेशी नाते सांगणारी आहे. घरातील लग्नकार्यात, सणासुदीला भिंतींवर चित्रे काढणे, अंगणात रांगोळी काढणे तसेच

### माहीत आहे का तुम्हांला ?



महाराष्ट्रातील वारली चित्रपरंपरा आणि पिंगुळ किंवा चित्रकथी परंपरा ही लोककला शैलीची निवडक उदाहरणे आहेत. ठाणे जिल्ह्यातील जिव्या सोम्या मशे यांचा वारली चित्रकला लोकप्रिय करण्यात फार मोठा वाटा आहे. त्यांना त्यांच्या वारली चित्रांसाठी भारतीय आणि जागतिक स्तरावरचे अनेक पुरस्कार मिळाले आहेत. सन २०११ मध्ये त्यांना पद्मश्री हा बहुमान मिळाला आहे.

### हे जाणून घ्या.



इसवी सनाच्या बाराव्या शतकातील सोमेश्वर या चालुक्य राजाने लिहिलेल्या 'मानसोल्लास' किंवा 'अभिलषितार्थचिंतामणी' या ग्रंथात चित्रकथी परंपरेचे वर्णन केलेले आढळते. त्यावरून या परंपरेच्या प्राचीनत्वाची कल्पना येते. कठपुतळ्या किंवा चित्रांच्या साहाय्याने

रामायण, महाभारतातील कथा सांगण्याची परंपरा म्हणजे चित्रकथी परंपरा. ती कोकणातील कुडाळजवळच्या पिंगुळी गावातल्या ठाकर या आदिवासी समाजाच्या लोकांनी जपली आहे. या परंपरेतील चित्रे कागदावर काढून नैसर्गिक रंगात रंगवलेली असतात. एका कथेसाठी साधारणपणे ३० ते ५० चित्रांचा वापर केला जातो. वेगवेगळ्या कथा सांगण्यासाठी अशा चित्रांच्या पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेल्या पोथ्या चित्रकथी कुटुंबांमध्ये जपलेल्या असतात. नामशेष होण्याच्या मार्गावर असलेल्या या परंपरेचे पुनरुज्जीवन करण्याचे प्रयत्न सरकार आणि कलाकारांतर्फे केले जात आहेत.

चित्रांच्या साहाय्याने आख्याने सांगणे यांतून प्रादेशिक लोककला परंपरेतील विविध चित्रशैली विकसित झाल्या.

**अभिजात चित्रकला :** प्राचीन भारतीय वाङ्‌मयामध्ये विविध कलांसंबंधी सांगोपांग विचार झालेला दिसतो. त्यामध्ये एकूण ६४ कलांचा उल्लेख आहे. त्यामध्ये चित्रकलेचा उल्लेख 'आलेख्यम्' किंवा 'आलेख्य विद्या' या नावाने केलेला आहे. आलेख्य विद्येची 'षडांगे' म्हणजे सहा महत्त्वाचे पैलू आहेत. त्यांचा विचार प्राचीन भारतीयांनी अत्यंत बारकाईने केला होता. त्यांमध्ये रूपभेद (विविध आकार), प्रमाण (प्रमाणबद्ध रचना आणि मोजमाप), भाव (भावप्रदर्शन), लावण्ययोजन (सौंदर्याचा स्पर्श), सादृश्यता (वास्तवाच्या जवळ जाणारे चित्रण) आणि वर्णिकाभंग (रंगांचे आयोजन) यांचा समावेश आहे.

विविध धार्मिक पंथांचे आगमग्रंथ, पुराणे आणि वास्तुशास्त्रांवरील ग्रंथ यांमधून चित्रकला, शिल्पकला यांच्यासंबंधीचा विचार मंदिर बांधणीच्या संदर्भात केलेला दिसतो.

**हस्तलिखितांमधील लघुचित्रे :** हस्तलिखितांमधील लघुचित्रांवर सुरुवातीला पर्शियन शैलीचा प्रभाव होता. दक्षिणेकडील मुस्लीम राजवटींच्या आश्रयाखाली दख्खनी लघुचित्रशैली विकसित झाली. मुघल सम्राट अकबराच्या कारकिर्दीत पर्शियन आणि भारतीय चित्रकारांच्या शैलीतून मुघल लघुचित्रशैलीचा उदय झाला.


मुघल शैली

**युरोपीय चित्रशैली :** ब्रिटिश राजवटीत पाश्चात्त्य चित्रशैलीचा प्रभाव भारतीय चित्रशैलीवर पडलेला दिसतो. पुण्यातील शनिवारवाड्यात सवाई माधवराव पेशव्यांच्या काळात जेम्स वेल्स या स्कॉटिश चित्रकाराच्या नेतृत्वाखाली एक कलाशाळा स्थापन करण्यात आली होती. त्याने सवाई माधवराव आणि नाना फडणवीस यांचे चित्र काढले होते. वेल्सच्या सोबत काम करणारे एक मराठी


सवाई माधवराव आणि नाना फडणवीस


गंगाराम तांबट यांचे त्यांच्या गुरुंसमवेत रेखाटलेले स्व-चित्र

चित्रकार गंगाराम तांबट यांचा इथे विशेष उल्लेख करायला हवा. त्यांनी वेरूळ, कार्ले येथील लेण्यांची चित्रे काढली होती. त्यांची काही चित्रे अमेरिकेतील येल विद्यापीठात असलेल्या 'येल सेंटर ऑफ ब्रिटिश आर्ट' येथे जतन केलेली आहेत.

चित्रवस्तूचे हुबेहूब चित्रण हे पाश्चात्त्य चित्रशैलीचे विशेष वैशिष्ट्य समजले जाते. मुंबईत सन १८५७ मध्ये स्थापन झालेल्या जे.जे.स्कूल ऑफ आर्ट ॲन्ड इंडस्ट्री या पाश्चात्त्य कलाशैलींचे शिक्षण देणाऱ्या कलाशाळेतून अनेक गुणवंत चित्रकार नावारूपाला आले. त्यातील पेस्तनजी बोमनजी यांनी अजिंठा लेण्यांमधील चित्रांच्या प्रतिकृती बनवण्याचे काम केले.

**शिल्पकला :** शिल्पकला त्रिमितीय असते. उदा., मूर्ती, पुतळा, कलापूर्ण भांडी आणि वस्तू. शिल्पे कोरली किंवा घडवली जातात. त्यासाठी दगड, धातू आणि माती यांचा उपयोग केला जातो. वेरूळचे कैलास लेणे हे अखंड शिलाखंडातून कोरलेले अद्‌वितीय शिल्प आहे. सारनाथ येथील अशोकस्तंभाच्या शीर्षावरील चार सिंहांच्या शिल्पावर आधारलेले चित्र हे भारताचे राष्ट्रीय मानचिन्ह आहे.


अशोकस्तंभ

**लोकशिल्पकला शैली :** चित्रकलेप्रमाणेच शिल्पकला ही सुद्‌धा अश्मयुगीन काळाइतकी प्राचीन आहे. दगडी हत्यारे बनवण्याची सुरुवात ही एक प्रकारे शिल्पकलेचीच सुरुवात होती असे म्हणता येईल. भारतामध्ये धार्मिक प्रसंगी मातीच्या मूर्ती तयार करून त्यांची पूजा करण्याची किंवा त्या अर्पण करण्याची प्रथा हडप्पा संस्कृतीच्या काळापासून होती. ती आजतागायत बंगाल, बिहार, गुजरात, राजस्थान अशा अनेक राज्यांमध्ये अस्तित्वात असल्याचे दिसते. महाराष्ट्रामध्ये तयार केल्या जाणाऱ्या गणेशमूर्ती, गौरींचे मुखवटे, बैलपोळ्यासाठी तयार केले जाणारे मातीचे बैल, पूर्वजांच्या स्मरणासाठी उभे केलेले लाकडी मुखवट्याचे खांब, वीरगळ, आदिवासी घरांमधील साठवणीच्या मातीच्या कोठ्या, इत्यादी गोष्टी या शिल्पकलेच्या लोकपरंपरेची साक्ष देतात.

**अभिजात शिल्पकला शैली :** हडप्पा संस्कृतीमधील मुद्रा, दगडी आणि कांस्य पुतळे पाच हजार वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक प्राचीन असलेल्या भारतीय शिल्पकलेच्या परंपरेची साक्ष देतात. मौर्य सम्राट अशोकाच्या काळातील दगडी स्तंभांपासून भारतातील कोरीव दगडी शिल्पनिर्मितीला खऱ्या अर्थाने सुरुवात झाली, असे मानले जाते.


भारहूत स्तूप : शिल्प

मध्य प्रदेशातील सांची येथील स्तूप प्रथम अशोकाच्या काळात उभारला गेला. त्याच्यावरील देखण्या शिल्पांची सजावट मात्र नंतरच्या काळात केली गेली असावी, असे मानले जाते. भारतातील शिल्पकलेचा विकास नंतरच्या काळात होत राहिला. याची साक्ष आपल्याला भारहूत येथील स्तूपावरील शिल्पांद्‌वारे मिळते. बौद्‌ध धर्माचा प्रसार भारताबाहेर दूरवर झाला. त्यामुळे त्या देशांमध्ये स्तूप उभारण्याची परंपरा सुरू झाली. इंडोनेशियातील बोरोबुदुर येथील स्तूप हा जगातील सर्वाधिक मोठा स्तूप आहे. तो इसवी सनाच्या आठव्या-नवव्या शतकात बांधला गेला. इसवी सन १९९१ साली युनेस्कोने बोरोबुदुर जागतिक वारसास्थळ म्हणून जाहीर केले.


बोरोबुदुर स्तूप

**भारतीय मूर्तिविज्ञान :** अफगाणिस्तान आणि आसपासच्या प्रदेशात इसवी सनापूर्वी दुसऱ्या शतकात ग्रीक आणि पर्शियन प्रभाव दर्शवणारी गांधार शिल्पकलाशैली उदयाला आली.

इसवी सनाच्या पहिल्या ते तिसऱ्या शतकात



नटराज

म्हणजे कुशाण काळात मथुरा शिल्पशैली उदयाला आली. या शैलीने भारतीय मूर्तीविज्ञानाचा पाया घातला. देवप्रतिमांचा उपयोग करण्याची कल्पना कुशाण नाण्यांवर प्रथम पाहण्यास मिळते. गुप्त साम्राज्याच्या काळात भारतीय मूर्तीविज्ञानाचे नियम तयार होऊन शिल्पकलेचे मापदंड निर्माण झाले. इसवी सनाच्या नवव्या ते तेराव्या शतकांत चोळ राजांच्या आधिपत्याखाली दक्षिण भारतात कांस्यमूर्ती घडवण्याची कला विकसित झाली. त्यामध्ये शिव-पार्वती, नटराज, लक्ष्मी, विष्णू यांसारख्या देवतांच्या मूर्ती बनवल्या जाऊ लागल्या.

**स्थापत्य आणि शिल्पकला :** भारतामध्ये अनेक कोरीव लेणी आहेत. कोरीव लेण्यांची परंपरा भारतामध्ये इसवी सनापूर्वी तिसऱ्या शतकात सुरू झाली. तांत्रिकदृष्ट्या संपूर्ण लेणे हे स्थापत्य आणि कोरीव शिल्पाचे एकत्रित उदाहरण असते. प्रवेशद्वारे, आतील खांब आणि मूर्ती हे शिल्पकलेचे उत्तम नमुने असतात. भिंती आणि छत यांवर केलेले उत्तम चित्रकाम काही लेण्यांमध्ये अजूनही काही प्रमाणात टिकून आहे. महाराष्ट्रातील अजिंठा आणि वेरूळ येथील लेण्यांना इसवी सन १९८३ मध्ये जागतिक वारशाचा दर्जा देण्यात आला.



अजिंठा लेणे क्र. १९ प्रवेशद्वार

भारतात मंदिर स्थापत्याची सुरुवात साधारणपणे इसवी सनाच्या चौथ्या शतकात गुप्त साम्राज्याच्या काळात झाली. गुप्तकाळाच्या सुरुवातीस गाभारा आणि त्याबाहेरील चार स्तंभ असलेली ओसरी एवढेच मंदिराचे स्वरूप होते.

इसवी सनाच्या आठव्या शतकापर्यंत भारतातील मंदिर स्थापत्य पूर्ण विकसित झाले होते, हे वेरूळ येथील कैलास मंदिराच्या भव्य रचनेवरून सहज लक्षात येते. मध्ययुगीन काळापर्यंत भारतीय मंदिर स्थापत्याच्या अनेक शैली विकसित झाल्या. शिखरांच्या रचना वैशिष्ट्यांनुसार या शैली ठरतात. त्यामध्ये उत्तर भारतातील 'नागर' आणि दक्षिण भारतातील 'द्राविड' या दोन शैली प्रमुख मानल्या जातात. या दोहोंमधून विकसित झालेल्या मिश्र शैलीला 'वेसर' असे म्हटले जाते. मध्य प्रदेश आणि महाराष्ट्रात आढळणारी 'भूमिज' मंदिरशैली आणि 'नागर' मंदिरशैली यांच्यामध्ये रचनेच्या दृष्टीने साम्य आढळते. भूमिज शैलीत क्रमशः लहान होत जाणाऱ्या शिखरांच्या प्रतिकृती वरपर्यंत रचलेल्या असतात.



नागर शैलीचे शिखर



द्राविड शैलीचे गोपूर


**हे माहीत करून घ्या.**

महाराष्ट्रातील बाराव्या-तेराव्या शतकातील मंदिरांना 'हेमाडपंती' मंदिरे असे म्हणतात. हेमाडपंती मंदिराच्या बाह्य भिंती बऱ्याचदा तारकाकृती असतात. तारकाकृती मंदिराच्या बांधणीत मंदिराची बाह्य भिंत अनेक कोनांमध्ये विभागली जाते. त्यामुळे त्या भिंती आणि त्यावरील शिल्पे यांच्यावर छायाप्रकाशाचा सुंदर परिणाम पाहण्यास मिळतो. हेमाडपंती मंदिरांचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे भिंतीचे दगड सांधण्यासाठी चुना वापरलेला नसतो. दगडांमध्येच एकमेकांत घट्ट बसतील अशा कातलेल्या खोबणी आणि कुसू यांच्या आधाराने भिंत उभारली जाते. मुंबईजवळील अंबरनाथ येथील अंब्रेश्वर, नाशिकजळचे सिन्नर येथील गोंदेश्वर, हिंगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथ ही हेमाडपंती मंदिराची उत्तम उदाहरणे आहेत. त्यांची बांधणी तारकाकृती प्रकारची आहे. त्याखेरीज महाराष्ट्रात अनेक ठिकाणी हेमाडपंती मंदिरे पहावयास मिळतात.



गोंदेश्वर मंदिर - सिन्नर

मध्ययुगीन भारतामध्ये मुस्लीम सत्तांच्या आश्रयाखाली पर्शियन, मध्य आशियाई, अरबी आणि इस्लामपूर्व भारतीय असे स्थापत्यशैलीचे अनेक प्रवाह एकत्र आले. त्यातून भारतातील मुस्लीम स्थापत्य विकसित झाले. अनेक देखण्या वास्तूंची निर्मिती केली गेली. दिल्लीजवळच्या मेहरौली येथील कुतुबमिनार, आग्रा येथील ताजमहाल आणि विजापूर येथील गोलघुमट या वास्तू मुस्लीम स्थापत्यशैलीची जगप्रसिद्ध उदाहरणे आहेत. कुतुबुद्दीन ऐबक (इ.स.बारावे शतक) याच्या काळात कुतुबमिनार बांधण्यास प्रारंभ झाला आणि अल्तमश (इ.स.तेरावे शतक) याच्या कारकिर्दीत कुतुबमिनारचे बांधकाम पूर्ण झाले. कुतुबमिनार जगातील सर्वाधिक उंच मिनार आहे. त्याची उंची ७३ मीटर (२४० फूट) आहे. ज्या वास्तुसंकुलाचा कुतुबमिनार हिस्सा आहे ते कुतुब वास्तुसंकुल युनेस्कोने जागतिक वारसास्थळ म्हणून जाहीर केले आहे.



कुतुबमिनार


मुघल सम्राट शहाजहान याने त्याची बेगम मुमताजमहल हिच्या स्मरणार्थ ताजमहाल बांधला. ताजमहाल हे भारतातील मुस्लीम स्थापत्याच्या



ताजमहाल


सौंदर्याचे अग्रगण्य उदाहरण मानले जाते. जगप्रसिद्ध असलेली ही वास्तू जागतिक वारसास्थळ म्हणून युनेस्कोने जाहीर केली आहे.

इसवी सनाच्या सतराव्या शतकात बांधलेल्या विजापूरच्या गोलघुमट या अत्यंत भव्य इमारतीत मोहम्मद अदिलशहा याची कबर आहे. या इमारतीला गोलघुमट हे नाव ज्यामुळे मिळाले त्या घुमटाच्या आतल्या घेराच्या बाजूने गोल सज्जा आहे. या सज्जात उभे राहून कुजबुजले तरी तो आवाज सर्वत्र ऐकू जातो. जोरात टाळी वाजवली तर तिचा प्रतिध्वनी अनेकदा घुमतो.



गोलघुमट

भारतात ब्रिटिश सत्ता प्रस्थापित झाल्यानंतर एक नवीन स्थापत्यशैली उदयाला आली. तिला इंडो-गोथिक स्थापत्यशैली असे म्हटले जाते. ब्रिटिश काळात बांधल्या गेलेल्या चर्च, सरकारी कचेऱ्या, मोठ्या पदाधिकाऱ्यांची निवासस्थाने, रेल्वे स्टेशन यांसारख्या इमारतींमध्ये ही शैली पहावयास मिळते.



छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे टर्मिनस

मुंबईचे 'छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे टर्मिनस' ही इमारत या शैलीचे एक उत्कृष्ट उदाहरण असून ते युनेस्कोच्या जागतिक वारसास्थळांच्या यादीत समाविष्ट झाले आहे.

## ४.३ भारतातील ललित/आंगिक कला परंपरा


**लोककलेच्या परंपरा :** भारतातील प्रत्येक प्रदेशाच्या वैविध्यपूर्ण अशा लोकगीत, लोकवाद्य, लोकनृत्य आणि लोकनाट्याच्या परंपरा आहेत. महाराष्ट्रातही लोककलेच्या अनेक परंपरा अस्तित्वात आहेत. या लोककला धार्मिक उत्सव आणि सामाजिक जीवन यांचा एक अविभाज्य भाग म्हणून विकसित झाल्या. कोळीनृत्य, तारपा नृत्य, कोकणातील दशावतार, पोवाडा, कीर्तन, जागर-गोंधळ ही त्यांपैकी काही ठळक उदाहरणे आहेत.

**अभिजात कलेच्या परंपरा :** भारताला लोककलांप्रमाणेच अभिजात कलांचाही अत्यंत समृद्ध वारसा लाभलेला आहे. भरतमुनींनी लिहिलेले 'नाट्यशास्त्र' हा गायन, वादन, नर्तन, नाट्य या कलांचा सविस्तर ऊहापोह करणारा सर्वाधिक प्राचीन ग्रंथ समजला जातो. शृंगार, हास्य, बीभत्स, रौद्र, करुण, वीर, भयानक, अद्‌भुत आणि शांत असे नऊ रस हे भारतीय ललित कलांच्या सादरीकरणात मूलभूत मानलेले आहेत.

भारतीय लोकांचा बाहेरील देशातील लोकांशी सतत संपर्क येत राहिला आणि त्याद्‌वारे त्या कलांच्या सादरीकरणामध्ये अनेक प्रवाह मिसळत गेले. त्यामुळे त्या अधिकाधिक समृद्ध होत गेल्या. शास्त्रीय गायन, वादन, नृत्य यांच्या विविध शैली आणि त्या शैलींचे जतन करणारी घराणी निर्माण झाली.

भारतातील शास्त्रीय गायनाच्या 'हिंदुस्थानी संगीत' आणि 'कर्नाटक संगीत' अशा दोन प्रमुख शाखा आहेत. तसेच शास्त्रीय आणि उपशास्त्रीय असे दोन भेद आहेत. उपशास्त्रीय गायनात अनेक लोकगीत शैलींचा समावेश झालेला दिसतो.

### माहीत आहे का तुम्हांला?



विजापूरचा सुलतान इब्राहिम आदिलशाह दुसरा याने पर्शियन भाषेत 'किताब-ए-नवरस' हा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ संगीतशास्त्राशी संबंधित असून, गायनानुकूल गीते असलेला, धृपद गायकीला समोर ठेवून गीतांना साकार करणारा, उत्तम दर्जाच्या काव्यग्रंथाची अनुभूती रसिकांना देणारा हा ग्रंथ आहे.

या ग्रंथाचे डॉ.अरुण प्रभुणे यांनी मराठीत संपादन केले आहे. या ग्रंथाच्या मुखपृष्ठावरील दोहऱ्याचा अनुवाद पुढीलप्रमाणे आहे.

''हे माते सरस्वती, तू जगज्योती आणि सर्वगुणी आहेस. इब्राहिमवर तुझी कृपा झाली तर (तुझ्या आशीर्वादाने) नवरसाचे गीत युगे युगे जिवंत राहील.''

उत्तर भारतातील कथ्थक, महाराष्ट्रातील लावणी, ओडिशाचे ओडिसी, तमिळनाडूचे भरतनाट्यम्, आंध्रचे कुचिपुडी, केरळचे कथकली आणि मोहिनीअट्टम या नृत्यशैलींच्या सादरीकरणात शास्त्रीय गायन, वादन आणि नृत्य यांचा सुरेख मेळ पाहण्यास मिळतो.

स्वतंत्र भारतात शास्त्रीय संगीत आणि नृत्य सामान्य रसिकांपर्यंत पोचावे या दृष्टीने विविध ठिकाणी संगीत-नृत्याचे महोत्सव साजरे केले जातात. त्यांचा आस्वाद घेण्यासाठी केवळ भारतातूनच नव्हेत



लावणी नृत्य-महाराष्ट्र



कथकली-केरळ

तर परदेशांमधूनही अनेक रसिक येतात. पुण्यातील प्रतिवर्षी सवाई गंधर्व यांच्या नावाने होणारा संगीतमहोत्सव प्रसिद्ध आहे.

अलीकडील काळात भारतीय संगीताच्या क्षेत्रात विशिष्ट शैली किंवा विशिष्ट घराणे यांच्या मर्यादा ओलांडून अभिनव प्रयोग करण्याकडे कल असलेला दिसतो. त्यामध्ये पाश्चात्त्य संगीत, पाश्चात्त्य नृत्य यांचा मेळ भारतीय संगीताशी घालण्याचा प्रयत्नही दिसतो. अशा प्रकारे नवीन शैली विकसित करणाऱ्या कलाकारांमध्ये उदय शंकर यांचे नाव प्रामुख्याने घ्यावे लागेल. त्यांनी भारतीय शास्त्रीय नृत्य आणि युरोपीय रंगभूमीवरील नृत्यनाट्य परंपरा यांचा मेळ साधला. त्याचबरोबर त्यांनी त्यांच्या शैलीमध्ये लोकनृत्याच्या विविध शैलींनाही स्थान दिले. भारतीय

ललित कलांच्या सादरीकरणाचे क्षेत्र अशा तऱ्हेने विस्तारताना दिसत आहे. ही गोष्ट भारतीय दृक्कलांच्या क्षेत्रातही सातत्याने घडते आहे.

## ४.४ कला, उपयोजित कला आणि व्यवसायाच्या संधी

**कला :** कलेचा इतिहास ही एक ज्ञानशाखा आहे. त्या क्षेत्रात संशोधनाच्या आणि व्यवसायाच्या संधी उपलब्ध होऊ शकतात :

(१) कलेच्या इतिहासाचे अभ्यासक पत्रकारितेच्या क्षेत्रातही काम करू शकतात.

(२) कलावस्तूंच्या खरेदी-विक्रीचे एक स्वतंत्र जग आहे. तिथे कलावस्तूंचे मूल्य ठरवण्यासाठी ती कलावस्तू नकली नाही ना, हे पारखण्याची आवश्यकता असते. त्यासाठी कलेच्या इतिहासाचा सखोल अभ्यास असणाऱ्या तज्ज्ञांची आवश्यकता असते.

(३) सांस्कृतिक वारशाचे जतन आणि संवर्धन तसेच सांस्कृतिक पर्यटन ही आता नव्याने विकसित होणारी क्षेत्रे आहेत. या क्षेत्रांमध्येही कलेच्या अभ्यासकांना अनेक व्यावसायिक संधी उपलब्ध आहेत. त्यामध्ये संग्रहालय आणि अभिलेखागार, ग्रंथालय आणि माहिती प्रसारणाचे तंत्रज्ञान, पुरातत्त्वीय संशोधन आणि भारतीय विद्या ही काही महत्त्वाची क्षेत्रे आहेत.

**उपयोजित कला :** दृक् आणि ललित कलांच्या क्षेत्रात कलेचा केवळ रसिकांनी रसास्वाद घ्यावा म्हणून कलानिर्मिती केली जाते. सर्व कलाक्षेत्रातील कलाकारांचा तो प्राथमिक हेतू असतो. त्याखेरीज कलात्मक रचना आणि उपयुक्तता यांची सांगड घालून अनेक प्रकारची निर्मिती केली जाते. अशा प्रकारे उपयुक्तता हा हेतू ठेवून कला निर्मिती करणे म्हणजे उपयोजित कला.

(१) औद्योगिक आणि जाहिरात क्षेत्र, तसेच घराची सजावट आणि सजावटीच्या वस्तू, रंगमंचावरील नेपथ्य, चित्रपट आणि दूरदर्शनवरील कार्यक्रम यांसाठी आवश्यक असणारे कला दिग्दर्शन, प्रकाशन आणि मुद्रण क्षेत्रात पुस्तके, नियतकालिके, वर्तमानपत्रे यांची मांडणी, सजावट व सुलेखन, भेटकार्डे, आमंत्रणपत्रिका, वैयक्तिक लेखनसामग्री, भेटवस्तू, इत्यादी अनेक गोष्टींसाठी उपयोजित कला क्षेत्रातील जाणकारांची आवश्यकता असते.

(२) स्थापत्य आणि छायाचित्रण ही क्षेत्रेही उपयोजित कला या सदराखाली येतात. सध्याच्या काळात संगणकावर तयार केलेली स्थिर आणि चलत् चित्रे, नक्षी आणि आरेखने वापरली जातात. ती सुद्‌धा उपयोजित कलेचाच भाग आहेत. दागदागिने, मौल्यवान धातूंच्या कलावस्तू, रंगीत नक्षीची मातीची भांडी, बांबू आणि वेताच्या वस्तू, काचेच्या कलापूर्ण वस्तू, सुंदर कापड आणि वस्त्रे इत्यादींची निर्मिती अशी ही उपयोजित कलेची अत्यंत विस्तृत यादी आहे.

वरील प्रत्येक क्षेत्रात बौद्‌धिक पातळीवर एखादी संकल्पना मांडून ती प्रत्यक्षात उतरवेपर्यंत निर्मितीचे अनेक टप्पे असतात. प्रत्येक टप्प्यावर प्रशिक्षित आणि कुशल व्यक्तींची मोठ्या प्रमाणावर आवश्यकता असते. कलावस्तूंचे उत्पादन करताना त्यांच्या निर्मितीच्या प्रक्रिया काही विशिष्ट सांस्कृतिक परंपरांनी बांधलेल्या असतात. या क्षेत्रांमधील प्रक्रियांचा प्रत्येक टप्प्याच्या विकासाचा इतिहास असतो. प्रशिक्षणाच्या अभ्यासक्रमात कलावस्तूंच्या उत्पादनप्रक्रियेच्या औद्योगिक, सांस्कृतिक परंपरांच्या इतिहासाचा अंतर्भाव केलेला असतो.

वर उल्लेख केलेल्या क्षेत्रांमध्ये तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या अनेक संस्था भारतात आहेत. गुजरातमधील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ डिझाईन, अहमदाबाद, ही अशा प्रकारचे प्रशिक्षण देणाऱ्या जगातील अग्रगण्य संस्थांपैकी एक समजली जाते. सन २०१५ मध्ये या संस्थेने एक ऑनलाईन अभ्यासक्रम सुरू केला आहे.

पुढील पाठात आपण प्रसारमाध्यमे आणि इतिहास यांबाबत माहिती घेणार आहोत.



## स्वाध्याय

**१. (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

(१) चित्रकला आणि शिल्पकला यांचा .......... मध्ये समावेश होतो.

(अ) दृक्कला (ब) ललित कला
(ब) लोककला (क) अभिजात कला

(२) मथुरा शिल्पशैली ......... काळात उदयाला आली.

(अ) कुशाण (ब) गुप्त
(क) राष्ट्रकूट (ड) मौर्य

**(ब) पुढीलपैकी चुकीची जोडी दुरुस्त करून पुन्हा लिहा.**

(१) कुतुबमिनार – मेहरौली
(२) गोलघुमट – विजापूर
(३) छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे टर्मिनस – दिल्ली
(४) ताजमहाल – आग्रा

**२. पुढील संकल्पना स्पष्ट करा.**

(१) कला (२) हेमाडपंती शैली
(३) मराठा चित्रशैली

**३. पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

(१) कलेच्या इतिहासाचा सखोल अभ्यास असणाऱ्या तज्ज्ञांची आवश्यकता असते.

(२) चित्रकथीसारख्या नामशेष होणाऱ्या मार्गावर असलेल्या परंपरेचे पुनरुज्जीवन करणे गरजेचे आहे.

**४. पुढील प्रश्नांची २५ ते ३० शब्दांत उत्तरे लिहा.**

(१) लोकशिल्पकला याविषयी माहिती लिहा.
(२) गांधार शिल्पशैलीची माहिती लिहा.

**५. पुढील तक्ता पूर्ण करा.**

| मंदिर स्थापत्य शैली | नागर | द्राविड | हेमाडपंती |
|---|---|---|---|
| वैशिष्ट्ये | | | |
| उदाहरणे | | | |

**६. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

(१) लोकचित्रकला शैलीविषयी सविस्तर माहिती लिहा.

(२) भारतातील मुस्लीम स्थापत्यशैलीची वैशिष्ट्ये सोदाहरण स्पष्ट करा.

(३) कला क्षेत्रात व्यवसायाच्या कोणत्या संधी उपलब्ध आहेत हे स्पष्ट करा.

(४) पृष्ठ क्र. २३ वरील चित्राचे निरीक्षण करून खालील मुद्द्यांच्या आधारे वारली चित्रकलेविषयी माहिती लिहा.

(अ) निसर्गाचे चित्रण (ब) मानवाकृतींचे रेखाटन
(क) व्यवसाय (ड) घरे

**उपक्रम**

(१) भारतातील युनेस्कोने जाहीर केलेल्या जागतिक वारसास्थळांची अधिक माहिती मिळवा.

(२) आपल्या परिसरातील मूर्ती बनवणाऱ्या कारागिरांच्या कामाचे निरीक्षण करा व त्यांची मुलाखत घ्या.

2APM36

# ५. प्रसारमाध्यमे आणि इतिहास


५.१ प्रसारमाध्यमांची ओळख
५.२ प्रसारमाध्यमांचा इतिहास
५.३ प्रसारमाध्यमांची आवश्यकता
५.४ प्रसारमाध्यमांद्वारे मिळणाऱ्या माहितीचे चिकित्सक आकलन
५.५ संबंधित व्यावसायिक क्षेत्रे


**विचार करा.**

मुघल काळात बिहारमध्ये दुष्काळ पडल्यावर त्याची बातमी दिल्लीला कशी पोहचत असेल ? त्यावर विचारविनिमय होऊन दिल्लीचा सम्राट ज्या उपाययोजना करत असेल, त्या बिहारमध्ये पोहचायला किती वेळ लागत असेल ?

## ५.१ प्रसारमाध्यमांची ओळख

'प्रसारमाध्यमे' या शब्दात 'प्रसार आणि माध्यमे' असे दोन शब्द आहेत. प्रसार याचा अर्थ दूरवर पोहचवणे. एखादी माहिती आपण एखाद्या माध्यमाच्या साहाय्याने दूरवर पोहचवू शकतो. पूर्वीच्या काळी राजाला एखादी बातमी संपूर्ण राज्यात पोहचवायची असेल तर त्यासाठी कित्येक दिवस लागायचे. पूर्वी गावोगाव दवंडी पिटवत असत. एकाकडून दुसऱ्याला, दुसऱ्याकडून तिसऱ्याला असा बातमीचा प्रवास व्हायचा.

## ५.२ प्रसारमाध्यमांचा इतिहास


भारतात इंग्रजांचे आगमन झाल्यावर मुद्रणकला, वर्तमानपत्रे सुरू झाली. वर्तमानपत्रांमुळे छापील बातमी सगळीकडे पोहचण्यास मदत होऊ लागली. वर्तमानपत्र हे माहितीच्या आणि ज्ञानाच्या प्रसाराचे साधन झाले.

**वर्तमानपत्रे :** मुख्यतः बातम्या, अग्रलेख, लोकांची मते, जाहिराती, रंजक व अन्य पूरक मजकूर यांचा समावेश असलेले, ठरलेल्या वेळी नियमितपणे छापून वितरित केले जाणारे प्रकाशन म्हणजे 'वर्तमानपत्र' होय.

वर्तमानपत्रे स्थानिक, देशांतर्गत व जागतिक स्वरूपाच्या विविध बातम्या पुरवण्याचे काम करतात. चालू घडामोडींच्या नोंदींचा वर्तमानपत्रे म्हणजे एक ऐतिहासिक दस्तऐवज आहे.

**वर्तमानपत्रांचे पूर्वसूरी :** इजिप्तमध्ये इसवीसन पूर्वकाळात सरकारी आदेशांचे कोरीव लेख सार्वजनिक ठिकाणी लावून ठेवत असत. प्राचीन रोमन साम्राज्यात सरकारी हुकूम कागदावर लिहून काढत व ते कागद प्रांतोप्रांती वाटले जात. यात देश व राजधानीतील घटनांची माहिती असे. ज्युलिअस सीझरच्या आधिपत्याखाली 'ॲक्टा डायर्ना' (डेली ॲक्ट – रोजच्या घटना) नावाची वार्तापत्रे, रोममध्ये सार्वजनिक ठिकाणी लावत. लोकांपर्यंत सरकारी निवेदने पोहचवण्याचा तो एक प्रभावी मार्ग होता. सातव्या शतकात चीनमध्ये सरकारी निवेदने सार्वजनिक ठिकाणी वाटत असत. इंग्लंडमध्ये लढायांची किंवा महत्त्वाच्या घटनांची पत्रके अधूनमधून वाटत असत. धर्मशाळांमध्ये उतरणारे प्रवासी, फिरस्ते तेथील स्थानिक लोकांना दूरवरच्या बातम्या रंगवून सांगत असत. राजांचे प्रतिनिधी वेगवेगळ्या ठिकाणी असत. ते ताज्या बातम्या राजदरबारात पाठवत.

**बेंगॉल गॅझेट :** भारतातील पहिले इंग्रजी वर्तमानपत्र २९ जानेवारी १७८० रोजी सुरू झाले. 'कलकत्ता जनरल ॲडव्हर्टायझर' किंवा 'बेंगॉल गॅझेट' या नावाने ते ओळखले जाते. जेम्स ऑगस्टस हिकी या आयरिश व्यक्तीने ते सुरू केले.



जेम्स ऑगस्टस हिकी

**दर्पण :** 'दर्पण' हे पत्र १८३२ साली मुंबईत सुरू झाले. बाळशास्त्री जांभेकर हे 'दर्पण'चे संपादक होते.

**यादी करा.**

स्वातंत्र्यपूर्व काळातील काही प्रमुख नेते व त्यांनी सुरू केलेली वर्तमानपत्रे यांची यादी करा.


बाळशास्त्री जांभेकर

'दर्पण'च्या अंकातील बातम्यांमधून आपणांस राजकीय, आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक इतिहास सापडतो. उदा., (१) 'कंपनी सरकारच्या तीन इलाख्यांतील जमाखर्चाची यादी (२) या देशावर रशियनांचा हल्ला होण्याचे भय (३) शहर साफ ठेवण्याकरिता मंडळीची नेमणूक (४) हिंदू विधवांचा पुनर्विवाह (५) कोलकाता येथे थिएटरची सुरुवात. (६) राजा राममोहन रॉय यांची इंग्लंडमधील कामगिरी. यावरून तत्कालीन परिस्थितीवर प्रकाश पडतो.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

'दर्पण' या पहिल्या मराठी पत्राचे संपादक या नात्याने बाळशास्त्री जांभेकरांना आद्यसंपादक म्हटले जाते. ६ जानेवारी हा त्यांचा जन्मदिवस 'पत्रकार दिन' म्हणून महाराष्ट्रात साजरा केला जातो.

**प्रभाकर :** हे वर्तमानपत्र भाऊ महाजन यांनी सुरू केले. त्यात फ्रेंचांच्या बंडाचा इतिहास (फ्रेंच राज्यक्रांती), लोकहितवादी (गोपाळ हरी देशमुख) यांची समाजप्रबोधनपर 'शतपत्रे' प्रसिद्ध झाली.

**ज्ञानोदय :** 'ज्ञानोदय' पत्रात १८४२ मध्ये आशिया खंडाचा व १८५१ मध्ये 'युरोपचा नकाशा' छापण्यात आला. मराठी वर्तमानपत्रात पहिले चित्र छापण्याचा मान ज्ञानोदयकडे जातो. विजेच्या साहाय्याने बातमी पोहचवण्याचे यंत्र म्हणजे टेलिग्राफ १८५२ पासून सुरू झाल्याची माहिती 'ज्ञानोदय' मधून मिळते. भारतात प्रथम रेल्वे सुरू झाली त्याची बातमी ज्ञानोदयमध्ये 'चाक्या म्हसोबा' शीर्षकांतर्गत छापून आली. १८५७ च्या संघर्षाच्या बातम्या या वर्तमानपत्रात छापल्या होत्या.

वर्तमानपत्र हे समाजप्रबोधनाचे कार्य करणारे महत्त्वाचे माध्यम होते. उदा., 'इंदूप्रकाश' पत्राने विधवा-विवाहाचा जोरदार पुरस्कार केला. बहुजनसमाजाचे मुखपत्र म्हणजे 'दीनबंधु', महात्मा जोतीराव फुले यांचे सहकारी कृष्णराव भालेकर यांनी हे पत्र सुरू केले. या पत्रातून आपणांस बहुजनसमाजाची समकालीन परिस्थिती समजते.

**करून पहा.**

वर्गातील प्रत्येक विद्यार्थ्याने एका बातमीचे कात्रण आणून त्याची वही तयार करा.

**केसरी आणि मराठा :** स्वातंत्र्यपूर्व काळातील भारतीय वर्तमानपत्रांच्या इतिहासातील महत्त्वाचा टप्पा 'केसरी' आणि 'मराठा' या वर्तमानपत्रांनी गाठला. १८८१ मध्ये गोपाळ गणेश आगरकर आणि बाळ गंगाधर टिळक यांनी ही पत्रे सुरू केली. या पत्रांनी तत्कालीन, सामाजिक आणि राजकीय प्रश्नांना वाचा फोडली. 'देशस्थिती, देशभाषेतील ग्रंथ व विलायतेतील राजकारण' या विषयांच्या संबंधाने केसरीने लेखन सुरू केले.

एकविसाव्या शतकात वर्तमानपत्रे लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून महत्त्वाची भूमिका बजावत आहेत.

**नियतकालिके :** ठरावीक कालावधीत प्रकाशित होणारे मुद्रित साहित्य म्हणजे नियतकालिक होय. यात साप्ताहिक, पाक्षिक, मासिक, द्वैमासिक, त्रैमासिक, षाण्मासिक, वार्षिक यांचा समावेश होतो.

याखेरीज अनियतकालिक हाही प्रकार रूढ आहे. अनियतकालिकांचा प्रसिद्धीचा काळ निश्चित नसतो.

**करून पहा.**

आधुनिक काळात अनेक वृत्तपत्रांनी तंत्रज्ञानाचा उपयोग करून इ-आवृत्त्या सुरू केलेल्या आहेत. त्यांना वाचकांमधून चांगला प्रतिसाद मिळत आहे.

शिक्षकांच्या मदतीने इ-वृत्तपत्रे कशी वाचायची ते समजून घ्या.

बाळशास्त्री जांभेकर यांनी मराठी भाषेतील पहिले मासिक 'दिग्दर्शन' सुरू केले. नियतकालिकांचा विचार करायचा झाल्यास 'प्रगति' (१९२९) साप्ताहिक महत्त्वाचे आहे. त्याचे संपादक त्र्यंबक शंकर शेजवलकर हे होते. त्यांनी 'प्रगति'मधून इतिहासशास्त्र, महाराष्ट्राचा इतिहास आणि सामाजिक चळवळी इत्यादी विविध विषयांवर विपुल लेखन केले.

आधुनिक काळात भारतीय इतिहासाशी संबंधित अनेक नियतकालिके निघत आहेत. उदा., मराठी भाषेतील 'भारतीय इतिहास आणि संस्कृती', 'मराठवाडा इतिहास परिषद पत्रिका' इत्यादी.

**चला शोधूया.**

वरील उदाहरणांव्यतिरिक्त महाराष्ट्र आणि केंद्र पातळीवर इतिहास संशोधनाशी निगडित असणाऱ्या संस्था/विद्यापीठे मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेत नियतकालिके प्रकाशित करतात. आंतरजालाच्या साहाय्याने त्यांचा शोध घ्या.

**वेब पत्रकारिता :** अत्याधुनिक नियतकालिकांमध्ये 'वेब पत्रकारिता' प्रकारात प्रसिद्ध होणाऱ्या नियतकालिकांचा समावेश होतो. यामध्येही 'इतिहास' हा प्राधान्याचा विषय असतो. वेब न्यूज पोर्टल्स, सोशल मिडिया, वेब चॅनेल्स, यू ट्यूब यांवर इंग्रजी आणि भारतीय भाषांमधून वाचक आणि प्रेक्षकांसाठी मजकूर उपलब्ध करून दिला जातो.

**आकाशवाणी :** स्वातंत्र्यपूर्व कालखंडात १९२४ मध्ये 'इंडियन ब्रॉडकास्टिंग कंपनी' (आयबीसी) या नावाने दर दिवशी कार्यक्रमांचे प्रसारण करणारे एक खासगी रेडिओ केंद्र सुरू झाले. नंतर ब्रिटिश सरकारने याच कंपनीचे 'इंडियन स्टेट ब्रॉडकास्टिंग सर्व्हिसेस' (आयएसबीएस) असे नामकरण केले. ८ जून १९३६ रोजी या कंपनीचे नामकरण 'ऑल इंडिया रेडिओ' (एआयआर) असे झाले.

भारत स्वतंत्र झाल्यावर AIR भारत सरकारच्या माहिती व प्रसारण खात्याचा एक भाग झाले. शासकीय कार्यक्रम व उपक्रमांची माहिती देणारे अधिकृत केंद्र असे याचे सुरुवातीला स्वरूप होते. ख्यातनाम कवी पंडित नरेंद्र शर्मा यांच्या सूचनेनुसार 'आकाशवाणी' हे नाव दिले गेले. आकाशवाणीतर्फे विविध मनोरंजनपर, प्रबोधनपर व साहित्यिक मूल्य असणारे कार्यक्रम सादर केले जातात. त्याचप्रमाणे शेतकरी, कामगार, युवक आणि स्त्रिया यांच्यासाठी विशेष कार्यक्रम प्रसारित केले जातात. 'विविधभारती' या लोकप्रिय रेडिओ सेवेद्वारे २४ भाषा आणि १४६ बोलीभाषांमध्ये कार्यक्रम सुरू झाले. अलीकडच्या काळात खासगी रेडिओ सेवा सुरू झाल्या आहेत. उदा., रेडिओ मिर्ची.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

२३ जुलै १९२७ रोजी भारतातले पहिले इंग्रजी न्यूज बुलेटीन मुंबई रेडिओ केंद्रावरून प्रसारित केले गेले. त्यानंतर कोलकात्यावरून बंगाली बातम्या सुरू झाल्या.

**दूरदर्शन :** १५ सप्टेंबर १९५९ रोजी भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ.राजेंद्रप्रसाद यांनी 'दिल्ली दूरदर्शन केंद्रा'चे उद्‌घाटन केले. महाराष्ट्रात १ मे १९७२ रोजी मुंबई केंद्राचे कार्यक्रम सुरू झाले. १५ ऑगस्ट १९८२ या दिवशी रंगीत दूरदर्शनचे आगमन झाले. १९९१ मध्ये परदेशी व देशी खासगी वाहिन्यांना केबल तंत्राच्या माध्यमातून कार्यक्रम प्रसारित करण्याची परवानगी दिली गेली. आजमितीला भारतीय प्रेक्षकांसाठी १०० हून अधिक वाहिन्या उपलब्ध आहेत.

## ५.३ प्रसारमाध्यमांची आवश्यकता

माहितीचा मुक्त प्रवाह समाजात पसरवण्यासाठी प्रसारमाध्यमांची आवश्यकता असते. अग्रलेख, विविध सदरे, पुरवण्या हे वर्तमानपत्राचे अविभाज्य भाग असतात. वाचकांच्या पत्रव्यवहाराच्या माध्यमातून वाचकही आपले म्हणणे मांडत असतात. लोकशाही अधिक सुदृढ होण्यास वर्तमानपत्रे मदत करू शकतात.

दूरदर्शन हे दृक्-श्राव्य माध्यम असल्याने त्याने वर्तमानपत्र आणि आकाशवाणी यांच्या मर्यादा ओलांडून जनतेला 'प्रत्यक्ष काय घडले' हे दाखवायला सुरुवात केली. जनतेला एखाद्या घटनेचा 'आँखो देखा हाल' पाहण्यासाठी दूरदर्शनला पर्याय नाही.



**करून पहा.**

सध्याच्या काळातील विविध दूरचित्रवाणीवरील वाहिन्यांची माहिती आपल्या मित्रांच्या गटात गटकार्य म्हणून लिहून काढा.


## ५.४ प्रसारमाध्यमांद्‌वारे मिळणाऱ्या माहितीचे चिकित्सक आकलन

प्रसारमाध्यमांद्‌वारे मिळणाऱ्या माहितीचे चिकित्सक आकलन करून घ्यावे लागते. प्रत्येक वेळी वर्तमानपत्रांमधून आपणांसमोर येणारी माहिती वास्तवाला धरून असेलच असे नाही. आपणांस ती तपासून घ्यावी लागते. अनधिकृत बातमी प्रसिद्ध होण्याचे एक जगप्रसिद्ध उदाहरण आहे. 'स्टर्न' नावाच्या एका जर्मन साप्ताहिकाने ॲडॉल्फ हिटलरच्या हस्ताक्षरातील अनेक रोजनिशी विकत घेतल्या आणि त्या इतर प्रकाशक कंपन्यांना विकल्या. हिटलरच्या या तथाकथित हस्तलिखित रोजनिशी मिळाल्याची बातमी प्रसिद्ध झाली. परंतु त्या रोजनिशा नकली असल्याचे सिद्ध झाले. यामुळे प्रसारमाध्यमांमधून मिळणारी माहिती वापरताना काळजी घ्यावी लागते.

## ५.५ संबंधित व्यावसायिक क्षेत्रे

वर्तमानपत्रांना रोजच्या रोज ताज्या बातम्या वाचकांपर्यंत पोहचवायच्या असतात. हे काम करत असताना 'बातमी मागची बातमी' सांगावी लागते. अशा वेळी वर्तमानपत्रांना इतिहासाची गरज पडते. एखाद्या बातमीचा सविस्तर आढावा घेताना भूतकाळात तशाच स्वरूपाची एखादी घटना इतरत्र घडली असल्यास वर्तमानपत्रे ती बातमीमध्ये चौकट देऊन छापतात. तेव्हा वाचकाला जादा माहिती मिळते आणि घटनेच्या मुळापर्यंत जाता येते.

वर्तमानपत्रांमधील सदरांमध्ये पन्नास वर्षांपूर्वी, शंभर वर्षांपूर्वी अशा प्रकारची सदरे असतात. ती इतिहासाची साधने आणि इतिहासावर आधारित असतात. या प्रकारच्या सदरांमधून आपणांस भूतकाळातील आर्थिक, सामाजिक, राजकीय, ऐतिहासिक घटना समजतात. भूतकाळाच्या पार्श्वभूमीवर वर्तमान कळण्यास मदत होते.



वर्तमानपत्रांना विशेष प्रसंगी पुरवण्या किंवा विशेषांक काढावे लागतात. उदा., १९१४ मध्ये पहिले महायुद्‌ध सुरू झाले त्याला २०१४ मध्ये १०० वर्षे पूर्ण झाली. त्या युद्‌धाचा सर्वंकष आढावा घेणारी पुरवणी काढताना त्या घटनेचा इतिहास माहीत असावा लागतो. १९४२ च्या 'चले जाव' आंदोलनाला २०१७ मध्ये ७५ वर्षे पूर्ण झाली. अशा प्रसंगी वर्तमानपत्रे लेख, अग्रलेख, दिनविशेष, आढावा यांच्याद्‌वारे त्या घटनेचा वेध घेतात. त्या वेळी इतिहासाचा अभ्यास उपयोगी पडतो.



**करून पहा.**

वर्तमानपत्रे कोड्यांसाठी सुद्‌धा इतिहासाचा आधार घेतात. तुम्ही सुद्‌धा वेगवेगळी शब्दकोडी तयार करण्याचा प्रयत्न करून पहा. उदा., किल्ल्यांची नावे वापरून केलेली शब्दकोडी.

आकाशवाणीसाठी सुद्‌धा इतिहास हा महत्त्वाचा विषय असतो. उदा., १५ ऑगस्ट १९४७ किंवा त्यानंतरच्या प्रधानमंत्र्यांची स्वातंत्र्य दिनानिमित्तची भाषणे आकाशवाणीच्या संग्रहात असून त्याचा समकालीन परिस्थिती समजण्यासाठी उपयोग होतो.

**जाणून घ्या.**

१९४२ च्या चळवळीत भूमिगत रेडिओ केंद्रांनी बजावलेल्या कामगिरीची माहिती शिक्षकांच्या मदतीने मिळवा.

आकाशवाणीला काही विशेष कार्यक्रम प्रसंगी इतिहासाच्या अभ्यासकांची गरज लागते. राष्ट्रीय नेत्यांची जयंती वा पुण्यतिथी, एखाद्या ऐतिहासिक घटनेस १ वर्ष, २५ वर्षे, ५० वर्षे, १०० वर्षे वा त्यापेक्षा त्या पटीत जास्त वर्षे पूर्ण होत असतील तर त्याची चर्चा करण्यासाठी त्या घटनेची माहिती लागते. राष्ट्रीय नेत्यांच्या कार्यावर भाषणे देण्यासाठी वक्त्यांना इतिहासाचा आधार घ्यावा लागतो. आकाशवाणीवरही दिनविशेष कार्यक्रम प्रसारित होतो.

दूरदर्शन आणि इतिहासाचे जवळचे नाते आहे. इतिहासाच्या संदर्भात आवड निर्माण करण्याचे आणि जागृती करण्याचे महत्त्वाचे काम दूरदर्शन आणि इतर वाहिन्या करतात. दूरदर्शनवरील रामायण, महाभारत अशा पौराणिक मालिका तसेच भारत एक खोज, राजा शिवछत्रपती या ऐतिहासिक मालिकांनी फार मोठा प्रेक्षकवर्ग आकर्षित केला. रामायण-महाभारत सारख्या मालिकांची निर्मिती करताना तत्कालीन वातावरण, वेषभूषा, शस्त्रास्त्रे, राहणीमान, भाषा यांसंबंधींच्या जाणकारांच्या मदतीची गरज लागते. त्यासाठी इतिहासाचा बारकाईने अभ्यास करावा लागतो.

आधुनिक काळात डिस्कव्हरी, नॅशनल जिऑग्राफी, हिस्टरी यांसारख्या चॅनेल्सवर प्रसारित होणाऱ्या मालिकांमधून जगभरच्या इतिहासाचा खजिना प्रेक्षकांसाठी खुला केला गेला आहे. त्याद्‌वारे लोक जगाचा इतिहास आणि भूगोल घरबसल्या जाणून घेऊ शकतात. या मालिका अधिक रंजक होण्यासाठी काही वेळा इतिहासातील निवडक भागाचे व्यक्तिरेखांच्या माध्यमातून सादरीकरण केले जाते. उदा., कर्तृत्ववान स्त्री-पुरुष, खेळाडू, सेनानी, इत्यादी. त्याखेरीज वास्तू, किल्ले साम्राज्यांचे उदयास्त इतकेच नव्हे तर पाककलेच्या इतिहासावरील मालिकाही लोक उत्सुकतेने पाहतात.

वरील सर्वच क्षेत्रांसाठी इतिहासाच्या सखोल अभ्यासाची गरज असते.

**जाणून घ्या.**

भारताच्या प्राचीन ते अर्वाचीन इतिहासाच्या संदर्भात दूरदर्शनवरून प्रसारित झालेली 'भारत एक खोज' ही मालिका महत्त्वाची आहे. पंडित नेहरू यांच्या 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' या ग्रंथावर आधारित ही मालिका होती. श्याम बेनेगल दिग्दर्शित या मालिकेने प्राचीन काळ ते अर्वाचीन काळाचा सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय इतिहास मांडला. सखोल संशोधन आणि सादरीकरण या पातळीवर ही मालिका सरस ठरली.

हडप्पा संस्कृती, वैदिक काळ, रामायण-महाभारताचा अन्वयार्थ, मौर्य कालखंड, तुर्क-अफगाण आणि मोगलांचे आक्रमण, मुघल कालखंड आणि मुघल बादशहांचे योगदान, भक्तिचळवळ, छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य, समाजसुधारणा चळवळी आणि स्वातंत्र्यसंग्राम अशा अनेक घटना या मालिकेतून मांडल्या गेल्या.

या मालिकेत नाट्य, लोककला, प्रबोधनपर माहिती असा आधार घेत नेहरूंच्या रूपातील कलावंत रोशन सेठ प्रास्ताविक व अन्वयार्थ सांगत असत. नेहरूंचा इतिहासाकडे बघण्याचा दृष्टिकोन आणि त्याचे प्रभावी सादरीकरण यामुळेही मालिका संपूर्ण भारतभर वाखाणली गेली.



## स्वाध्याय

**१. (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

(१) भारतातील पहिले इंग्रजी वर्तमानपत्र ........... यांनी सुरू केले.
(अ) जेम्स ऑगस्टस हिकी
(ब) सर जॉन मार्शल (क) ॲलन ह्यूम

(२) दूरदर्शन हे .......... माध्यम आहे.
(अ) दृक् (ब) श्राव्य
(क) दृक्-श्राव्य

**(ब) पुढीलपैकी चुकीची जोडी दुरुस्त करून पुन्हा लिहा.**

(१) प्रभाकर - आचार्य प्र.के.अत्रे
(२) दर्पण - बाळशास्त्री जांभेकर
(३) दीनबंधु - कृष्णराव भालेकर
(४) केसरी - बाळ गंगाधर टिळक

**२. टीपा लिहा.**

(१) वर्तमानपत्रांचे स्वातंत्र्य संग्रामातील कार्य
(२) प्रसारमाध्यमांची आवश्यकता
(३) प्रसारमाध्यमांशी संबंधित व्यावसायिक क्षेत्रे

**३. पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

(१) प्रसारमाध्यमांद्वारे मिळणाऱ्या माहितीचे चिकित्सक आकलन करून घ्यावे लागते.
(२) वर्तमानपत्रांना इतिहास या विषयाची गरज पडते.
(३) सर्व प्रसारमाध्यमांत दूरदर्शन अतिशय लोकप्रिय माध्यम आहे.

**४. पुढील प्रश्नांची २५ ते ३० शब्दांत उत्तरे लिहा.**

(१) वर्तमानपत्रांची उद्दिष्टे स्पष्ट करा.
(२) आकाशवाणीसाठी इतिहास हा विषय कसा महत्त्वाचा आहे, हे स्पष्ट करा.

**५. पुढील उताऱ्याचे वाचन करून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**आकाशवाणी :** स्वातंत्र्यपूर्व कालखंडात १९२४ मध्ये 'इंडियन ब्रॉडकास्टिंग कंपनी' (आयबीसी) या नावाने दर दिवशी कार्यक्रमांचे प्रसारण करणारे एक खासगी रेडिओ केंद्र सुरू झाले. नंतर ब्रिटिश सरकारने याच कंपनीचे 'इंडियन स्टेट ब्रॉडकास्टिंग सर्व्हिसेस' (आयएसबीएस) असे नामकरण केले. ८ जून १९३६ रोजी या कंपनीचे नामकरण 'ऑल इंडिया रेडिओ' (एआयआर) असे झाले.

भारत स्वतंत्र झाल्यावर AIR भारत सरकारच्या माहिती व प्रसारण खात्याचा एक भाग झाले. शासकीय कार्यक्रम व उपक्रमांची माहिती देणारे अधिकृत केंद्र असे याचे सुरुवातीला स्वरूप होते. ख्यातनाम कवी पंडित नरेंद्र शर्मा यांच्या सूचनेनुसार 'आकाशवाणी' हे नाव दिले गेले. आकाशवाणीतर्फे विविध मनोरंजनपर, प्रबोधनपर व साहित्यिक मूल्य असणारे कार्यक्रम सादर केले जातात. त्याचप्रमाणे शेतकरी, कामगार, युवक आणि स्त्रिया यांच्यासाठी विशेष कार्यक्रम प्रसारित केले जातात. 'विविधभारती' या लोकप्रिय रेडिओ सेवेद्वारे २४ भाषा आणि १४६ बोलीभाषांमध्ये कार्यक्रम सुरू झाले. अलीकडच्या काळात खासगी रेडिओ सेवा सुरू झाल्या आहेत. उदा., रेडिओ मिर्ची.

(१) आकाशवाणी कोणत्या खात्यांतर्गत येते ?
(२) IBC चे नामकरण काय झाले ?
(३) विविधभारतीवरून किती भाषा व बोलीभाषांमध्ये कार्यक्रम सादर होतात ?
(४) आकाशवाणी हे नाव कसे पडले ?

## ६. संकल्पनाचित्र तयार करा.

| | वर्तमानपत्रे | आकाशवाणी | दूरदर्शन |
|---|---|---|---|
| सुरुवात/ पार्श्वभूमी | | | |
| माहितीचे/ कार्यक्रमांचे स्वरूप | | | |
| कार्ये | | | |

**उपक्रम**

तुम्ही पाहिलेल्या एखाद्या ऐतिहासिक मालिकेचे परीक्षण करा.

2AYI4T

# ६. मनोरंजनाची माध्यमे आणि इतिहास

६.१ मनोरंजनाची आवश्यकता
६.२ लोकनाट्य
६.३ मराठी रंगभूमी
६.४ भारतीय चित्रपटसृष्टी
६.५ मनोरंजन क्षेत्रातील व्यावसायिक संधी

मनाला विरंगुळा मिळवून देणाऱ्या गोष्टी म्हणजे मनोरंजनाची साधने होत. निरनिराळे छंद, खेळ, नाटक-चित्रपटादी करमणुकीची साधने, लेखन-वाचनादी सवयी इत्यादींचा अंतर्भाव मनोरंजनात होतो.

## ६.१ मनोरंजनाची आवश्यकता

उत्तम प्रतीचे निखळ मनोरंजन व्यक्तीच्या निकोप वाढीसाठी महत्त्वाचे असते. चाकोरीबद्ध जगण्यातील कंटाळा दूर करून मनाला चैतन्य, ताजेपणा, शरीराला उत्साह व कार्यशक्ती मिळवून देण्याचे काम मनोरंजन करते. छंद वा खेळांची जोपासना केल्याने व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो. भारतात प्राचीन व मध्ययुगीन काळात उत्सव, सण-सोहळे, खेळ, नाच-गाणे इत्यादी मनोरंजनाची साधने होती.

आधुनिक काळात मनोरंजनाची अनेक साधने उपलब्ध आहेत.

**यादी करूया.**

मनोरंजनाचे विविध प्रकार सांगून त्यांचे वर्गीकरण करा.

मनोरंजनाचे दोन प्रकारांत वर्गीकरण करता येते. कृतिशील आणि अकृतिशील. कृतिशील रंजन म्हणजे एखाद्या क्रियेमध्ये त्या व्यक्तीचा प्रत्यक्ष शारीरिक-मानसिक सहभाग होय. हस्तव्यवसाय, खेळ ही कृतिशील मनोरंजनाची उदाहरणे आहेत.

आपण जेव्हा खेळाचा सामना पाहतो, संगीत ऐकतो, चित्रपट पाहतो तेव्हा ते मनोरंजन अकृतिशील पातळीवर असते. आपण त्यामध्ये फक्त प्रेक्षक असतो.



**करून पहा.**

इतिहास विषयाशी निगडित कृतिशील आणि अकृतिशील मनोरंजनाचा तक्ता तयार करा.

## ६.२ लोकनाट्य

**कठपुतळ्यांचा प्रयोग :** मोहेंजोदडो, हडप्पा, ग्रीस व इजिप्त येथील उत्खननात मातीच्या बाहुल्यांचे अवशेष सापडले आहेत. त्या कठपुतळ्याप्रमाणे



कळसूत्री बाहुल्यांचा खेळ

वापरल्या असण्याची शक्यता आहे. यावरून हा खेळ प्राचीन आहे हे समजते. पंचतंत्र व महाभारतात या खेळाचा उल्लेख आहे.

प्राचीन भारतात या बाहुल्या बनवण्यासाठी लाकूड, लोकर, कातडे, शिंगे व हस्तिदंत यांचा वापर करत असत. या खेळाच्या राजस्थानी व दाक्षिणात्य अशा दोन पद्धती आहेत.

उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, राजस्थान, आसाम,

पश्चिम बंगाल, आंध्रप्रदेश, तेलंगणा, कर्नाटक, केरळ या राज्यांत कठपुतळीचे प्रयोग करणारे कलावंत आहेत. कठपुतळीचा प्रयोग रंगण्यासाठी सूत्रधाराचे कौशल्य अत्यंत महत्वाचे असते. लहान रंगमंच, प्रकाश व ध्वनी यांचा सूचक उपयोग यात करतात. छाया-बाहुली, हात-बाहुली, काठी-बाहुली आणि सूत्र-बाहुली असे याचे प्रकार आहेत.

**दशावतारी नाटके :** दशावतारी नाटके हा महाराष्ट्रातील लोकनाट्याचा एक प्रकार आहे. सुगीनंतर कोकण आणि गोवा येथे दशावतारी नाटकांचे प्रयोग होतात. दशावतारी नाटके मत्स्य, कूर्म, वराह, नरसिंह, वामन, परशुराम, राम, कृष्ण, बुद्ध व कल्की या दहा अवतारांवर आधारित असतात. सर्वप्रथम सूत्रधार विघ्नहर्ता गणपतीला आवाहन करतो.

दशावतारी नाटकातील पात्रांचा अभिनय, रंगभूषा, वेशभूषा, परंपरागत असते. नाटकातील बहुतेक भाग पद्यमय असतो. काही संवाद पात्रे स्वयंस्फूर्तीने बोलतात. देवांसाठी लाकडी मुखवटे वापरतात. नाटकाचा शेवट हंडी फोडून दहीकाला वाटणे व आरती करणे या कृतीने होतो.



दशावतारी नाटक

१८ व्या शतकात श्यामजी नाईक काळे यांनी दशावतारी खेळ दाखवणारा एक फड स्थापन केला होता. तो फड घेऊन ते महाराष्ट्रभर फिरत असत.

विष्णुदास भावे यांनी दशावतारी नाट्यतंत्राचे संस्करण करून आपली पौराणिक नाटके सादर केली. यामुळे मराठी नाटकाची पूर्वपीठिका दशावतारी नाटकांपर्यंत जाते.

**भजन :** टाळ, मृदंग किंवा पखवाज इत्यादी वाद्यांच्या साथीत ईश्वरगुणवर्णनपर व नामस्मरणपर काव्यरचना गाणे यास भजन म्हणतात. भजनाचे चक्री भजन आणि सोंगी भजन हे दोन प्रकार आहेत.

चक्री भजन : न थांबता चक्राकार फिरत भजने म्हणणे.

सोंगी भजन : देवभक्ताची भूमिका घेऊन संवादस्वरूपात भजने म्हणणे.

अलीकडच्या काळात संत तुकडोजी महाराजांनी 'खंजिरी भजन' लोकप्रिय केले.

उत्तर भारतात संत तुलसीदास, महाकवी सूरदास, संत मीराबाई आणि संत कबीर यांची भजने प्रसिद्ध आहेत.



**करून पहा.**

तुलसीदास, सूरदास, मीराबाई आणि कबीर या संतांची भजने ऐका व ती संगीत शिक्षकांच्या किंवा जाणकारांच्या मदतीने समजून घ्या.

कर्नाटकात पुरंदरदास, कनकदास, विजयदास, बोधेंद्रगुरूस्वामी, त्यागराज आदींच्या रचना भजनामध्ये गायल्या जातात.

गुजरातमध्ये संत नरसी मेहता यांनी भक्ती संप्रदायास चालना दिली. महाराष्ट्रात संत नामदेवांनी वारकरी पंथाच्या माध्यमातून भजन-कीर्तनास प्रोत्साहन दिले. वारकरी संप्रदायाने नामस्मरणाचा प्रकार म्हणून भजनास वैभव प्राप्त करून दिले.

**कीर्तन :** परंपरेनुसार कीर्तनपरंपरेचे आद्य प्रवर्तक नारदमुनी होत असे मानले जाते. संत नामदेवांना महाराष्ट्राचे आद्य कीर्तनकार मानतात. त्यांच्यानंतर अन्य संतांनी या परंपरेचा प्रसार केला.

कीर्तनकारास हरिदास किंवा कथेकरीबुवा म्हणतात. कीर्तन करणाऱ्यास पोशाख, विद्वत्ता,

वक्तृत्व, गायन, वादन, नृत्य, विनोद यांकडे लक्ष द्यावे लागते. त्याच्या अंगी बहुश्रुतता असावी लागते. कीर्तन मंदिरात किंवा मंदिराच्या परिसरात केले जाते.

**माहीत करून घ्या.**

कीर्तनाच्या नारदीय अथवा हरिदासी आणि वारकरी या दोन मुख्य परंपरा आहेत. हरिदासी कीर्तन एकपात्री प्रयोगासारखे असते. या कीर्तनात 'पूर्वरंग' व 'उत्तररंग' असतात. नमन, निरूपणाचा अभंग व निरूपण याला पूर्वरंग आणि उदाहरणादाखल एखादे आख्यान सांगणे याला उत्तररंग म्हणतात. वारकरी कीर्तनात सामूहिकतेवर भर असतो. कीर्तनकारांबरोबर टाळकऱ्यांचा सहभाग महत्त्वाचा असतो. स्वातंत्र्य चळवळीच्या काळात राष्ट्रीय कीर्तन नावाचा नवा प्रकार पुढे आला. हे कीर्तन नारदीय कीर्तनाप्रमाणेच सादर केले जाते. त्यामध्ये स्वातंत्र्य चळवळीतील नेते, शास्त्रज्ञ, समाजसुधारक अशा थोर लोकांच्या चरित्राच्या आधारे समाजप्रबोधन करण्यावर भर असतो. त्याची सुरुवात वाईचे दत्तोपंत पटवर्धन यांनी केली.

याशिवाय महात्मा जोतीराव फुले प्रणित सत्यशोधक समाजानेही कीर्तनाच्या माध्यमातून समाजजागृतीचे कार्य केले. संत गाडगे महाराजांची कीर्तने सत्यशोधकी कीर्तनाशी नाते सांगणारी होती. जातिभेद निर्मूलन, स्वच्छता, व्यसनमुक्ती यांसारख्या विषयांवर ते त्यांच्या कीर्तनातून प्रबोधन करत असत.

**ललित :** महाराष्ट्रातील मनोरंजनाचा एक जुना प्रकार म्हणजे ललित. नारदीय कीर्तन परंपरेत या प्रकाराचा समावेश होतो. कोकण आणि गोवा भागात याचे महत्त्व खूप आहे.

ललिताच्या सादरीकरणामध्ये धार्मिक उत्सवप्रसंगी उत्सवदेवता सिंहासनावर बसली आहे असे मानून तिच्यासमोर मागणे मागतात. ***'ज्याला जे हवे असेल त्याला ते मिळो । सगळा गाव आनंदाने पुढच्या ललितापर्यंत नांदो । आपापसांतले कलह ललितात मिटोत । कोणाच्याही मनात किल्मिष न उरो । निकोप मनाने व्यवहार चालोत । सदाचरणाने समाज वागो ।'*** अशा प्रकारचे हे मागणे असते.

नाट्यप्रवेशाप्रमाणे ललित सादर केले जाते. त्यामध्ये कृष्ण व रामकथा आणि भक्तांच्या कथा सांगतात. काही ललिते हिंदी भाषेतही आहेत. आधुनिक मराठी रंगभूमीला ललिताची पार्श्वभूमी आहे.

**भारुड :** आध्यात्मिक व नैतिक शिकवण देणारे मराठीतील रूपकात्मक गीत म्हणजे भारुड होय. पथनाट्याप्रमाणे भारुड प्रयोगशील असते. महाराष्ट्रात संत एकनाथांची भारुडे विविधता, नाट्यात्मता, विनोद आणि गेयता यांमुळे लोकप्रिय झाली. लोकशिक्षण हा संत एकनाथांचा भारुडे रचण्याचा उद्देश होता.

**तमाशा :** 'तमाशा' हा शब्द मुळात पर्शियन भाषेतील आहे. चित्ताला प्रसन्नता देणारे दृश्य असा याचा अर्थ आहे. विविध लोककला आणि अभिजात कलांचे प्रवाह सामावून घेत अठराव्या शतकापर्यंत तमाशा विकसित झाला. पारंपरिक तमाशाचे दोन प्रकार आहेत – संगीत बारी आणि ढोलकीचा फड. संगीत बारीमध्ये नाट्यापेक्षा नृत्य आणि संगीतावर अधिक भर असतो. प्राधान्याने नृत्य-संगीताचा समावेश असलेल्या तमाशात कालांतराने 'वग' या नाट्यरूपाचा समावेश केला गेला. उत्स्फूर्त विनोदाच्या आधाराने वग रंगत जातो. तमाशाच्या सुरुवातीला 'गण' म्हणजे गणेशवंदना गायली जाते. त्यानंतर 'गवळण' सादर केली जाते. तमाशाच्या दुसऱ्या भागात मुख्य नाटक म्हणजे 'वग' सादर केला जातो. 'विच्छा माझी पुरी करा' आणि 'गाढवाचे लग्न'

यांसारखे मराठी रंगभूमीवर गाजलेले प्रयोग हे तमाशाचे आधुनिक स्वरूप दर्शवतात.

**पोवाडा :** हा एक गद्यपद्यमिश्रित सादरीकरणाचा प्रकार आहे. पोवाड्यामध्ये शूर स्त्री-पुरुषांच्या पराक्रमाचे आवेशयुक्त व स्फूर्तिदायक भाषेत कथन केले जाते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील अज्ञानदास या कवीने अफझलखान वधाविषयी रचलेला आणि तुळशीदासाने रचलेला सिंहगडच्या लढाईचा पोवाडा प्रसिद्ध आहे.

ब्रिटिशांच्या काळात उमाजी नाईक, चापेकर बंधू, महात्मा गांधी यांच्यावर पोवाडे रचले गेले. संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या काळात अमर शेख, अण्णाभाऊ साठे आणि गवाणकर या शाहिरांनी रचलेल्या पोवाड्यांनी महाराष्ट्र गाजवला आणि पोवाड्यांच्या माध्यमातून जागृती करण्यात आली.

## ६.३ मराठी रंगभूमी

ललित कला व्यक्तीने किंवा समुदायाने सादर करण्याचे स्थान म्हणजे रंगभूमी. ललित कलेमध्ये कलावंत आणि प्रेक्षक या दोहोंचा सहभाग आवश्यक असतो. नाट्यसंहिता, नाट्यदिग्दर्शक, कलावंत, रंगभूषा, वेशभूषा, रंगमंच, नेपथ्य, प्रकाशयोजना, नाट्यप्रयोगाचा प्रेक्षक आणि समीक्षक असे अनेक घटक रंगभूमीशी संबंधित असतात. नृत्य आणि संगीत यांचाही समावेश नाटकामध्ये असू शकतो. नाटक हे बहुतेक वेळा संवादांद्वारे सादर केले जाते. परंतु काही नाटकांमध्ये मूकाभिनय सुद्धा असतो. या प्रकाराला मूकनाट्य असे म्हणतात.

छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, महात्मा जोतीराव फुले, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनाशी निगडित नाटकांची माहिती मिळवा.

तंजावरच्या भोसले राजवंशाने मराठी व दाक्षिणात्य भाषांमध्ये नाटकांना उत्तेजन दिले. त्या राजवंशातील राजांनी स्वतः नाटके लिहिली तसेच संस्कृत नाटकांची भाषांतरे केली.

महाराष्ट्रातील रंगभूमीच्या विकासात १९व्या शतकाचे स्थान महत्त्वाचे आहे. विष्णुदास भावे मराठी रंगभूमीचे जनक म्हणून ओळखले जातात. 'सीतास्वयंवर' हे त्यांनी रंगभूमीवर आणलेले पहिले नाटक होय. विष्णुदास भाव्यांनी लिहिलेल्या नाटकांनंतर महाराष्ट्रात ऐतिहासिक, पौराणिक नाटकांबरोबरच हलक्याफुलक्या पद्धतीची प्रहसन प्रकारातील नाटकेही रंगभूमीवर आली. त्यामध्ये विनोदी पद्धतीने सामाजिक विषय सादर केले जात.

सुरुवातीच्या नाटकांच्या संहिता लिखित स्वरूपात नसत. बऱ्याचदा त्यातील गीते लिहिलेली असली तरी गद्य संवाद उत्स्फूर्त स्वरूपाचे असत. मुद्रित स्वरूपात संहिता उपलब्ध असणारे पहिले नाटक वि.ज.कीर्तने यांनी १८६१ साली लिहिलेले 'थोरले माधवराव पेशवे' हे होय. या नाटकामुळे संपूर्ण लिखित संहिता असलेल्या नाटकांची नवी परंपरा सुरू झाली.

एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या पर्वात उत्तर हिंदुस्थानातील ख्याल संगीत महाराष्ट्रात रुजवण्याचे काम बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर यांनी केले. त्यांच्यानंतर उस्ताद अल्लादियाँ खाँ, उस्ताद अब्दुल करीम खाँ आणि उस्ताद रहिमत खाँ यांनी महाराष्ट्रातील रसिकांमध्ये संगीताची आवड निर्माण केली. त्याचा परिणाम होऊन संगीत रंगभूमीचा उदय झाला. किर्लोस्कर मंडळी या नाटक कंपनीची संगीत नाटके लोकप्रिय झाली. त्यामध्ये 'संगीत शाकुंतल' हे अण्णासाहेब किर्लोस्करांनी लिहिलेले नाटक अतिशय गाजले. संगीत नाटकांमध्ये गोविंद बल्लाळ देवल यांनी लिहिलेले 'संगीत शारदा' हे नाटक अत्यंत महत्त्वाचे आहे. या नाटकात जरठकुमारी विवाह या तत्कालीन अनिष्ठ प्रथेवर विनोदी पद्धतीने परंतु मार्मिक टीका केली आहे. याखेरीज श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांचे 'मूकनायक', कृष्णाजी प्रभाकर

खाडिलकर यांचे 'संगीत मानापमान', राम गणेश गडकरी यांचे 'एकच प्याला' ही नाटके रंगभूमीच्या इतिहासात महत्त्वाची आहेत.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

महाभारत या महाकाव्यातील घटना घेऊन तत्कालीन ब्रिटिश साम्राज्यशाहीवर सूचक टीका करणारे 'कीचकवध' हे नाटक खाडिलकर यांनी लिहिले. कीचकवधातील द्रौपदी म्हणजे असहाय्य भारतमाता, युधिष्ठिर म्हणजे मवाळ पक्ष, भीम म्हणजे जहाल पक्ष आणि कीचक म्हणजे सत्तांध व्हाईसरॉय लॉर्ड कर्झन अशा रूपकात प्रेक्षक हे नाटक पाहत आणि त्यांच्या मनात ब्रिटिश साम्राज्यशाहीबद्दल चीड निर्माण होई.

मराठी रंगभूमीच्या पडत्या काळात आचार्य अत्रे यांच्या 'साष्टांग नमस्कार', 'उद्याचा संसार', 'घराबाहेर' यांसारख्या लोकप्रिय नाटकांनी रंगभूमीला सावरण्यास मदत केली. अलीकडच्या काळात झालेली वसंत कानेटकर यांचे 'रायगडाला जेव्हा जाग येते', 'इथे ओशाळला मृत्यू', विजय तेंडुलकर यांचे 'घाशीराम कोतवाल', विश्राम बेडेकर यांचे 'टिळक आणि आगरकर' इत्यादी नव्या धर्तीची नाटके प्रसिद्ध आहेत.

विविध विषयांवरील नाटके व नाट्यप्रकारांच्या आविष्कारांमुळे मराठी रंगभूमी समृद्ध झाली. नाट्यकलावंत म्हणून गणपतराव जोशी, बालगंधर्व तथा नारायणराव राजहंस, केशवराव भोसले, चिंतामणराव कोल्हटकर, गणपतराव बोडस इत्यादींची नावे अग्रक्रमाने घेतली जातात. त्यांची मराठी नाटके मोकळ्या पटांगणात होत असत. ब्रिटिशांनी प्रथम मुंबईत 'प्ले हाऊस', 'रिपन', 'व्हिक्टोरिया' ही नाट्यगृहे बांधली. त्यानंतर हळूहळू मराठी नाटकांचे प्रयोगही बंदिस्त नाट्यगृहांत होऊ लागले.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

ख्यातनाम साहित्यकार वि.वा.शिरवाडकर तथा कुसुमाग्रज यांनी शेक्सपिअरच्या 'किंग लिअर' नाटकाच्या धर्तीवर लिहिलेले 'नटसम्राट' हे नाटक खूप गाजले. या नाटकातील शोकात्म नायक गणपतराव बेलवलकर हे पात्र शिरवाडकरांनी पूर्वीच्या काळी गाजलेले गणपतराव जोशी आणि नानासाहेब फाटक या नटश्रेष्ठांच्या व्यक्तिमत्त्वामधील रंगछटांची सरमिसळ करून निर्माण केले होते.

## ६.४ भारतीय चित्रपटसृष्टी

**चित्रपट :** चित्रपट हे कलात्मकता व तंत्रज्ञान यांचा संगम असलेले माध्यम आहे. चलत्‌चित्रणाचा शोध लागल्यावर चित्रपटकलेचा जन्म झाला. यातून मूकपटांचे युग निर्माण झाले. पुढे ध्वनिमुद्रण शक्य झाले आणि बोलपटांचे युग आले.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

चित्रपट प्रकार - व्यंगचित्रपट, वार्तापट, अनुबोधपट, प्रसिद्धीपट, बालचित्रपट, सैनिकी चित्रपट, शैक्षणिक चित्रपट, कथाचित्ती इत्यादी.

भारतात पहिला पूर्ण लांबीचा चित्रपट तयार करण्याचा आणि प्रदर्शित करण्याचा मान महाराष्ट्राकडे जातो. 'भारतीय चित्रपटांची जननी' अशी महाराष्ट्राची ख्याती आहे. भारतीय चित्रपटांच्या विकासात मदनराव माधवराव पितळे, कल्याणचे पटवर्धन कुटुंबीय आणि हरिश्चंद्र सखाराम भाटवडेकर उर्फ सावेदादा यांचे योगदान आहे.

पुढे दिग्दर्शक गोपाळ रामचंद्र तथा दादासाहेब तोरणे आणि अ.प.करंदीकर, एस.एन.पाटणकर, व्ही. पी.दिवेकर यांनी परदेशी तंत्रज्ञांचे साहाय्य घेऊन 'पुंडलिक' हा कथापट १९१२ मध्ये मुंबईत दाखवला. १९१३ मध्ये दादासाहेब फाळके यांनी स्वतः दिग्दर्शित



दादासाहेब तोरणे

केलेला आणि सर्व प्रक्रिया भारतात पूर्ण केलेला 'राजा हरिश्चंद्र' हा चित्रपट मुंबई येथे प्रदर्शित केला. त्यापाठोपाठ मोहिनी-भस्मासूर, सावित्री-सत्यवान हे मूकपट आणि वेरूळची लेणी व नाशिक आणि त्र्यंबकेश्वर ही तीर्थक्षेत्रे यांवर फाळके यांनी अनुबोधपट तयार केले. येथून पुढे ऐतिहासिक आणि पौराणिक विषयांवरचे चित्रपट तयार करण्याची परंपरा सुरू झाली.



दादासाहेब फाळके

पुढे भारतात पहिला सिने-कॅमेरा तयार करणारे आनंदराव पेंटर यांनी चित्रपट निर्मितीत रस दाखवला. त्यांचे मावस बंधू बाबुराव पेंटर तथा मिस्त्री यांनी १९१८ मध्ये 'सैरंध्री' चित्रपट काढला. 'सिंहगड' हा पहिला ऐतिहासिक मूकपट, कल्याणचा खजिना, बाजीप्रभू देशपांडे, नेताजी पालकर हे ऐतिहासिक चित्रपट त्यांनी काढले. त्याखेरीज 'सावकारी पाश' हा पहिला वास्तववादी चित्रपटही त्यांनी काढला. १९२५ मध्ये 'बाजीराव-मस्तानी' चित्रपट काढणाऱ्या भालजी पेंढारकरांच्या ऐतिहासिक चित्रपटांमधून राष्ट्रीय विचारसरणीचा प्रसार होत आहे हे लक्षात आल्यावर ब्रिटिशांनी त्यावर निर्बंध घातले.

**माहीत करून घ्या.**

पूर्वी चित्रपटगृहात चित्रपट सुरू होण्यापूर्वी अनुबोधपट व वृत्तपट दाखवले जात असत. त्यांच्या निर्मितीसाठी भारत सरकारने 'फिल्म्स डिव्हिजन'ची स्थापना केली. या अनुबोधपट आणि वृत्तपटांचा उपयोग लोकांच्या समाजप्रबोधनासाठी होई. त्याची माहिती करून घ्या.

कमलाबाई मंगरूळकर या मराठीतील पहिल्या स्त्री चित्रपटनिर्मात्या. त्यांनी 'सावळ्या तांडेल' आणि 'पन्नादाई' (हिंदी) हे बोलपट तयार केले. १९४४ मध्ये प्रभात कंपनीने काढलेला 'रामशास्त्री' चित्रपट गाजला. स्वातंत्र्योत्तर काळात आचार्य अत्रे यांनी 'महात्मा फुले' यांच्या जीवनावर, विश्राम बेडेकर यांनी वासुदेव बळवंत फडके यांच्या जीवनावर चित्रपट काढला. दिनकर द. पाटील यांनी 'धन्य ते संताजी धनाजी' हा चित्रपट काढला. प्रभाकर पेंढारकर यांचा 'बाल शिवाजी' हा चित्रपट महत्त्वाचा होय.

भारतीय चित्रपटांना आंतरराष्ट्रीय स्तरावर स्थान मिळवून देणारा पहिला चित्रपट म्हणजे संत तुकाराम. हा चित्रपट पॅरिस येथील आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात प्रदर्शित झाला. या चित्रपटात विष्णुपंत पागनीस यांनी संत तुकारामांची भूमिका केली होती.

**चला शोधूया.**

या पाठात उल्लेख नसलेले परंतु इतिहासाशी संबंधित असणाऱ्या चित्रपटांची यादी आंतरजालाच्या मदतीने तयार करा.

मराठी भाषेमध्ये ज्याप्रमाणे ऐतिहासिक चित्रपट बनवले गेले त्याचप्रमाणे हिंदी भाषेतही अनेक ऐतिहासिक चित्रपट बनवले गेले. स्वातंत्र्यपूर्वकाळात बनवलेल्या हिंदी चित्रपटांपैकी सिकंदर, तानसेन, सम्राट चंद्रगुप्त, पृथ्वीवल्लभ, मुघल-ए-आझम, इत्यादी चित्रपट इतिहासाचा आधार घेऊन बनवले होते. 'डॉ.कोटणीस की अमर कहानी' हा चित्रपट सत्यघटनेवर आधारित होता. स्वातंत्र्य चळवळीवर आधारित 'आंदोलन', 'झाँसी की रानी' हे चित्रपट महत्त्वाचे होत.

बॉम्बे टॉकिज, फिल्मीस्तान, राजकमल प्रॉडक्शन्स, आर.के.स्टुडिओज, नवकेतन, इत्यादी कंपन्यांनी चित्रपट निर्मितीच्या क्षेत्रात भरीव कामगिरी केली.

**चला शोधूया.**

आतंरजालाच्या मदतीने १९७० ते २०१५ पर्यंतचे ऐतिहासिक विषयांशी संबंधित मराठी चित्रपट शोधा.

## ६.५ मनोरंजन क्षेत्रातील व्यावसायिक संधी

रंगभूमी आणि चित्रपट क्षेत्रांमध्ये इतिहासाच्या विद्यार्थ्यांना अनेक संधी उपलब्ध आहेत.

**नाटक :** (१) नेपथ्य, वेशभूषा, केशभूषा, रंगभूषा इत्यादींचे तपशील अचूक असण्यासाठी संबंधित ऐतिहासिक काळातील चित्रकला, शिल्पकला, स्थापत्य या विषयांचा सखोल अभ्यास असणाऱ्या जाणकारांना कलादिग्दर्शनाचे नियोजन करता येते किंवा त्यासाठी सल्लागार म्हणून काम करता येते.

(२) संवादलेखनाच्या प्रक्रियेत लेखक आणि लेखकांचे सल्लागार म्हणून भाषा आणि संस्कृतीच्या इतिहासाच्या जाणकारांची आवश्यकता असते.

**चित्रपट :** (१) चित्रपटांमध्ये कथेशी संबंधित काळाच्या वातावरण निर्मितीचे तसेच पात्रांच्या वेशभूषा, केशभूषा, रंगभूषा इत्यादींचे नियोजन करण्याचे काम कलादिग्दर्शक करतात. या क्षेत्रातही इतिहासाच्या जाणकारांना प्रत्यक्ष कलादिग्दर्शक किंवा कलादिग्दर्शनासाठी सल्लागार म्हणून काम करता येते.

(२) चित्रपटाच्या संवादलेखनासाठी भाषा व संस्कृतीच्या जाणकारांची आवश्यकता असते.



## स्वाध्याय

१. (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.

(१) महाराष्ट्राचे आद्य कीर्तनकार ........... यांना मानतात.
(अ) संत ज्ञानेश्वर (ब) संत तुकाराम
(क) संत नामदेव (ड) संत एकनाथ

(२) बाबुराव पेंटर यांनी ......... हा चित्रपट काढला.
(अ) पुंडलिक (ब) राजा हरिश्चंद्र
(क) सैरंध्री (ड) बाजीराव-मस्तानी

(ब) पुढीलपैकी चुकीची जोडी दुरुस्त करून पुन्हा लिहा.

(१) रायगडाला जेव्हा जाग येते - वसंत कानेटकर
(२) टिळक आणि आगरकर - विश्राम बेडेकर
(३) साष्टांग नमस्कार - आचार्य अत्रे
(४) एकच प्याला - अण्णासाहेब किर्लोस्कर

२. पुढील तक्ता पूर्ण करा.

| | भजन | कीर्तन | ललित | भारुड |
|---|---|---|---|---|
| गुणवैशिष्ट्ये | | | | |
| उदाहरणे | | | | |

३. टीपा लिहा.

(१) मनोरंजनाची आवश्यकता
(२) मराठी रंगभूमी
(३) रंगभूमी व चित्रपट क्षेत्रांशी संबंधित व्यावसायिक क्षेत्रे

४. पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.

(१) चित्रपट माध्यमात इतिहास हा विषय महत्वाचा आहे.
(२) संत एकनाथांची भारुडे लोकप्रिय झाली.

५. पुढील प्रश्नांची २५ ते ३० शब्दांत उत्तरे लिहा.

(१) भारतीय चित्रपटसृष्टीची जननी अशी महाराष्ट्राची ख्याती का आहे ?
(२) पोवाडा म्हणजे काय हे स्पष्ट करा.

**उपक्रम**

संत एकनाथांचे 'विंचू चावला' हे भारुड मिळवून शाळेच्या सांस्कृतिक कार्यक्रमात साभिनय सादर करा.

2B8E6G

# ७. खेळ आणि इतिहास

७.१ खेळांचे महत्त्व
७.२ खेळांचे प्रकार
७.३ खेळांचे आंतरराष्ट्रीयीकरण
७.४ खेळांचे साहित्य आणि खेळणी
७.५ खेळणी आणि इतिहास
७.६ खेळ आणि वाङ्मयीन साहित्य व चित्रपट
७.७ खेळ आणि व्यावसायिक संधी

मनोरंजन व शारीरिक व्यायाम यांसाठी केली जाणारी कोणतीही कृती म्हणजे खेळ.

खेळांचा इतिहास हा माणसांएवढाच जुना आहे कारण खेळणे ही माणसाची नैसर्गिक प्रवृत्ती आहे. मानवाच्या प्रारंभीच्या काळात विविध प्रकारचे खेळ खेळले जात. शिकार हा जसा उदरनिर्वाहाचा मार्ग होता तसाच तो खेळ व मनोरंजनाचाही एक भाग होता. भारतातील प्राचीन साहित्यात आणि महाकाव्यांमधून द्यूत, कुस्ती, रथांच्या आणि घोड्यांच्या शर्यती आणि बुद्धिबळ यांचे उल्लेख येतात.



कुस्ती

**माहीत आहे का तुम्हांला?**

वडोदरा येथील प्रसिद्ध पहिलवान जुम्मादादा आणि माणिकराव यांची व्यायामशाळा, पतियाळा येथील क्रीडा विद्यापीठ, गुजरातमधील 'स्वर्णिम गुजरात स्पोर्टस विद्यापीठ', गांधीनगर, कोल्हापूर येथील खासबाग व मोतीबाग तालीम, अमरावती येथील हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, पुण्यातील बालेवाडी येथील श्रीशिवछत्रपती क्रीडा संकुल कुस्ती व इतर खेळांच्या प्रशिक्षणासाठी प्रसिद्ध आहे.

**माहीत आहे का तुम्हांला?**



खेळ आणि ग्रीक लोक यांचे नाते प्राचीन काळापासूनचे आहे. खेळांना नियमित व सुसंघटित स्वरूप ग्रीकांनी दिले. धावणे, थाळीफेक, रथ व घोड्यांच्या शर्यती, कुस्ती, मुष्टियुद्ध इत्यादींचे सामने त्यांनी सुरू केले. प्राचीन ऑलिंपिक ही खेळाची स्पर्धा ऑलिंपिया या ग्रीक शहरात घेतली जात असे. या स्पर्धेत भाग घेणे व विजय मिळवणे मानाचे समजले जाते.

## ७.१ खेळांचे महत्त्व

खेळाला आपल्या जीवनात महत्त्वाचे स्थान आहे. जीवनातील व्यथा आणि चिंता विसरायला लावण्याचे सामर्थ्य खेळांमध्ये आहे. मनाला विरंगुळा देणे आणि मन ताजेतवाने करण्याचे काम खेळ करतात. ज्या खेळात भरपूर श्रम किंवा शारीरिक हालचाली कराव्या लागतात त्या खेळांमुळे खेळाडूंचा व्यायाम होतो. शरीर काटक व बळकट बनवण्यास खेळ मदत करतात. खेळांमुळे मनोधैर्य, चिकाटी, खिलाडूपणा इत्यादी गुणांची वाढ होते. सांघिक खेळ खेळल्यामुळे आपापसात सहकार्य, संघभावना वाढीस

लागते आणि नेतृत्वगुणांचा विकास होतो.

## ७.२ खेळांचे प्रकार

खेळांचे बैठे आणि मैदानी असे दोन प्रकार आहेत.

**बैठे खेळ :** बैठे म्हणजे बसून खेळायचे खेळ. उदा., बुद्धिबळ, पत्ते, सोंगट्या, कॅरम, काचकवड्या हे खेळ कोठेही बसून खेळता येतात. सागरगोटे हा बैठा खेळ प्रामुख्याने मुली खेळतात. भातुकली हा खेळही लहान मुलींचा समजला गेला असला तरी त्यात घरातील सर्वजण सामील होऊ शकत. विशेषतः बाहुला-बाहुलीचे लग्न हा एक कौटुंबिक आनंदाचा सोहळा असे.



बुद्धिबळ

**मैदानी खेळ :** मैदानी खेळांमध्ये देशी आणि विदेशी खेळ असे प्रकार आहेत. देशी खेळांमध्ये लंगडी, कबड्डी, आट्यापाट्या, खो-खो इत्यादी खेळांचा समावेश होतो.



कबड्डी

मुला-मुलींमध्ये गोट्या, लगोरी, विटीदांडू, भिंगऱ्या, भोवरे, फुगडी, झिम्मा, लंगडी असे खेळ लोकप्रिय आहेत.



लंगडी

**माहीत आहे का तुम्हांला ?**

**झाशीची राणी लक्ष्मीबाई यांची दिनचर्या :**

"बाईसाहेबांस शरीराचा शोक फार होता. पहाटेस उठोन मल्लखांबासी जाऊन दोन घटका कसरत करून नंतर घोडा मंडळावर धरून लागलीच हत्तीवर बसून हत्तीस फेरफटका करून चार घटका दिवसास खुराकाचे खाणे व दूध पिणे करून स्नान होत असे."

(विष्णुभट गोडसे यांच्या 'माझा प्रवास' या पुस्तकातून)

विदेशी मैदानी खेळांत बॅडमिंटन, टेबल टेनिस तसेच हॉकी, क्रिकेट, फुटबॉल, गोल्फ, पोलो इत्यादी खेळांचा समावेश होतो.

मैदानी खेळांमध्ये धावण्याच्या शर्यती जगभर लोकप्रिय आहेत. यात १०० मीटर, २०० मीटर, मॅरेथॉन आणि अडथळ्यांच्या शर्यती यांचा समावेश होतो.



टेबल-टेनिस



फुटबॉल

शारीरिक कौशल्यावर आधारित मैदानी खेळांमध्ये गोळाफेक, थाळीफेक, लांब उडी व उंच उडी, पाण्यातील खेळांमध्ये पोहण्याच्या शर्यती, वॉटर पोलो, नौकानयन तसेच शारीरिक कसरतीच्या खेळांमध्ये मल्लखांब, दोरीवरचा मल्लखांब, जिम्नॅस्टिक्स इत्यादींचा समावेश होतो.



मल्लखांब

**माहीत आहे का तुम्हांला?**

श्रीमती मनिषा बाठे यांनी केलेल्या संशोधनानुसार कुस्तीसाठी पूरक असा मल्लखांब व त्यातील पकडी यांची निर्मिती उत्तरपेशवाईतील मल्लविद्यागुरू बाळंभट देवधर यांची आहे. बाळंभटदादांना हा व्यायाम प्रकार वानरांच्या झाडांवरील क्रीडा पाहून स्फुरला असेही त्यांनी नमूद केले आहे.



स्केटिंग

साहसी खेळ – स्केटिंग आणि स्किइंग (घसरण्याच्या शर्यती), आईस हॉकी हे खेळ लोकप्रिय आहेत.

साहसी व रोमांचकारी खेळांमध्ये प्रस्तरारोहण, ग्लायडिंग, मोटारसायकल, मोटार कार यांच्या शर्यतींचा समावेश होतो.

**चला शोधूयात.**

शिक्षक, पालक आणि आंतरजालाच्या मदतीने कुस्तीगीर खाशाबा जाधव, मारुती माने, भारतरत्न सचिन तेंडुलकर यांच्या जीवनाविषयी माहिती मिळवा.

**खेळांच्या स्पर्धा :** खेळांच्या स्पर्धांना जगभर मान्यता मिळाली आहे. ऑलिंपिक, एशियाड, दिव्यांगांचे ऑलिंपिक, क्रिकेट विश्वचषक स्पर्धा, हॉकी, कुस्ती, बुद्धिबळ इत्यादी खेळांच्या स्पर्धा जागतिक पातळीवर होतात. आपल्या देशात हॉकी, क्रिकेट हे खेळ लोकप्रिय आहेत. हॉकी हा भारताचा



क्रिकेट

राष्ट्रीय खेळ आहे. या खेळांच्या स्थानिक, शहर, तालुका, जिल्हा, राज्य, राष्ट्र आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पर्धा होतात. राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्पर्धा गाजवणाऱ्या खेळाडूंस त्याच क्षेत्रात उत्तम करिअर करता येते.

**माहीत आहे का तुम्हांला?**

मेजर ध्यानचंद हे भारतीय हॉकीचे खेळाडू आणि संघनायक होते. त्यांच्या नेतृत्वाखाली १९३६ साली भारतीय हॉकी संघाने बर्लिन ऑलिंपिकमध्ये सुवर्णपदक जिंकले. त्यापूर्वी १९२८ आणि १९३२ मध्येही भारतीय हॉकी संघाने सुवर्णपदके जिंकली होती. तेव्हा ध्यानचंद हे भारतीय संघाकडून खेळले होते. २९ ऑगस्ट हा त्यांचा जन्मदिवस 'राष्ट्रीय क्रीडादिवस' म्हणून पाळला जातो. त्यांना 'हॉकीचे जादूगार' असे म्हणतात. १९५६ मध्ये त्यांच्या हॉकीतील कामगिरीबद्दल त्यांना 'पद्मभूषण' या सन्मानाने विभूषित करण्यात आले.

## ७.३ खेळांचे आंतरराष्ट्रीयीकरण

विसाव्या-एकविसाव्या शतकात खेळांचे आंतरराष्ट्रीयीकरण झाले आहे. ऑलिंपिक, एशियाड, ब्रिटिश राष्ट्रकुल, विंबल्डन यांसारख्या स्पर्धांमधून खेळल्या जाणाऱ्या क्रिकेट, फुटबॉल, लॉन टेनिस इत्यादी सामन्यांचे थेट प्रक्षेपण दूरदर्शन व अन्य वाहिन्यांवरून जगभर एकाच वेळी केले जाते. ज्या देशांचा त्या खेळात काही सहभाग नाही असे प्रेक्षक सुद्धा त्या खेळाचा आनंद घेत असतात. उदा., क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारत अंतिम फेरीत पोहचल्यावर जगभरातील प्रेक्षकांनी तो सामना पाहिला. या जगभरच्या प्रेक्षकांनी खेळाचे अर्थकारणच बदलून टाकले आहे. हौशी खेळाडू शिकण्यासाठी सामने बघतात. प्रेक्षक मनोरंजनासाठी बघतात. कंपन्या जाहिरातीची संधी म्हणून सामन्यांकडे बघतात. प्रेक्षकांना सामने समजावून देण्यासाठी निवृत्त खेळाडू येतात.

## ७.४ खेळांचे साहित्य आणि खेळणी

लहान मुलांच्या करमणुकीसाठी आणि शिक्षणासाठी जी रंगीबेरंगी विविध साधने व उपकरणे असतात, त्यांना खेळणी म्हणतात. प्राचीन स्थळांच्या उत्खननामध्ये मातीपासून बनवलेली खेळणी सापडली आहेत. ही खेळणी हाताने किंवा साच्यातून तयार करत असत.

प्राचीन काळातील भारतीय साहित्यात बाहुल्यांचा उल्लेख आहे. शुद्रकाच्या एका नाटकाचे नाव मृच्छकटीक असे आहे. मृच्छकटीक म्हणजे मातीची गाडी.

**माहीत आहे का तुम्हांला?**

कथासरित्सागर या ग्रंथात अनेक मनोरंजक खेळ व खेळण्यांचे वर्णन आले आहे. त्यात उडणाऱ्या लाकडी बाहुल्यांचे वर्णन आहे. या बाहुल्या कळ दाबल्यावर उंच उडत, काही नाचत तर काही आवाज करत असे उल्लेख आहेत.

**चला शोधूयात.**

पूर्वी भारतातील अनेक भागांमध्ये लाकडी बाहुल्या बनवत असत. महाराष्ट्रात 'ठकी' नावाने ओळखल्या जाणाऱ्या रंगीत लाकडी बाहुल्या तयार केल्या जात.

अशा लाकडी बाहुल्या बनवण्याची परंपरा भारतात इतर कोणत्या प्रदेशांमध्ये होती/आहे हे शोधूयात.

त्या त्या प्रांतात त्या बाहुल्यांना काय नावे आहेत, ते शोधूयात.

## ७.५ खेळणी आणि इतिहास

खेळण्यांमधून इतिहास आणि तंत्रज्ञानाची प्रगती यांवर प्रकाश पडतो, धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरा समजतात. महाराष्ट्रात दिवाळीत किल्ले

करण्याची मोठी परंपरा आहे. या मातीच्या किल्ल्यांवर छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांचे सहकारी यांच्या प्रतिमा ठेवतात. महाराष्ट्रातील किल्ल्यांच्या साहाय्याने घडलेल्या इतिहासाला उजाळा देण्याचाच हा एक प्रकार आहे.

इटलीतील पाँपेई शहराच्या उत्खननात एक भारतीय हस्तिदंती बाहुली सापडली. ती पहिल्या शतकातील असावी असा इतिहासकारांचा अंदाज आहे. त्यावरून भारत आणि रोम यांच्यातील परस्पर संबंधांबद्दल अनुमान करता येते. अशा रीतीने उत्खननात मिळालेली खेळणी ही प्राचीन काळी विविध देशांमधील परस्परसंबंधांवर प्रकाश टाकू शकतात.

## ७.६ खेळ आणि संबंधित साहित्य व चित्रपट

खेळाशी संबंधित साहित्य ही एक नवी ज्ञानशाखा आहे. खेळांशी संबंधित पुस्तके, कोश नव्याने तयार होत आहेत. मराठी भाषेत नुकताच मल्लखांबाचा इतिहास प्रकाशित झाला. व्यायाम या विषयावर कोश आहे. खेळ या विषयाला वाहिलेले 'षट्कार' नावाचे नियतकालिक पूर्वी प्रसिद्ध होत होते. इंग्रजीमध्ये 'खेळ' या विषयावर विपुल प्रमाणात साहित्य उपलब्ध आहे. खेळ या विषयाला वाहून घेतलेल्या दूरदर्शन वाहिन्या आहेत.

अलीकडच्या काळात 'खेळ' आणि खेळाडूंचा जीवनपट यांवर काही हिंदी व इंग्लिश चित्रपटांची निर्मिती झाली आहे. उदा., मेरी कोम आणि दंगल. मेरी कोम ही ऑलिंपिकमध्ये भाग घेणारी आणि कांस्यपदक मिळवणारी पहिली महिला मुष्टियोद्धा आणि फोगट भगिनी या पहिल्या महिला कुस्तीगीर यांच्या जीवनावर हे चित्रपट आधारलेले आहेत.

चित्रपट बनवताना चित्रपटाचा कालखंड, त्या काळातील भाषा, पेहराव, सामान्य जनजीवन या सगळ्यांचा सखोल अभ्यास करावा लागतो. या गोष्टींचा सखोल अभ्यास करणे इतिहासाच्या विद्यार्थ्यांना शक्य असते. कोशांतर्गत वा वर्तमानपत्रे किंवा अन्य ठिकाणी 'क्रीडा' या विषयावर लिहिताना खेळांचा इतिहास माहीत असणे आवश्यक असते.

## ७.७ खेळ आणि व्यावसायिक संधी

खेळ आणि इतिहास या गोष्टी वरवर पाहता भिन्न वाटल्या तरीसुद्धा त्यांचा निकटचा संबंध आहे. इतिहासाच्या विद्यार्थ्यांना 'क्रीडा' क्षेत्रात अनेक संधी आहेत. ऑलिंपिक किंवा एशियाड सामने किंवा कोणत्याही स्वरूपाची राष्ट्रीय वा आंतरराष्ट्रीय स्पर्धांच्या संदर्भातील लेखन, समीक्षा करण्यासाठी इतिहासाच्या जाणकारांची मदत घ्यावी लागते.

खेळांच्या स्पर्धा सुरू असताना त्याबद्दल समीक्षापूर्ण निवेदन करण्यासाठी तज्ज्ञांची आवश्यकता असते. या तज्ज्ञांना खेळाचा इतिहास, मागील आकडेवारी, खेळातील विक्रम, गाजलेले खेळाडू, खेळासंबंधीची ऐतिहासिक आठवण अशा गोष्टींची माहिती देणे गरजेचे असते. यासाठी इतिहास उपयुक्त ठरतो.

दूरदर्शनवरून हॉकी, क्रिकेट, फुटबॉल, कबड्डी, बुद्धिबळ इत्यादी खेळांच्या सामन्यांचे प्रत्यक्ष सामना चालू असतानाचे प्रक्षेपण चालू असते. विविध वाहिन्यांमुळे या खेळांसंबंधित नोंदी ठेवणाऱ्यांना महत्त्व प्राप्त झाले आहे. खेळाशी संबंधित असणाऱ्या वाहिन्या २४ तास सुरू असतात. त्यामुळे या क्षेत्रात रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध आहेत.

खेळाच्या स्पर्धांमध्ये पंचांची आवश्यकता असते. पंच म्हणून पात्रता प्राप्त करण्यासाठी परीक्षा असतात. अशी पात्रता प्राप्त केलेल्या पंचांना जिल्हा, राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरांवर काम करण्याची संधी मिळते. सरकारी आणि खासगी पातळीवरून खेळांना उत्तेजन देण्याचे प्रयत्न चालू आहेत. खेळाडूंसाठी शिष्यवृत्तींची व्यवस्था करण्यात आली आहे. सरकारी आणि खासगी आस्थापनांमध्ये खेळाडूंसाठी राखीव जागा ठेवण्यात आल्या आहेत.

## माहीत आहे का तुम्हांला ?



क्रिकेट सामन्यांचे मराठी भाषेतून समालोचन पूर्वी बाळ ज. पंडित करत असत. आकाशवाणीवरून हे धावते वर्णन ऐकण्यासाठी लोक जीवाचा कान करत असत. हे समालोचन करताना बाळ पंडित त्या मैदानाचा इतिहास, खेळाडूंचा इतिहास, खेळाशी संबंधित असणाऱ्या आठवणी आणि पूर्वीचे विक्रम यांची माहिती देत असत. त्यांना खेळाचे आणि खेळाच्या इतिहासाचे उत्तम ज्ञान असल्यामुळे त्यांचे समालोचन रंजक व्हायचे.

## स्वाध्याय

**१. (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

(१) ऑलिंपिक स्पर्धांची परंपरा ........... येथे सुरू झाली.

(अ) ग्रीस (ब) रोम
(ब) भारत (क) चीन

(२) महाराष्ट्रात तयार होणाऱ्या लाकडी बाहुलीला .......... म्हणत.

(अ) ठकी (ब) कालिचंडिका
(क) गंगावती (ड) चंपावती

**(ब) पुढीलपैकी चुकीची जोडी दुरुस्त करून पुन्हा लिहा.**

(१) मल्लखांब - शारीरिक कसरतीचे खेळ
(२) वॉटर पोलो - पाण्यातील खेळ
(३) स्केटींग - साहसी खेळ
(४) बुद्धिबळ - मैदानी खेळ

**२. टीपा लिहा.**

(१) खेळणी आणि उत्सव
(२) खेळ व चित्रपट

**३. पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

(१) सध्याच्या काळात खेळाचे अर्थकारण बदलले आहे.
(२) खेळण्यांद्वारे इतिहासावर प्रकाश पडतो.

**४. पुढील प्रश्नांची २५ ते ३० शब्दांत उत्तरे लिहा.**

(१) खेळांचे महत्त्व स्पष्ट करा.
(२) खेळांतून व्यावसायिक संधी कशा प्राप्त होतात ?

**५. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

(१) भारतातील खेळाच्या साहित्याच्या इतिहासाविषयी माहिती लिहा.
(२) खेळ आणि इतिहास यांच्यातील परस्परसंबंध स्पष्ट करा.
(३) मैदानी खेळ व बैठे खेळ यांच्यातील फरक स्पष्ट करा.

**उपक्रम**

(१) तुमच्या आवडीच्या खेळाची व त्या खेळाशी संबंधित खेळाडूंची माहिती मिळवा.
(२) क्रीडापटूंवरील पुस्तके/माहितीपट/चित्रपट यातून खेळाडूंना त्या खेळासाठी किती कष्ट घ्यावे लागतात, यावर चर्चा करा.

2BHA84

# ८. पर्यटन आणि इतिहास


८.१ पर्यटनाची परंपरा

८.२ पर्यटनाचे प्रकार

८.३ पर्यटनाचा विकास

८.४ ऐतिहासिक स्थळांचे जतन आणि संवर्धन

८.५ पर्यटन आणि आथित्यक्षेत्रातील व्यावसायिक संधी


## ८.१ पर्यटनाची परंपरा

आपल्या देशात पर्यटनाची परंपरा प्राचीन काळापासून चालू आहे. तीर्थक्षेत्रांना भेट देणे, स्थानिक जत्रायात्रांना जाणे, विद्याभ्यासासाठी दूरच्या प्रदेशात जाणे, व्यापारासाठी जाणे, या निमित्तांनी पूर्वी पर्यटन घडून येत असे. सारांश स्वरूपात सांगायचे तर मानवाला खूप पूर्वीपासून फिरण्याची आवड आहे.



**माहीत आहे का तुम्हांला ?**

बौद्ध वाङ्मयात लोकांच्या उद्बोधनासाठी स्वतः गौतम बुद्धांनी भारतातील अनेक प्राचीन शहरांना भेटी दिल्याचे उल्लेख आहेत. बौद्ध भिक्खूंना सतत भ्रमण करत राहणे आवश्यक असे. तसेच जैन मुनी आणि साधू हेही सतत भ्रमण करत असत.

इ.स.६३० मध्ये चिनी प्रवासी युआन श्वांग चीनमधून भारतात आला होता. मध्ययुगात संत नामदेव, संत एकनाथ, गुरू नानकदेव, रामदास स्वामी हे भारतभ्रमण करत होते.

**पर्यटन :** दूरवरच्या स्थळांना विशिष्ट हेतूने भेट देण्यासाठी प्रवास करणे म्हणजे पर्यटन होय.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात थॉमस कुकने ६०० लोकांची लीस्टर ते लाफबरो अशी रेल्वे



**माहीत आहे का तुम्हांला ?**

जगातील पहिला युरोपीय शोधक प्रवासी म्हणून बेंजामिन ट्युडेला प्रसिद्ध आहे. त्याचा जन्म स्पेनमध्ये झाला. ११५९ ते ११७३ दरम्यान त्याने फ्रान्स, जर्मनी, इटली, ग्रीस, सिरिया, अरबस्थान, इजिप्त, इराक, पर्शिया (इराण), भारत व चीन या देशांना भेटी दिल्या. त्याने आपल्या प्रवासादरम्यानचे अनुभव दैनंदिनीमध्ये लिहिले. ही दैनंदिनी इतिहासाचा महत्वाचा दस्तऐवज आहे.

**मार्को पोलो :** तेराव्या शतकातील मार्को पोलो या इटालियन प्रवाशाने आशिया खंड आणि विशेषतः चीनची ओळख युरोपला करून दिली. तो १७ वर्षे चीनमध्ये राहिला. आशियातील निसर्ग, समाजजीवन, सांस्कृतिक जीवन आणि व्यापार यांची ओळख त्याने जगाला करून दिली. यातूनच युरोप व आशिया यांच्यात संवाद व व्यापार सुरू झाला.

**इब्न बतूता :** इस्लामी जगताची प्रदीर्घ सफर घडवून आणणारा चौदाव्या शतकातील प्रवासी म्हणजे इब्न बतूता. तो तीस वर्षे जग फिरत होता. एकाच रस्त्याने दोन वेळा प्रवास करायचा नाही असे त्याचे धोरण होते. मध्ययुगाचा इतिहास आणि समाजजीवन समजण्यासाठी बतूताचे लेखन उपयोगी आहे.

**गेरहार्ट मर्केटर :** सोळाव्या शतकातील गेरहार्ट मर्केटर हा जगाचा नकाशा आणि पृथ्वीचा गोल बनवणारा नकाशा आरेखक म्हणून प्रसिद्ध आहे. त्याच्यामुळे युरोपातील शोध मोहिमांना गती मिळाली.

सहल आयोजित केली. पूर्ण युरोपची भव्य वर्तुळाकार सहल यशस्वीपणे घडवून आणली. कुकनेच पर्यटक तिकिटे विकण्याचा एजन्सी व्यवसाय सुरू केला. यातून आधुनिक पर्यटनयुग सुरू झाले.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

तीर्थयात्रेसाठी देशाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत पायी प्रवास करण्याची परंपरा भारतामध्ये पूर्वीपासून प्रचलित होती. महाराष्ट्रातून उत्तरेकडे अयोध्येपर्यंत व तेथून पुन्हा महाराष्ट्रापर्यंत प्रवासाचे वर्णन विष्णुभट गोडसे यांनी लिहून ठेवले आहे. 'माझा प्रवास' हे त्यांच्या प्रवासवर्णनाच्या पुस्तकाचे नाव आहे. या पुस्तकाचे वैशिष्ट्य म्हणजे विष्णुभटांनी हा प्रवास १८५७ च्या स्वातंत्र्यसंग्रामाच्या काळात केला. या स्वातंत्र्यसंग्रामासंबंधीच्या अनेक गोष्टींचे ते प्रत्यक्ष साक्षीदार होते. त्यामुळे या स्वातंत्र्यसंग्रामाचे आणि विशेषतः राणी लक्ष्मीबाई यांच्या जीवनाविषयीचे अनेक तपशील आपल्याला समजतात. एवढेच नव्हे तर अठराव्या शतकातील मराठी भाषेचे स्वरूपही आपल्याला समजते. हे पुस्तक तत्कालीन इतिहासाचे एक महत्त्वाचे साधन आहे.

## ८.२ पर्यटनाचे प्रकार

आधुनिक काळात पर्यटन हा एक स्वतंत्र असा स्थानिक, आंतरराज्यीय, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय व्यवसाय झालेला आहे. देशातील व परदेशातील पुरावास्तू, इतिहासप्रसिद्ध व निसर्गरम्य स्थळे, प्राचीन कलानिर्मितीची केंद्रे, तीर्थक्षेत्रे, औद्योगिक व इतर प्रकल्प इत्यादींना भेटी देणे ही पर्यटनामागील मुख्य प्रेरणा असते. निसर्गनिर्मित आणि मानवनिर्मित गोष्टींमधील रम्यता व भव्यता यांचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची इच्छा जगभरच्या पर्यटकांना असते. त्यामुळे हिमशिखरे, समुद्रकिनारे, घनदाट जंगले असे उपेक्षित प्रदेश पर्यटनात आले. त्यांच्यावर दृक्-श्राव्य प्रसारमाध्यमांतून कार्यक्रम तयार होऊ लागले. पर्यटनाचे स्थानिक, आंतरराज्यीय, आंतरराष्ट्रीय, धार्मिक, ऐतिहासिक, आरोग्यपूरक, विज्ञान, कृषी, नैमित्तिक, क्रीडा पर्यटन असे ढोबळमानाने प्रकार पडतात.

**स्थानिक व आंतरराज्यीय पर्यटन :** हा प्रवास सुलभ असतो. तो देशातल्या देशात असल्याने यात भाषा, चलन, कागदपत्रे यांचा फारसा अडथळा नसतो. विशेष म्हणजे आपल्याला उपलब्ध असलेल्या वेळेप्रमाणे आपण त्याचे नियोजन करू शकतो.

**आंतरराष्ट्रीय पर्यटन :** जहाज, रेल्वे आणि विमान यांच्यामुळे आंतरराष्ट्रीय पर्यटन करणे पूर्वीपेक्षा सोपे झाले आहे. जहाजांमुळे समुद्रकिनाऱ्यांवरचे देश जोडले गेले. रेल्वेच्या रूळांनी युरोप जोडला आहे. विमानांनी जग जवळ आणले. आर्थिक उदारीकरणानंतर भारतातून परदेशात जाणाऱ्यांची आणि परदेशातून भारतात येणाऱ्यांची संख्या वाढली आहे. अभ्यास, विरंगुळा, स्थलदर्शन, व्यावसायिक कामे (बैठका, करारमदार इत्यादी) चित्रपटांचे चित्रीकरण यांसारख्या कामांसाठी देश-विदेशात येणाऱ्या-जाणाऱ्या पर्यटकांचे प्रमाण वाढले आहे.

**ऐतिहासिक पर्यटन :** संपूर्ण जगभरातील हा एक महत्त्वाचा पर्यटन प्रकार आहे. लोकांचे इतिहासाच्या संदर्भातील कुतूहल लक्षात घेऊन ऐतिहासिक पर्यटन सहलींचे आयोजन केले जाते. महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराजांशी संबंधित असणाऱ्या किल्ल्यांवर दुर्ग अभ्यासक गोपाळ नीळकंठ दांडेकर दुर्गभ्रमण यात्रा आयोजित करत असत. भारतीय पातळीवर राजस्थानातील किल्ले, महात्मा गांधी आणि आचार्य विनोबा भावे यांच्याशी संबंधित आश्रम, १८५७ च्या स्वातंत्र्यलढ्याशी संबंधित स्थळे अशाही ऐतिहासिक ठिकाणच्या सहली आयोजित केल्या जातात.

**भौगोलिक पर्यटन :** यात विविध भौगोलिक वैशिष्ट्ये निरीक्षणासाठी पर्यटन केले जाते. अभयारण्ये, व्हॅली ऑफ फ्लॉवर्स (उत्तराखंड), समुद्रकिनारे,

भौगोलिक वैशिष्ट्यपूर्ण स्थळे (उदा., लोणार सरोवर, निघोज येथील रांजणखळगे, इत्यादी) इत्यादींचा समावेश भौगोलिक पर्यटनात होतो. यातील अनेक स्थळांमधील निसर्गाचे अवलोकन करावे या इच्छेपोटी आणि कुतुहलापोटी अनेक पर्यटक तिथे जात असतात.



व्हॅली ऑफ फ्लॉवर्स

**माहीत करून घ्या.**

जगभरातील विविध समाजांतील लोक अनेक ठिकाणी विखुरलेले आहे. त्यांच्यामध्ये प्रचलित असलेल्या पुराणकथा आणि त्या पुराणकथांशी जोडली गेलेली भौगोलिक स्थळे यांमुळे त्यांच्यातील एकात्मतेची भावना टिकून राहते. त्या स्थळांना भेट देण्यास महत्त्व येते. त्यातूनच धार्मिक पर्यटनाची सुरुवात होते. उदा., चारधाम, बारा ज्योतिर्लिंगे. यामधील बहुसंख्य ठिकाणी लोकांची सोय व्हावी म्हणून पुण्यश्लोक अहल्याबाई होळकर यांनी आपल्या व्यक्तिगत गंगाजळीतून लोकोपयोगी कामे केलेली आहेत.

**आरोग्य पर्यटन :** भारतातील वैद्यकीय सेवा व सुविधा पाश्चात्त्यांच्या मते स्वस्त व दर्जेदार आहेत. या कारणास्तव परदेशी लोक भारतात येऊ लागले आहेत. भारतात मुबलक सूर्यप्रकाश उपलब्ध असतो. त्याचा लाभ घेण्यासाठी कितीतरी लोक भारतात येतात. योगशिक्षण आणि आयुर्वेदिक उपचारांसाठी परदेशी पर्यटक भारतात येतात.

**कृषी पर्यटन :** शहरी संस्कृतीत वाढलेल्या आणि कृषी जीवनाची माहिती नसलेल्यांसाठी कृषी पर्यटन हा प्रकार अलीकडच्या काळात झपाट्याने पुढे आला आहे. अलीकडे भारतीय शेतकरी दूरवरच्या कृषी संशोधन केंद्रे, कृषी विद्यापीठे, इझ्राईलसारखे शेतीच्या क्षेत्रात अभिनव प्रयोगाद्वारे नवीन तंत्रज्ञान विकसित करणारे देश यांसारख्या ठिकाणांना शेतीच्या आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती करून घेण्यासाठी भेट देऊ लागले आहेत.

**क्रीडा पर्यटन :** क्रीडा पर्यटन हा विसाव्या शतकात उदयाला आलेला प्रकार आहे. जागतिक पातळीवर ऑलिंपिक, विंबल्डन आणि जागतिक बुद्धिबळ स्पर्धा, आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या स्पर्धा तर भारतीय पातळीवर हिमालयीन कार रॅली आणि महाराष्ट्र पातळीवर महाराष्ट्र केसरी कुस्तीस्पर्धा यांसारखे प्रकार आहेत. हे सामने पाहायला जाणे म्हणजे क्रीडा पर्यटन.

**नैमित्तिक पर्यटन :** माणूस पर्यटनासाठी कारणे शोधत असतो. एकविसाव्या शतकात अशा अनेक संधी उपलब्ध झालेल्या आहेत. उदा., जगभरातील विविध देशांमधील फिल्म फेस्टिवल्स, संमेलने, आंतरराष्ट्रीय पुस्तक प्रदर्शने इत्यादी. अशा कारणांसाठी लोक ठिकठिकाणी जात असतात. महाराष्ट्रातील साहित्य रसिकही दरवर्षी भरणाऱ्या अखिल भारतीय मराठी साहित्यसंमेलनासाठी जात असतात.

**चला शोधूया.**

वरील प्रकारांव्यतिरिक्त विज्ञानविषयक पर्यटन, विरंगुळा, सांस्कृतिक पर्यटन व समूह पर्यटन या प्रकारांची माहिती शिक्षक व आंतरजालच्या (इंटरनेट) मदतीने शोधूयात.

## ८.३ पर्यटनाचा विकास

देशी आणि परदेशी पर्यटकांचे उद्बोधन हा सगळ्यांत महत्त्वाचा मुद्दा आहे.

पर्यटकांची वाहतूक आणि सुरक्षितता, प्रवासातील सुखसोई, उत्तम दर्जाच्या निवासस्थानांची उपलब्धता,

**माहीत करून घ्या.**

स्वच्छ भारत अभियानाची माहिती घ्या.

प्रवासात स्वच्छतागृहांच्या सोई या गोष्टींना पर्यटनामध्ये प्राधान्य देणे आवश्यक आहे. यामध्ये दिव्यांग पर्यटकांच्या गरजांकडे विशेष लक्ष पुरवणे आवश्यक आहे.

ऐतिहासिक वारशाच्या जतनासाठी आपणांस काही काळजी घेणे आवश्यक असते. ऐतिहासिक वारशांच्या स्थळांचे विद्रूपीकरण करणे, भिंतीवर मजकूर लिहिणे किंवा झाडांवर कोरणे, जुन्या वास्तू भडक रंगात रंगवणे, परिसर स्थळी सुविधांचा अभाव असणे ज्यायोगे अस्वच्छता वाढते यांसारख्या गोष्टी टाळायला हव्यात.

**सांगा पाहू ?**

- पर्यटकांसाठी आपणांस कोणकोणत्या सुविधा उपलब्ध करून द्यायला हव्यात ?
- पर्यटकांशी स्थानिक या नात्याने तुम्ही कसे वागाल ?

जागतिक स्तरावरील महत्वाच्या भाषांमध्ये माहितीपुस्तिका, मार्गदर्शिका, नकाशे, इतिहासविषयक पुस्तके उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. पर्यटकांना गाडीतून फिरायला नेणाऱ्या वाहन चालकांना दुभाषाचे प्रशिक्षण देणे, त्यांनी मार्गदर्शक म्हणून काम करणे या गोष्टी करता येतील.

## ८.४ ऐतिहासिक स्थळांचे जतन आणि संवर्धन

ऐतिहासिक स्थळांचे जतन आणि संवर्धन करणे हे एक मोठे आव्हान आहे. आपल्या देशाला प्राचीन, मध्ययुगीन आणि अर्वाचीन अशा ऐतिहासिक स्थळांचा वारसा मिळाला आहे. त्याचबरोबर नैसर्गिक समृद्धीचा वारसाही आपल्याला लाभलेला आहे. या वारशाचे नैसर्गिक आणि मानवनिर्मित (सांस्कृतिक) अशा दोन प्रकारचा वारसा असतो. संपूर्ण जगात गौरवली गेलेली काही महत्त्वाची स्थळे भारतात आहेत. ताजमहाल आणि जंतरमंतर वेधशाळेच्या बरोबरीने महाराष्ट्रातील अजिंठा, वेरूळ, घारापुरी (एलिफंटा लेणी), छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे स्थानक, पश्चिम घाटातील कास पठार यांचा समावेश आहे.



घारापुरी लेणी

**करून पहा.**

आंतरजालाच्या साहाय्याने भारतातील सांस्कृतिक, नैसर्गिक व संमिश्र ऐतिहासिक वारसा स्थळांची चित्रे जमा करा.



कास पठार

जागतिक वारसा स्थळांना भेट देण्याची इच्छा जगभरातील पर्यटकांना असते. ही वारसा स्थळे बघण्यासाठी आपल्या देशात परदेशातून हजारो लोक येतात. जागतिक वारसा स्थळांमध्ये भारतातील एखाद्या स्थळाची निवड झाली की आपली छाती अभिमानाने फुगून येते. परंतु आपण जेव्हा सहलीच्या निमित्ताने अशा ठिकाणी जातो तेव्हा आपणांस काय चित्र दिसते? स्थळांच्या परिसरात पर्यटक खडूने, कोळशाने आपली नावे लिहितात, चित्रे काढतात. त्याचा विपरीत परिणाम आपल्या देशाच्या प्रतिमेवर होतो. पर्यटन स्थळांच्या जतनासाठी पुढील निश्चय करणे आवश्यक आहे.

(१) मी पर्यटन स्थळाची स्वच्छता राखीन, कचरा टाकणार नाही.

(२) कोणत्याही ऐतिहासिक वास्तूचे विद्रूपीकरण करणार नाही.

## ८.५ पर्यटन आणि आतिथ्यक्षेत्रातील व्यावसायिक संधी

पर्यटन हा सर्वाधिक रोजगार निर्माण करणारा उद्योग होऊ शकतो. जर आपण त्याकडे व्यावसायिक पद्धतीने लक्ष दिले तर हा एक कायमस्वरूपी व्यवसाय आहे. यात नावीन्यपूर्ण प्रयोग करण्यास प्रचंड संधी आहेत.

पर्यटनामुळे अनेक लोकांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण होतात. परदेशी पर्यटकाने विमानतळावर पाऊल ठेवण्याआधीपासून तो भेट देणाऱ्या देशाला उत्पन्न मिळवून देण्यास सुरुवात करतो. त्याने भरलेल्या व्हिसा फीमुळे आपल्या देशाला महसूल मिळतो. प्रवासखर्च, हॉटेलमध्ये राहणे, खाणे, दुभाष्याची मदत घेणे, वर्तमानपत्रे, संदर्भ साहित्य विकत घेणे, आठवण म्हणून स्थानिक वस्तू विकत घेणे एवढ्या गोष्टी पर्यटक मायदेशी जाईपर्यंत करतो.

पर्यटन केंद्रांच्या परिसरात बाजारपेठांचा विस्तार होतो. तेथील हस्तोद्योग व कुटीरोद्योग यांचा विकास होतो. त्या वस्तूंच्या खरेदी-विक्रीत वाढ होते. उदा., स्थानिक खाद्यपदार्थ, तेथील हस्तकौशल्याच्या वस्तू इत्यादी गोष्टी पर्यटक आवडीने खरेदी करतात. त्यामुळे स्थानिकांच्या रोजगारात वाढ होते.

**वारसा मुशाफिरी (हेरिटेज वॉक) :** ऐतिहासिक वारसास्थळाला भेट देण्यासाठी जाणे याला 'हेरिटेज वॉक' असे म्हणतात. जेथे इतिहास घडला तेथे प्रत्यक्ष जाऊन इतिहास जाणून घेणे ही अनुभूती हेरिटेज वॉकमध्ये येते.

जगभर अशा प्रकारचे उपक्रम चालवले जातात. भारताला शेकडो वर्षांचा इतिहास आहे. भारतातील प्रत्येक राज्यात ऐतिहासिक स्थळे आहेत. यात प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक स्थळे यांचा समावेश होतो. गुजरातमधील अहमदाबाद शहरातील हेरिटेज वॉक प्रसिद्ध आहे. महाराष्ट्रात मुंबई-पुणे इत्यादी शहरांमध्ये या उपक्रमांचे आयोजन केले जाते. यामुळे ऐतिहासिक वास्तू जतन करणे, त्याची माहिती जमवणे आणि ती जगभर विविध माध्यमातून पोहचणे इत्यादी उपक्रम चालवले जातात. ऐतिहासिक व्यक्तींची निवासस्थाने ही सुद्धा ऐतिहासिक वारसा असतात. काही ठिकाणी अशा स्थळांवर नीलफलक लावण्याची पद्धत आहे.



**करून पहा.**

आपल्या परिसरातील ऐतिहासिक स्थळांना भेट देण्यासाठी शिक्षकांच्या मदतीने वारसा मुशाफिरी आयोजित करा.

**महाराष्ट्रातील पर्यटनाचा विकास :** महाराष्ट्र हे पर्यटनाच्या दृष्टीने वैभवशाली वारसा लाभलेले राज्य आहे. अजिंठा, वेरूळ, घारापुरी (एलिफंटा) यांसारखी जागतिक कीर्तीची लेणी, चित्रे व शिल्पे, पंढरपूर, शिर्डी, शेगांव, तुळजापूर, कोल्हापूर, नाशिक, पैठण,

त्र्यंबकेश्वर, देहू, आळंदी, जेजुरी अशी अनेक देवस्थाने, हाजीमलंग, नांदेड येथील गुरुद्‌वारा, मुंबईचे माउंट मेरी चर्च, महाबळेश्वर, पाचगणी, खंडाळा, लोणावळा, माथेरान, चिखलदरा ही थंड हवेची ठिकाणे, कोयनानगर, जायकवाडी, भाटघर, चांदोली ही धरणे, दाजीपूर, सागरेश्वर, ताडोबा ही अभयारण्ये ही महाराष्ट्रातील पर्यटनस्थळे महत्त्वाची आहेत. इ.स.१९७५ मध्ये 'महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळा'ची स्थापना करण्यात आली. त्यामुळे पर्यटन विकासाला चालना मिळाली आहे. या महामंडळातर्फे राज्यात ४७ ठिकाणी पर्यटक निवासाची सोय केली आहे. त्यात सुमारे चार हजारांहून अधिक पर्यटकांची निवासाची सोय होते. तसेच अनेक खासगी व्यावसायिकही या व्यवसायात उतरले आहेत.

### माहीत आहे का तुम्हांला ?

**भारतातील पहिले आगळेवेगळे 'पुस्तकांचे गाव'**

महाबळेश्वर येथून जवळच असलेले भिलार हे निसर्गरम्य आणि स्ट्रॉबेरीचा गोडवा असलेले गाव. या पुस्तकाच्या गावामध्ये अनेक घरांत पर्यटकांसाठीच पुस्तके आहेत. वाचन चळवळ वाढावी, मराठी भाषेतील नवे-जुने लेखक, संत साहित्य, कथा-कादंबरी, कविता, ललित, चरित्रे-आत्मचरित्रे, स्त्री साहित्य, क्रीडा, बालसाहित्य यांच्या फुललेल्या बहारदार विश्वात तुम्ही 'वाचन-आनंद' घ्यावा, यासाठी महाराष्ट्र शासनाने हा प्रकल्प राबवला आहे.

आपण पर्यटनासाठी महाबळेश्वरला गेला तर भिलार गावाला म्हणजेच पुस्तकाच्या गावाला अवश्य भेट द्या.

### माहीत आहे का तुम्हांला ?

महाबळेश्वर, पाचगणी ही थंड हवेची ठिकाणे आहेत. या ठिकाणाला हजारो पर्यटक भेट देत असतात. तेथे मार्गदर्शक पर्यटकांना काही महत्त्वाच्या ठिकाणांची माहिती सांगतात, ती ठिकाणे दाखवतात. काही विशिष्ट ठिकाणी फोटोग्राफर फोटो काढून देतात. घोडेवाले घोड्यावरून फेरफटका मारून आणतात, घोडागाडीत फिरवतात. ही सर्व कामे तेथील स्थानिक लोक करतात. त्या कामातून त्यांना चांगला रोजगार मिळतो. म्हणजेच पर्यटन त्यांच्या उपजीविकेचे साधन ठरते.

### समजून घ्या.

दर्जेदार शिक्षण संस्थांना भेट देणे, एखाद्या स्थळाची स्थानिक संस्कृती, इतिहास, परंपरा आणि ऐतिहासिक स्मारकांना भेटी देणे, तेथील लोकांनी मिळवलेले विविध क्षेत्रांतील यश अभ्यासणे तसेच तेथील नृत्य, संगीत, महोत्सव यांमध्ये भाग घेणे इत्यादी उद्देशांनी केलेले पर्यटन म्हणजे सांस्कृतिक पर्यटन.

### सांगा पाहू ?

- पर्यटनामुळे तुमच्या परिसरात कोणकोणते व्यवसाय निर्माण झाले आहेत ?
- पर्यटनामुळे परिसरातील लोकांच्या राहणीमानात कोणता बदल झालेला दिसून येतो ?

## स्वाध्याय

**१. (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

(१) कुकने .......... विकण्याचा एजन्सी व्यवसाय सुरू केला.
(अ) हस्तकौशल्याच्या वस्तू
(ब) खेळणी
(क) खाद्यवस्तू
(ड) पर्यटन तिकिटे

(२) महाबळेश्वरजवळील भिलार हे .......... गाव म्हणून प्रसिद्ध आहे.
(अ) पुस्तकांचे (ब) वनस्पतींचे
(क) आंब्याचे (ड) किल्ल्यांचे

**(ब) पुढीलपैकी चुकीची जोडी दुरुस्त करून पुन्हा लिहा.**

(१) माथेरान - थंड हवेचे ठिकाण
(२) ताडोबा - लेणी
(३) कोल्हापूर - देवस्थान
(४) अजिंठा - जागतिक वारसास्थळ

**२. पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

(१) आजच्या काळात परदेशात जाण्याचे प्रमाण वाढत आहे.
(२) आपण आपला नैसर्गिक आणि सांस्कृतिक वारसा जपला पाहिजे.


**३. टीपा लिहा.**

(१) पर्यटनाची परंपरा (२) मार्को पोलो
(३) कृषी पर्यटन

**४. पुढील प्रश्नांची २५ ते ३० शब्दांत उत्तरे लिहा.**

(१) पर्यटनाच्या विकासासाठी कोणती काळजी घेणे आवश्यक आहे ?
(२) पर्यटन व्यवसायामुळे स्थानिक पातळीवर रोजगार निर्मिती कशी होते ?
(३) आपल्या परिसराचा पर्यटनाच्या दृष्टीने कसा विकास कराल ?

**५. पुढील संकल्पनाचित्र स्पष्ट करा.**
**महाराष्ट्रातील जागतिक वारसा ठरलेली पर्यटनस्थळे....**




**६. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

(१) पर्यटनाशी संबंधित व्यावसायिक क्षेत्रे स्पष्ट करा.
(२) पर्यटनाचे कोणतेही तीन प्रकार स्पष्ट करा.

**उपक्रम**

ऐतिहासिक स्थळांच्या जतन व संवर्धनाची गरज स्पष्ट करा. यासाठी कोणत्या उपाययोजना करता येतील, याची चर्चा करा.

2BR69R

# ९. ऐतिहासिक ठेव्यांचे जतन

९.१ इतिहासाची साधने आणि त्यांचे जतन
९.२ काही नावाजलेली संग्रहालये
९.३ ग्रंथालये आणि अभिलेखागार
९.४ कोशवाङ्मय

अनेक इतिहासकारांनी केलेल्या अथक परिश्रमांचे फलित म्हणजे आज आपल्याला उपलब्ध असलेली इतिहासाची साधने आणि त्या साधनांच्या आधारे लिहिले गेलेले ग्रंथ. अत्यंत मोलाच्या अशा या ऐतिहासिक ठेव्यांचे संवर्धन-जतन करण्याचे आणि त्यातील निवडक दस्तऐवज, ग्रंथ, पुरावस्तू प्रदर्शित करण्याचे काम संग्रहालये, त्यांच्याशी निगडित असलेली अभिलेखागारे आणि ग्रंथालये करतात. लोकांपर्यंत त्यांच्या कामाची शास्त्रशुद्ध माहिती पोचावी म्हणून त्यांच्यातर्फे संशोधन नियतकालिके आणि इतर प्रकाशने प्रसिद्ध केली जातात.

जे दस्तऐवज, पुरावस्तू इत्यादी प्रदर्शित केले जात नाहीत परंतु ऐतिहासिकदृष्ट्या महत्वाचे असतात ते संग्रहालय आणि अभिलेखागारांमध्ये जतन केले जातात. संशोधकांना ते दस्तऐवज आणि पुरावस्तू आवश्यकतेनुसार उपलब्ध करून दिले जातात. ग्रंथालये ग्रंथांचे जतन आणि व्यवस्थापन करतात.

## ९.१ इतिहासाची साधने आणि त्यांचे जतन

इतिहासाची साधने मिळवणे, त्यांच्या नोंदी करून त्यांची सूची तयार करणे, हस्तलिखिते, जुने ग्रंथ, पुरावस्तूंच्या स्वरूपातील भौतिक साधनांची साफसफाई आणि त्या प्रदर्शित करणे या गोष्टी अत्यंत काळजीपूर्वक कराव्या लागतात. त्या कामांसाठी विविध विषयांमधील कृतींसाठी प्रशिक्षणाची आवश्यकता असते. योग्य प्रशिक्षण प्राप्त झाल्यानंतरच या कृती करता येतात.

### १. मौखिक साधने

- लोकपरंपरेतील गीते, कहाण्या इत्यादींचे संकलन करणे.
- संकलित साहित्याचे वर्गीकरण आणि विश्लेषण करणे, अन्वयार्थ लावणे.
- संशोधित मौखिक साहित्य प्रकाशित करणे.

**उपयुक्त प्रशिक्षण :** (१) समाजशास्त्र (२) सामाजिक मानवशास्त्र (३) मिथके आणि भाषाशास्त्र (४) ग्रंथालय व्यवस्थापन (५) इतिहास आणि इतिहास संशोधनपद्धती (६) संशोधनपर लेखन.

### २. लिखित साधने

- ताम्रपट, दरबारी दप्तरे, खासगी पत्रे आणि दैनंदिनी, ऐतिहासिक ग्रंथ, हस्तलिखिते, चित्रे, छायाचित्रे, जुने ग्रंथ. इत्यादी दस्तऐवजांचे संकलन-संपादन करणे.
- दस्तऐवजांच्या संवर्धनासाठी आवश्यक असणाऱ्या सफाई आणि इतर रासायनिक प्रक्रिया करणे.
- दस्तऐवजांचे ऐतिहासिक मूल्य निश्चित करणे.
- निवडक दस्तऐवज प्रदर्शित करणे.
- संपादित साहित्य आणि संशोधनाचे निष्कर्ष प्रकाशित करणे.

**उपयुक्त प्रशिक्षण**

१. ब्राह्मी, मोडी, पर्शियन यांसारख्या लिपी आणि त्यांच्या विकासाच्या क्रमाचे ज्ञान.
२. इतिहासकालीन समाजरचना आणि परंपरा, साहित्य आणि संस्कृती, राजसत्ता, शासनव्यवस्था इत्यादींचे प्राथमिक ज्ञान.
३. विविध चित्रशैली, शिल्पकलाशैली आणि त्यांच्या विकासाचा क्रम यांचे ज्ञान.
४. कागदाचे प्रकार, शाई आणि रंग यांचे ज्ञान.

५. कोरीव लेखांसाठी वापरलेला दगड, धातू यांच्या स्वरूपाविषयीची माहिती.
६. दस्तऐवजांची सफाई आणि संवर्धन यांसाठीच्या आवश्यक रासायनिक प्रक्रियांसाठी लागणारी उपकरणे आणि रसायने यांची माहिती.
७. संग्रहालयाच्या दालनांमधील प्रदर्शन व्यवस्थापन आणि माहिती तंत्रज्ञान.
८. संशोधनपर लेखन.

**३. भौतिक साधने**

- पुरावस्तूंचे संकलन, कालखंड आणि प्रकार यांनुसार वर्गीकरण करणे, सूची तयार करणे.
- पुरावस्तूंचे संवर्धन करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सफाई आणि इतर रासायनिक प्रक्रिया करणे.
- निवडक पुरावस्तू किंवा त्यांच्या प्रतिकृती प्रदर्शित करणे.
- पुरावस्तूंसंबंधी संशोधनपर लेखन प्रसिद्ध करणे.
- वनस्पती आणि प्राणी यांचे अश्मीभूत अवशेष (जीवाश्म) यांचे वर्गीकरण करणे. सूची तयार करणे.
- निवडक जीवाश्म किंवा त्यांच्या प्रतिकृती प्रदर्शित करणे.

**उपयुक्त प्रशिक्षण**

१. पुरातत्त्वीय अभ्यासपद्धती, सिद्धान्त आणि प्राचीन संस्कृती यांचा परिचय.
२. पुरावस्तू बनवण्यासाठी वापरलेल्या दगड, खनिजे, धातू, चिकणमाती यांसारख्या माध्यमांचे प्रादेशिक स्रोत, त्यांच्या रसायनशास्त्रीय वैशिष्ट्यांचे ज्ञान.
३. पुरावस्तूंची सफाई आणि इतर रासायनिक प्रक्रियांसाठी लागणारी उपकरणे आणि रसायनांची माहिती.
४. विविध कलाशैली आणि त्यांच्या विकासाचा क्रम यांचे ज्ञान.
५. पुरावस्तू आणि जीवाश्म यांच्या प्रतिकृती बनवण्याचे कौशल्य.
६. संग्रहालयाच्या दालनांमधील प्रदर्शन व्यवस्थापन आणि माहिती तंत्रज्ञान.
७. संशोधनपर लेखन.

## ९.२ काही नावाजलेली संग्रहालये

मध्ययुगात युरोपमधील राजघराण्यातील व्यक्ती आणि श्रीमंत लोकांनी संग्रहित केलेल्या कलावस्तूंच्या व्यवस्थापनाच्या गरजेतून संग्रहालयांची कल्पना उदयाला आली.

**लुव्र संग्रहालय, फ्रान्स :** पॅरिस शहरातील लुव्र संग्रहालयाची स्थापना इसवी सनाच्या अठराव्या शतकात झाली. फ्रेंच राजघराण्यातील व्यक्तींनी जमा केलेल्या कलावस्तूंचे संग्रह लुव्र संग्रहालयात प्रथम प्रदर्शित केले गेले. त्यामध्ये लिओनार्दो द विंची या जगप्रसिद्ध इटालियन चित्रकाराने रेखाटलेल्या 'मोनालिसा' या बहुचर्चित चित्राचा समावेश आहे. लिओनार्दो द विंची फ्रान्सचा सोळाव्या शतकात होऊन गेलेला राजा पहिला फ्रान्सिस याच्या पदरी होता. नेपोलिअन बोनापार्टने आपल्या स्वाऱ्यांच्या दरम्यान मायदेशी आणलेल्या कलावस्तूंमुळे लुव्र संग्रहातील संग्रह खूपच वाढला. सध्या या संग्रहालयात अश्मयुगीन ते आधुनिक काळातील ३ लाख ८० हजाराहून अधिक कलावस्तू आहेत.


मोनालिसा

**ब्रिटिश संग्रहालय, इंग्लंड :** लंडन शहरात असलेल्या ब्रिटिश संग्रहालयाची स्थापना इसवी सनाच्या अठराव्या शतकात झाली. सर हॅन्स स्लोअन या तत्कालीन निसर्गशास्त्रज्ञाने त्याच्या संग्रहातील सुमारे एकाहत्तर हजार वस्तू इंग्लंडचा राजा दुसरा जॉर्ज याच्याकडे सुपूर्द केल्या. त्यामध्ये अनेक ग्रंथ, चित्रे, वनस्पतींचे नमुने इत्यादींचा समावेश होता. पुढे इंग्रजांनी त्यांच्या अमलाखालील विविध वसाहतींमधून मायदेशी आणलेल्या कलावस्तू, प्राचीन अवशेष

यांमुळे ब्रिटिश संग्रहालयातील वस्तूंची संख्या वाढत गेली. आजमितीला या संग्रहालयात सुमारे ऐंशी लाख इतक्या वस्तू संग्रहित आहेत. भारतातील अनेक पुरावस्तूंचा समावेश त्यामध्ये आहे.



ब्रिटिश संग्रहालय, इंग्लंड

**नॅशनल म्युझियम ऑफ नॅचरल हिस्टरी, युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका :** अमेरिकेतील स्मिथसोनियन इन्स्टिट्यूशन या संस्थेच्या व्यवस्थापनाखाली असलेले नैसर्गिक इतिहासाचे हे संग्रहालय इसवी सन १८४६ मध्ये सुरू झाले. इथे वनस्पती, प्राणी यांचे अवशेष आणि जीवाश्म खनिजे, दगड, मानव प्रजातींचे अश्मीभूत अवशेष आणि पुरावस्तू यांचे बारा कोटींहून अधिक नमुने संग्रहित केलेले आहेत.

**जाणून घ्या.**

**भारतातील प्रसिद्ध संग्रहालये**

इंडियन म्युझियम, कोलकाता; नॅशनल म्युझियम, दिल्ली; छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय, मुंबई; सालारजंग म्युझियम, हैदराबाद; द कॅलिको म्युझियम ऑफ टेक्स्टाइल्स, अहमदाबाद ही भारतातील प्रसिद्ध संग्रहालयांपैकी काही आहेत.

**भारतातील संग्रहालये :** कोलकाता येथील 'भारतीय संग्रहालय' हे भारतातील पहिले संग्रहालय 'एशियाटिक सोसायटी ऑफ बेंगॉल' या संस्थेतर्फे इसवी सन १८१४ मध्ये स्थापन झाले. चेन्नई येथील इसवी सन १८५१ मध्ये सुरू झालेले 'गव्हर्मेंट म्युझियम' हे भारतातील दुसरे संग्रहालय. इसवी सन १९४९ मध्ये दिल्लीतील 'राष्ट्रीय वस्तुसंग्रहालया'ची (नॅशनल म्युझियम) स्थापना झाली. आजमितीला भारतातील विविध राज्यांमध्ये अनेक संग्रहालये आहेत. बहुतेक मोठ्या संग्रहालयांची स्वतःची अभिलेखागारे आणि ग्रंथालये असतात. काही संग्रहालये विद्यापीठांशी संलग्न असतात. अशा संग्रहालयांतर्फे संग्रहालयशास्त्र या विषयाचे विविध अभ्यासक्रम शिकवले जातात.



नॅशनल म्युझियम ऑफ नॅचरल हिस्टरी

संग्रहालयशास्त्रातील पदवी आणि पदविका अभ्यासक्रम उपलब्ध करून देणाऱ्या भारतातील काही प्रमुख संस्था आणि विद्यापीठे :

१. राष्ट्रीय वस्तुसंग्रहालय, दिल्ली
२. महाराज सयाजीराव विद्यापीठ, वडोदरा
३. कोलकाता विद्यापीठ, कोलकाता
४. बनारस हिंदू विद्यापीठ, वाराणसी
५. अलिगढ मुस्लिम युनिव्हर्सिटी, अलिगढ
६. जिवाजी विद्यापीठ, ग्वालियर

**छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय, मुंबई :** इसवी सन १९०४ साली मुंबईतील काही प्रतिष्ठित नागरिकांनी एकत्र येऊन प्रिन्स ऑफ वेल्सच्या भारतभेटीच्या स्मरणार्थ एक वस्तुसंग्रहालय उभारण्याचा निर्णय घेतला. इसवी सन १९०५ च्या नोव्हेंबर महिन्यात या संग्रहालयाच्या इमारतीची पायाभरणी झाली आणि संग्रहालयाचे नाव 'प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम ऑफ वेस्टर्न इंडिया' असे निश्चित करण्यात आले. इसवी सन १९९८ मध्ये संग्रहालयाचे नाव बदलून 'छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय' असे ठेवण्यात आले.



छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय, मुंबई

संग्रहालयाची वास्तू इंडो-गोथिक शैलीत बांधलेली आहे. तिला मुंबई शहरातील 'पहिल्या प्रतीची सांस्कृतिक वारसा इमारत' असा दर्जा देण्यात आलेला आहे. संग्रहालयात कला, पुरातत्त्व आणि निसर्गाचा इतिहास अशा तीन वर्गांत विभागलेल्या सुमारे पन्नास हजार पुरावस्तू संग्रहित केलेल्या आहेत.

## ९.३ ग्रंथालये आणि अभिलेखागार

ग्रंथालये ही ज्ञानाची आणि माहितीची भांडारघरे असतात. ग्रंथालयशास्त्राचा व्यवस्थापनशास्त्र, माहिती तंत्रज्ञान, शिक्षणशास्त्र यांसारख्या विषयांशी निकटचा संबंध आहे. ग्रंथांचे संकलन, त्यांचे पद्धतशीर आयोजन, जतन आणि संवर्धन, माहितीच्या स्रोतांचे प्रसारण अशी महत्त्वाची कामे ग्रंथालयांमार्फत पार पाडली जातात. यातील बहुतेक कामे अद्ययावत संगणकीय प्रणालीच्या आधारे केली जातात. वाचकांना आवश्यकतेनुसार हवे तेव्हा नेमके ग्रंथ उपलब्ध करून देणे, या गोष्टीला ग्रंथालय व्यवस्थापनात अत्यंत महत्त्व आहे.

तक्षशिला विद्यापीठ येथील ग्रंथालय (इ.स.पू. सुमारे पाचवे शतक ते इ.स.पाचवे शतक), मेसोपोटेमियातील असिरियन साम्राज्याचा सम्राट असुरबानीपाल याचे ग्रंथालय (इ.स.पू सातवे शतक) आणि इजिप्तमधील अलेक्झांड्रिया येथील ग्रंथालय (इ.स.पू चौथे शतक) ही जगातील सर्वाधिक प्राचीन ग्रंथालये होती असे समजले जाते.

तमिळनाडूतील तंजावर येथील 'सरस्वती महाल ग्रंथालय' हे इसवी सनाच्या सोळाव्या-सतराव्या शतकातील नायक राजांच्या काळात बांधले गेले. इसवी सन १६७५ मध्ये व्यंकोजीराजे भोसले यांनी तंजावर जिंकून घेतले आणि स्वतःचे स्वतंत्र राज्य स्थापन केले. व्यंकोजीराजे भोसले आणि त्यांच्या वंशजांनी सरस्वती महाल ग्रंथालय अधिकाधिक समृद्ध केले. त्यांमध्ये सरफोजीराजे भोसले यांचा महत्त्वाचा वाटा होता. त्यांच्या सन्मानार्थ इसवी सन १९१८ मध्ये या ग्रंथालयाला त्यांचे नाव देण्यात आले. या ग्रंथालयाच्या संग्रहात सुमारे एकोणपन्नास हजार ग्रंथ आहेत.

भारतातील अनेक ग्रंथालयांपैकी काही ग्रंथालये विशेष नोंद घेण्यासारखी आहेत. त्यामध्ये कोलकाता येथील 'नॅशनल लायब्ररी', दिल्ली येथील नेहरू मेमोरियल म्युझियम ॲन्ड लायब्ररी', हैदराबाद येथील 'स्टेट सेंट्रल लायब्ररी', मुंबई येथील 'लायब्ररी ऑफ एशियाटिक सोसायटी' आणि 'डेव्हिड ससून लायब्ररी' इत्यादी ग्रंथालयांचा समावेश होतो.

अभिलेखागारांचे व्यवस्थापन हे तांत्रिकदृष्ट्या ग्रंथालय व्यवस्थापनाचेच एक अंग असते. महत्त्वाच्या नोंदी असलेली कागदपत्रे त्यांमध्ये कोणताही बदल न करता सुरक्षित ठेवणे, त्यांच्या सूची तयार करणे आणि ती हवी तेव्हा उपलब्ध करून देणे ही कामे

अभिलेखागाराच्या व्यवस्थापनात महत्त्वाची असतात. त्यामुळे ही कागदपत्रे ऐतिहासिकदृष्ट्या अत्यंत विश्वासार्ह मानली जातात. संगणकीय प्रणालींच्या उपयोगामुळे ग्रंथालय आणि अभिलेखागार यांचे आधुनिक काळातील व्यवस्थापन अपरिहार्यपणे माहिती तंत्रज्ञानाशी जोडले गेले आहे.

भारतातील पहिले सरकारी अभिलेखागार इसवी सन १८९१ मध्ये 'इंपिरियल रेकॉर्ड डिपार्टमेंट' या नावाने कोलकाता येथे स्थापन झाले. इसवी सन १९११ मध्ये ते दिल्लीमध्ये आणले गेले.

इसवी सन १९९८ मध्ये भारताचे तत्कालीन राष्ट्रपती के. आर. नारायणन यांनी 'राष्ट्रीय अभिलेखागार' म्हणून ते जनतेसाठी खुले करण्यात आल्याचे जाहीर केले. ते भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाच्या अंतर्गत असलेले एक खाते आहे. इसवी सन १७४८ पासूनची कागदपत्रे इथे क्रमवार लावून ठेवलेली आहेत. त्यामध्ये इंग्रजी, अरबी, हिंदी, फारसी, संस्कृत, उर्दू या भाषा आणि मोडी लिपीतील नोंदींचा समावेश आहे. या नोंदींची वर्गवारी सार्वजनिक, प्राच्यविद्याविषयक, हस्तलिखिते आणि खासगी कागदपत्रे अशा चार प्रकारांत केली आहे.

त्याखेरीज भारतातील प्रत्येक राज्य शासनाची स्वतंत्र अभिलेखागार आहे. महाराष्ट्र राज्य शासनाच्या अभिलेखागार संचालनालयाच्या शाखा मुंबई, पुणे, कोल्हापूर, औरंगाबाद आणि नागपूर येथे आहेत. पुणे अभिलेखागारात मराठ्यांच्या इतिहासाशी संबंधित सुमारे पाच कोटी मोडी लिपीतील कागदपत्रे आहेत. त्याला पेशवे दप्तर असे म्हणतात.

## ९.४ कोशवाङ्मय

कोश म्हणजे शब्दांचा, विविध माहितीचा वा ज्ञानाचा केलेला पद्धतशीर संग्रह. विविध ज्ञानाचे विशिष्ट पद्धतीने केलेले संकलन आणि मांडणी म्हणजे कोश. उपलब्ध ज्ञानाचे व्यवस्थापन आणि सुलभ रीतीने त्याच्या उपलब्धीची सोय, हे त्याचे उद्दिष्ट होय.

**कोशाची आवश्यकता :** कोशामुळे वाचकांपर्यंत ज्ञान पोचवले जाते, त्याची जिज्ञासा पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जातो. एखाद्या मुद्द्याचा सविस्तर उलगडा केला जातो. वाचकाला त्याचा अभ्यास वाढवण्याची प्रेरणा मिळते. जे अभ्यासक, संशोधक असतात त्यांच्यासाठी ज्ञानाचा पूर्वसंग्रह उपलब्ध करून देऊन त्यात अधिक भर घालण्याची, संशोधन करण्याची गरज कोश निर्माण करतात. कोशवाङ्मय राष्ट्राच्या सांस्कृतिक अवस्थेचे प्रतीक असून समाजाची बौद्धिक वा सांस्कृतिक गरज ज्या-ज्या प्रकारची असेल, त्या प्रकारच्या कोशवाङ्मयाची निर्मिती त्या-त्या समाजात होते.

कोशातील माहितीच्या मांडणीकरिता अचूकपणा, नेमकेपणा, वस्तुनिष्ठता, बांधीवपणा आणि अद्ययावतता या गोष्टी आवश्यक असतात. अद्ययावतता राखण्यासाठी ठरावीक काळाने कोशांच्या सुधारित आवृत्त्या किंवा पुरवण्या काढाव्या लागतात.

कोशरचना करताना अकारविल्हे आणि विषयवार अशा दोन पद्धती ढोबळमानाने वापरतात. हे करत असताना वाचकाची सोय आणि माहिती शोधण्याची सोय या गोष्टी लक्षात घ्याव्या लागतात. कोशाच्या शेवटी सूची दिलेली असेल तर वाचकाची उत्तम सोय होते.

वरील प्रकारची कोशरचना एखादी व्यक्ती किंवा संपादक मंडळ करू शकते. कोशवाङ्मयातील लेखन करत असताना विविध विषयांमधील तज्ज्ञांची गरज भासते.

**कोशाचे प्रकार :** कोशांचे सर्वसाधारणपणे चार विभागांत वर्गीकरण करता येते. (१) शब्दकोश (२) विश्वकोश (३) कोशसदृश वाङ्मय (४) सूची वाङ्मय.

**(१) शब्दकोश :** यात शब्दांचा संग्रह, शब्दांचा अर्थ, प्रतिशब्द, पर्यायी शब्द, शब्दांची व्युत्पत्ती दिलेली असते. शब्दकोशांचे महत्त्वाचे प्रकार म्हणजे

सर्वसंग्राहक, विशिष्ट शब्दकोश, परिभाषाकोश, व्युत्पत्तिकोश, समानार्थी किंवा विरुद्धार्थी शब्दकोश, म्हणी-वाक्प्रचार संग्रह कोश इत्यादी.

**(२) विश्वकोश :** विश्वकोशाचे दोन भाग पडतात. (अ) सर्वसंग्राहक (उदा., एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिका, महाराष्ट्रीय ज्ञानकोश, मराठी विश्वकोश इत्यादी) (आ) विशिष्ट विषयपर कोश - हे एखाद्या विषयाला वाहून घेतलेले कोश असतात. उदा., भारतीय संस्कृती कोश, व्यायाम ज्ञानकोश इत्यादी.

**(३) कोशसदृश वाङ्मय :** यात एखाद्या विषयाची समग्र मांडणी केलेली असते. यामध्ये एखाद्या विशिष्ट विषयावर तज्ज्ञांकडून लेख लिहून घेऊन ग्रंथनिर्मिती करतात. उदा., महाराष्ट्र जीवन खंड-१,२, शहर पुणे खंड-१,२, इयरबुक (मनोरमा, टाईम्स ऑफ इंडिया)

**(४) सूचिवाङ्मय :** ग्रंथाच्या अखेरीस दिलेली त्या ग्रंथातील व्यक्ती, विषय, स्थळे व ग्रंथ यांची यादी, शब्द यांच्या याद्यांना सूची म्हणतात. सूची सहसा अकारविल्हे असते. ती त्या-त्या ग्रंथाच्या वाचनास मदत करणारी असते. उदा., मराठी नियतकालिकांची दाते यांनी सिद्ध केलेली सूची.

**कोश आणि इतिहास :** इतिहास विषयात आणि कोशात वस्तुनिष्ठतेला महत्त्व असते हा या दोघांमधला समान धागा आहे. प्रत्येक राष्ट्रातील, प्रत्येक भाषेतील, विश्वकोश वेगळे असतात. कारण त्यांचे प्राधान्यक्रम वेगळे असतात. स्वराष्ट्राची ध्येयधोरणे, जीवनमूल्ये, आदर्श यांचा प्रभाव कोशावर पडतो. तत्वज्ञान आणि परंपरा यांचाही प्रभाव कोशावर पडतो. राष्ट्रीय अस्मिता जागी करण्याचा प्रयत्न कोशांद्वारे करता येतो. उदा., महादेवशास्त्री जोशी संपादित भारतीय संस्कृती कोश. जीवनाच्या विविध क्षेत्रांमधील ज्ञान सर्वांच्या विकासासाठी उपलब्ध करून देणे, ही कोशरचनेची एक प्रेरणा असते. ज्ञानार्जन व ज्ञानप्रसार यांस एक जीवनश्रद्धा मानून त्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक स्वरूपात



**माहीत आहे का तुम्हांला ?**

पश्चिमेकडील देशांमध्ये (१) 'नॅचरल हिस्ट्री' (इ.स.पहिले शतक) हा थोरल्या प्लिनीने रचलेला पहिला कोश. (२) १८ व्या शतकातील फ्रेंच विश्वकोश हा डिडेरो यांचा कोश महत्त्वाचा आहे. (३) एनसायक्लोपीडिया ऑफ ब्रिटानिका हा कोश प्रथम इ.स.१७६७ मध्ये प्रसिद्ध झाला. हा कोश रचनेच्या वाटचालीतील अत्यंत महत्त्वाचा टप्पा मानला जातो.

संस्कृत भाषेत निघंटू, धातुपाठ यांसारख्या शब्दकोशांची परंपरा प्राचीन आहे. मध्ययुगात महानुभाव पंथियांची कोशरचना, छत्रपती शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीतील राज्यव्यवहारकोश हे महत्त्वाचे आहेत.

प्रयत्न केले जातात. म्हणून कोश म्हणजे समाजाचे मानचिन्हच समजले जाते. समाजाची प्रज्ञा आणि प्रतिभा यांचा प्रातिनिधिक आविष्कार कोशरचनेत बघायला मिळतो.

**इतिहास विषयाशी संबंधित कोश :** इतिहास या विषयातील कोशपरंपरा समृद्ध आहे. रघुनाथ भास्कर गोडबोले यांचा भारतवर्षीय प्राचीन ऐतिहासिक कोश (१८७६) हा आद्यकोश होय. भारतवर्षीय प्राचीन ऐतिहासिक कोशात प्राचीन काळातील भारतीय व्यक्ती आणि स्थळे यांचा अंतर्भाव आहे. या कोशात 'भरतवर्षात पूर्वी आपणामध्ये जे जे प्रख्यात लोक होऊन गेले त्यांचा, त्यांच्या स्त्रिया, त्यांचे पुत्र, त्यांचा धर्म, त्यांचे देश व राजधान्या, तसेच त्या त्या देशांतील नद्या व पर्वत इत्यादिकांसहित.... जो इतिहास तो' यात दिला आहे.

श्रीधर व्यंकटेश केतकर यांचे 'महाराष्ट्रीय ज्ञानकोशा'चे तेवीस खंड आहेत. मराठी माणसांना बहुश्रुत करावे, त्यांच्या ज्ञानाची कक्षा विस्तारावी, त्यांच्या विचारांचे क्षेत्र अधिक व्यापक व्हावे आणि जगातील प्रगत लोकांच्या बरोबरीने त्यांनी प्रगल्भ

व्हावे ही केतकरांची ज्ञानकोशरचनेमागील भूमिका होती. या खंडांमधून त्यांनी व्यापक इतिहासाची मांडणी केली आहे.

या पुढचा महत्त्वाचा कोश म्हणजे भारतवर्षीय चरित्रकोश होय. सिद्धेश्वरशास्त्री चित्राव यांनी 'भारतीय चरित्रकोश मंडळा'ची स्थापना करून तिच्यातर्फे भारतवर्षीय प्राचीन चरित्रकोश (१९३२), भारतवर्षीय मध्ययुगीन चरित्रकोश (१९३७), भारतवर्षीय अर्वाचीन चरित्रकोश (१९४६) असे तीन चरित्रकोश संपादून प्रसिद्ध केले. या कोशांची कल्पना यावी म्हणून प्राचीन चरित्रकोशातील नोंदी बघता येतील. या कोशात श्रुती, स्मृती, सूत्रे, वेदांगे, उपनिषदे, पुराणे तसेच जैन व बौद्ध साहित्यातील निर्देशित व्यक्तींची माहिती देण्यात आली आहे.



**माहीत आहे का तुम्हांला ?**

**काही वैशिष्ट्यपूर्ण कोश**

(१) संगीतशास्त्रकार व कलावंत यांचा इतिहास (लक्ष्मण दत्तात्रय जोशी),

(२) क्रांतिकारकांचा चरित्रकोश (शं.रा.दाते) ज्यांत भारतातील सुमारे २५० क्रांतिकारकांची चरित्रे व छायाचित्रे आहेत.

(३) स्वातंत्र्यसैनिक : चरित्रकोश (न.र.फाटक) या कोशात स्वातंत्र्यलढ्यात प्रत्यक्ष देहदंड, कारावास भोगलेल्या व स्वातंत्र्यपूर्वकाळात समाजाच्या निरनिराळ्या क्षेत्रांत काम केलेल्या स्वातंत्र्यसैनिकांची माहिती आहे.

**स्थळ कोश :** इतिहासाच्या अभ्यासासाठी भूगोल महत्त्वाचा आहे. विविध ऐतिहासिक स्थळांच्या संदर्भात माहिती देणारे कोश आहेत.

(१) महानुभाव पंथातील मुनी व्यास यांनी रचलेला स्थानपोथी (१४ वे शतक) या ग्रंथात महानुभाव पंथाचे प्रवर्तक श्रीचक्रधर स्वामी ज्या-ज्या गावी गेले त्या गावांची तपशीलवार नोंद आहे. तत्कालीन महाराष्ट्राची कल्पना या ग्रंथावरून येते. लीळाचरित्रातील विविध घटना केव्हा, कोणत्या स्थळी व कोणत्या प्रसंगाने घडल्या हेही स्थानपोथीकार सांगतात. त्यामुळे श्रीचक्रधरस्वामींच्या चरित्रलेखनासाठी हा उत्तम संदर्भग्रंथ आहे.

(२) प्राचीन भारतीय स्थलकोश (१९६९) : सिद्धेश्वरशास्त्री चित्राव यांनी या कोशाची रचना केली आहे. वैदिक साहित्य, कौटिलीय अर्थशास्त्र, पाणिनीचे व्याकरण, वाल्मीकी-रामायण, महाभारत, पुराणे, मध्ययुगीन संस्कृत आणि शब्दकोश साहित्य, तसेच फार्सी, जैन, बौद्ध, ग्रीक आणि चिनी साहित्य यांमधील भौगोलिक स्थळांची माहिती कोशात दिली आहे.

**विश्वकोश :** महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी मराठी भाषा व साहित्य यांच्या अभिवृद्धीसाठी महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या वतीने मराठी विश्वकोश निर्मितीस चालना दिली. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या नेतृत्वाखाली विश्वकोश निर्मिती सुरू झाली. जगभरातील ज्ञान साररूपाने या कोशांमध्ये आणले आहे. इतिहास विषयाशी निगडित असणाऱ्या महत्त्वाच्या नोंदी यात आहे.

**भारतीय संस्कृती कोश :** महादेवशास्त्री जोशी यांच्या संपादकत्वाखाली भारतीय संस्कृती कोशाचे दहा खंड तयार करण्यात आले. या कोशांमध्ये आसेतूहिमाचल अशा भारताचा इतिहास, भूगोल, भिन्न भाषक लोक, त्यांनी घडवलेला इतिहास, सण-उत्सव सांस्कृतिक बाबी यांची दखल घेण्यात आली आहे.

**संज्ञा कोश :** इतिहासातील संज्ञा वेगळ्या काढून त्या समजावून सांगणारे कोश इतिहासात तयार करतात. अभ्यासकांना त्याचा उपयोग होतो.

इतिहास विषयाच्या अभ्यासकांना कोशरचनेच्या कामात भरपूर संधी उपलब्ध आहेत. कोणत्याही विषयावरचा कोश असो त्याला इतिहासाची जोड देणे

आवश्यक असते. प्रत्येक विषयाला इतिहास असतो. इतिहासाचे अभ्यासक कोशांच्या अभ्यासातून घटना कोश, दिनविशेष, व्यक्तिकोश, संज्ञाकोश, स्थलकोश इत्यादी कोश तयार करण्यात सहभागी होऊ शकतात.

या पाठ्यपुस्तकाच्या अभ्यासानंतर तुमच्या हेही लक्षात आले असेल की इतिहास या विषयात प्रावीण्य संपादन केले तर अनेक क्षेत्रांमधील व्यवसायाच्या संधी उपलब्ध होऊ शकतात. या पाठ्यपुस्तकात दिलेल्या माहितीचा उपयोग करून तुम्हांला तुमच्या आवडीप्रमाणे भविष्यातील कार्यक्षेत्र निवडता येईल.

## स्वाध्याय

**१. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

(१) लिओनार्दो द विंची या जगप्रसिद्ध इटालियन चित्रकाराने रेखाटलेल्या .......... या चित्राचा समावेश लुव्र संग्रहालयात आहे.
(अ) नेपोलियन (ब) मोनालिसा
(क) हॅन्स स्लोअन (ड) दुसरा जॉर्ज

(२) कोलकाता येथील .......... हे भारतातील पहिले संग्रहालय होय.
(अ) गव्हर्न्मेंट म्युझियम
(ब) राष्ट्रीय वस्तुसंग्रहालय
(क) छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय
(ड) भारतीय संग्रहालय

**(ब) पुढीलपैकी चुकीची जोडी दुरुस्त करून पुन्हा लिहा.**

(१) महाराज सयाजीराव विद्यापीठ - दिल्ली
(२) बनारस हिंदू विद्यापीठ - वाराणसी
(३) अलिगढ मुस्लीम युनिव्हर्सिटी - अलिगढ
(४) जिवाजी विद्यापीठ - ग्वालियर

**२. पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

(१) अभिलेखागारे व ग्रंथालये नियतकालिके आणि इतर प्रकाशने प्रसिद्ध करतात.
(२) विविध विषयांमधील कृतींसाठी प्रशिक्षणाची आवश्यकता असते.


**३. टीपा लिहा.**

(१) स्थल कोश (२) विश्वकोश
(३) संज्ञा कोश (४) सरस्वती महाल ग्रंथालय

**४. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

(१) ग्रंथालय व्यवस्थापन का महत्त्वाचे आहे ?
(२) अभिलेखागाराच्या व्यवस्थापनात कोणती कामे महत्त्वाची आहेत?

**५. पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा.**




**उपक्रम**

आंतरजालाच्या मदतीने महाराष्ट्रातील प्रमुख ग्रंथालयांची माहिती मिळवा. तुमच्या परिसरातील ग्रंथालयाला भेट देऊन तेथील कार्यपद्धती समजावून घ्या.

2C12BE

# राज्यशास्त्र

## अनुक्रमणिका

### संविधानाची वाटचाल


| क्र. | पाठाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | संविधानाची वाटचाल...................... | ६९ |
| २. | निवडणूक प्रक्रिया.......................... | ७५ |
| ३. | राजकीय पक्ष ............................ | ८२ |
| ४. | सामाजिक व राजकीय चळवळी........... | ९१ |
| ५. | भारतीय लोकशाहीसमोरील आव्हाने ....... | ९७ |

## क्षमता विधाने

| अ.क्र. | घटक | क्षमता |
|---|---|---|
| १. | संविधानाची वाटचाल | ▪ संविधानामुळे भारतातील लोकशाही दृढ झाली हे जाणून घेणे.<br>▪ संविधानाची वाटचाल सामाजिक परिवर्तनाच्या दिशेने होत असल्याचे सांगता येणे. |
| २. | निवडणूक प्रक्रिया | ▪ निवडणूक आयोगाचे महत्त्व जाणून घेणे.<br>▪ निवडणुकीत प्रत्येक मतदाराने मतदान करणे ही संविधानात्मक जबाबदारी आहे, ही जाणीव विकसित करणे.<br>▪ निवडणूक प्रक्रियेत जनतेची भूमिका महत्त्वाची असते हे ओळखणे.<br>▪ निवडणूक प्रक्रियेची माहिती मिळवण्यासाठी व्हिडीओ क्लिपची मदत घेणे.<br>▪ मतदारसंघाच्या नकाशात स्वतःचा मतदारसंघ शोधतो/लोकसभा मतदारसंघ शोधणे/दर्शवणे. |
| ३. | राजकीय पक्ष (राष्ट्रीय) | ▪ राजकीय पक्षांची जबाबदारी व कार्ये जाणून घेणे.<br>▪ नव्याने अस्तित्वात येणाऱ्या पक्षांची कारणमीमांसा करता येणे.<br>▪ भारतातील राष्ट्रीय पक्षांच्या धोरणाची तुलना करून निष्कर्ष काढता येणे.<br>▪ राजकीय पक्षांच्या निवडणूक चिन्हांचा संग्रह तक्ता तयार करणे. |
| ४. | राजकीय पक्ष (प्रादेशिक) | ▪ महाराष्ट्रातील प्रादेशिक पक्षांची तत्त्वे व कार्ये सांगता येणे.<br>▪ एखाद्या पक्षाचे नेते, त्यांच्या सभा याविषयीच्या बातम्यांचे संकलन करता येणे.<br>▪ प्रादेशिक पक्ष प्रबळ का होतात याची चर्चा करणे. |
| ५. | सामाजिक व राजकीय चळवळी | ▪ सामाजिक व राजकीय चळवळींचा अर्थ समजून घेणे.<br>▪ सामाजिक चळवळी जनजागृतीसाठी कोणत्या मार्गांचा अवलंब करतात हे ओळखता येणे.<br>▪ महिला व अन्य दुर्बल घटकांच्या सक्षमीकरणाचा अर्थ सांगता येणे.<br>▪ शेतकरी व कामगारांच्या मागण्यांची माहिती करून घेणे.<br>▪ विद्यार्थी चळवळीसंबंधी वर्तमानपत्रातील बातम्या गोळा करणे. |
| ६. | भारतापुढील आव्हाने | ▪ 'विविधतेतील एकता' याचा अर्थ सांगता येणे.<br>▪ भारतातील विविधतेचा आदर करण्याची वृत्ती विकसित होणे.<br>▪ विविध आव्हानांचे वस्तुनिष्ठ स्वरूप स्पष्ट करता येणे.<br>▪ अंतर्गत आव्हानांना तोंड कसे देता येते याचे विवेचन करता येणे. |

# १. संविधानाची वाटचाल

राज्यशास्त्राच्या आतापर्यंतच्या पाठ्यपुस्तकांमधून आपण स्थानिक शासनसंस्था, भारतीय संविधानातील मूल्ये आणि त्यातून व्यक्त होणारे तत्त्वज्ञान याचबरोबर संविधानाने निर्माण केलेली शासनयंत्रणा आणि आंतरराष्ट्रीय संबंधांतील भारताचे स्थान यांचा विस्तृत आढावा घेतला. भारताच्या संविधानाने भारताचे धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य निर्माण करण्याचे उद्दिष्ट मांडले आहे. नागरिकांना न्याय मिळावा, त्यांचे स्वातंत्र्य अबाधित राहावे म्हणून संविधानात अत्यंत महत्त्वपूर्ण तरतुदी केल्या आहेत. सामाजिक न्याय आणि समतेवर आधारलेला एक प्रागतिक विकसित समाज निर्माण करण्यासाठीचे एक साधन म्हणून भारताच्या संविधानाकडे पाहिले जाते. भारतात संविधानानुसार राज्यकारभार करण्यास २६ जानेवारी १९५० पासून सुरुवात झाली. तेव्हापासून ते आतापर्यंत संविधानाच्या आधारे जो राज्यकारभार झाला त्यातून भारतातील लोकशाहीचे व्यापक होत गेलेले स्वरूप, भारतातल्या राजकीय प्रक्रियेत झालेले महत्त्वाचे बदल, सामाजिक न्याय व समता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने उचलली गेलेली पावले, यांचा प्रस्तुत प्रकरणात आपण थोडक्यात आढावा घेणार आहोत. हा आशय अर्थातच तीन मुद्द्यांपुरता मर्यादित आहे. (१) लोकशाही (२) सामाजिक न्याय व समता (३) न्यायव्यवस्था.

## लोकशाही

**राजकीय प्रगल्भता :** लोकशाही शासनपद्धतीची केवळ संरचना असून चालत नाही. त्या संरचनांआधारे प्रत्यक्ष व्यवहार केल्यासच लोकशाही, समाजाच्या राजकीय जीवनाचा एक अविभाज्य भाग बनते. त्यानुसार आपल्या देशात लोकांना थेट प्रतिनिधित्व देणाऱ्या संसद, राज्य विधानसभा आणि स्थानिक शासनसंस्था आहेत. जनतेच्या सहभागाचा आणि राजकीय स्पर्धेचा विचार करता भारतातील लोकशाही मोठ्या प्रमाणात यशस्वी झाल्याचे दिसते. ठरावीक मुदतीनंतर मुक्त आणि न्याय्य वातावरणात होणाऱ्या निवडणुका हे भारतीय लोकशाहीचे यश आहे. लोकसंख्या व विस्तार या दोन्हींबाबत मोठ्या असलेल्या आपल्या देशात विविध पातळींवर निवडणुका घेणे ही बाब आव्हानात्मक आहे. वारंवार होणाऱ्या निवडणुकांमुळे भारतीय मतदाराच्या राजकीय जाणिवा प्रगल्भ होण्यास मदत झाली आहे. निवडणुकीदरम्यान समोर येणाऱ्या सार्वजनिक धोरण आणि प्रश्नांबाबत भारतीय मतदार भूमिका घेत आहेत. प्रश्नांच्या पर्यायांचा विचार करून मतदान करण्याच्या वृत्तीत वाढ झाली आहे.

**मताधिकार :** भारताच्या संविधानाने प्रौढ मताधिकाराची तरतूद केलेली होतीच. त्यानुसार मताधिकाराची व्याप्ती मुळातच व्यापक होती. मताधिकाराचा संकोच करणाऱ्या स्वातंत्र्यपूर्वकाळात प्रचलित असलेल्या सर्व तरतुदी नष्ट करून स्वतंत्र भारतात प्रत्येक भारतीय स्त्री-पुरुषाला २१ वर्षे वयाची अट निश्चित करून मतदानाचा अधिकार संविधानाने दिला होता. तो आणखी व्यापक करत मतदाराचे वय २१ वरून १८ वर्षे इथपर्यंत आणले. स्वतंत्र भारतातील नव्या युवा वर्गाला यामुळे अर्थातच राजकीय अवकाश प्राप्त झाले. अशा लोकशाहीची व्याप्ती वाढवणाऱ्या बदलामुळे भारतीय लोकशाही जगातील सर्वांत मोठी लोकशाही मानली जाते. इतकी मतदारसंख्या अन्य कोणत्याच लोकशाही असलेल्या देशात आढळत नाही. हा बदल केवळ संख्यात्मक नसून तो गुणात्मकही आहे. अनेक राजकीय पक्ष या युवा मतदारांच्या पाठिंब्यामुळे सत्तेच्या स्पर्धेत उतरले. भारतातील राजकीय स्पर्धेचे स्वरूपही त्यामुळे बदलले आहे.

लोकांच्या इच्छा-आकांक्षांना प्रतिनिधित्व देण्याच्या हेतूने आज अनेक पक्ष या स्पर्धेत दिसतात.

**लोकशाही विकेंद्रीकरण :** सत्तेचे विकेंद्रीकरण हा लोकशाहीचा गाभा आहे. विकेंद्रीकरणामुळे सत्तेच्या गैरवापराला जसा आळा बसतो, त्याचप्रमाणे सामान्य जनतेला सत्तेत सहभागी होण्याच्या संधीही मिळतात. लोकशाही विकेंद्रीकरणाच्या संदर्भात संविधानातील मार्गदर्शक तत्वांमध्ये तरतुदी आहेत. स्थानिक पातळीवरील शासनसंस्थांना पुरेसे अधिकार देऊन त्यांच्याद्‌वारे खरीखुरी लोकशाही प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न करावा अशा स्वरूपाचे ते मार्गदर्शक तत्व आहे. त्याला अनुसरून स्वतंत्र भारतात लोकशाही विकेंद्रीकरणाचे खूप प्रयत्न झाले. यांतील सर्वांत मोठा प्रयत्न अर्थातच ७३ व ७४ व्या संविधान दुरुस्तीचा होता. या दुरुस्त्यांमुळे स्थानिक शासनसंस्थांना संविधानाची मान्यता तर मिळालीच पण त्याहीपेक्षा त्यांच्या अधिकारात खूप मोठी वाढ झाली.

**खालील बदल कशामुळे झाले ते सांगू शकाल का ?**

- राज्यकारभारात महिलांचा सहभाग वाढावा म्हणून त्यांच्यासाठी राखीव जागा ठेवण्यात आल्या.
- दुर्बल समाजघटकांना सत्तेत सहभागी होता यावे म्हणून त्यांच्यासाठी राखीव जागा ठेवण्यात आल्या.
- राज्य निवडणूक आयोग निर्माण करण्यात आला.
- संविधानात अकरा व बारा अशा नव्या दोन परिशिष्टांची भर पडली.

**माहितीचा अधिकार (R.T.I.2005) :** लोकशाहीत नागरिकांचे सक्षमीकरण अनेक मार्गांनी झाले पाहिजे. नागरिकांना सहभागाच्या संधी देत असतानाच त्यांच्याशी असणारा शासनाचा संवाद वाढला पाहिजे. शासन व नागरिक यांच्यात जितके अंतर कमी आणि संवाद जास्त, त्या प्रमाणात लोकशाही प्रक्रिया सकस, सुदृढ होत जाते. त्यांच्यातील परस्पर विश्वास वाढण्यासाठीही शासन काय करते हे नागरिकांना समजले पाहिजे. पारदर्शकता आणि उत्तरदायित्व ही सुशासनाची दोन वैशिष्ट्ये प्रत्यक्षात आणण्यासाठी भारतीय नागरिकांना माहितीचा अधिकार देण्यात आला. माहितीच्या अधिकारामुळे शासनाच्या कारभारातील गोपनीयता कमी झाली व शासनाचे व्यवहार अधिक खुले व पारदर्शी होण्यास मदत झाली.

इ.स.२००० नंतरच्या काळात नागरिकांसाठी सुधारणा करताना तो त्यांचा हक्क मानून सुधारणा करण्याकडे कल वाढला. त्यानुसार माहितीचा, शिक्षणाचा व अन्नसुरक्षेचा हक्क भारतीयांना मिळाला आहे. या हक्कांमुळे भारतातील लोकशाही निश्चितपणे बळकट झाली आहे.



**माहीत आहे का तुम्हांला ?**

**हक्काधारित दृष्टिकोन (Rights based approach) :** स्वातंत्र्यानंतरच्या काही दशकांमध्ये भारताचे लोकशाहीकरण व्हावे म्हणून अनेक सुधारणा झाल्या, परंतु त्यात नागरिकांकडे 'लाभार्थी' म्हणून पाहण्याची दृष्टी होती. गेल्या काही दशकांतील सुधारणा मात्र 'नागरिकांचा तो हक्कच आहे' या भूमिकेतून येत आहेत.

अशा प्रकारच्या दृष्टिकोनामुळे शासन व नागरिक यांच्या संबंधात कोणते बदल होतील, असे तुम्हांला वाटते ?

**चर्चा करा.**

भारतीय नागरिकांना रोजगार मिळवण्याचा हक्क असावा असे तुम्हांस वाटते का?

सर्वांना निवाऱ्याचा हक्क मिळाला तर आपल्या देशातील लोकशाहीवर त्याचे कोणते परिणाम होतील असे तुम्हांला वाटते?

## सामाजिक न्याय व समता

सामाजिक न्याय व समता हे आपल्या संविधानाचे उद्‌दिष्ट आहे. या दोन मूल्यांवर आधारलेला एक नवा समाज निर्माण करणे हे आपले ध्येय आहे.

संविधानाने त्या दिशेने जाण्याचा मार्गही स्पष्ट केला आहे व त्या दिशेने आपली वाटचालही होत आहे.

सामाजिक न्याय प्रस्थापित करणे म्हणजे ज्या ज्या सामाजिक बाबींमुळे व्यक्तींवर अन्याय होतो तो दूर करणे व व्यक्ती म्हणून सर्वांचा दर्जा समान असतो याचा आग्रह धरणे. जात, धर्म, भाषा, लिंग, जन्मस्थान, वंश, संपत्ती इत्यादींवर आधारित श्रेष्ठ व कनिष्ठ असा भेद न करणे व सर्वांना विकासाची समान संधी उपलब्ध करून देणे हे न्याय व समतेचे उद्‌दिष्ट आहे.

सामाजिक न्याय व समता प्रस्थापित करण्यासाठी समाजात सर्व स्तरांवर प्रयत्न करावे लागतात, परंतु शासनाच्या धोरणांना व अन्य प्रयत्नांना विशेष महत्त्व असते. लोकशाही अधिकाधिक सर्वसमावेशक होण्यासाठी सर्व सामाजिक घटक मुख्य प्रवाहात आले पाहिजेत. लोकशाही ही सर्व समाजघटकांना सामावून घेण्याची प्रक्रिया आहे. त्याचप्रमाणे समावेशित लोकशाहीमुळे समाजातील संघर्षही कमी होतात. या सर्व दृष्टीने आपल्या देशात कोणते प्रयत्न झाले ते पाहू.

**राखीव जागांचे धोरण :** जे लोकसमूह अथवा समाजघटक शिक्षण आणि रोजगारांच्या संधीपासून दीर्घकाळ वंचित राहिले अशा समाजघटकांसाठी राखीव जागांचे धोरण स्वीकारण्यात आले. त्यानुसार अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींसाठी शिक्षण व सरकारी नोकऱ्यांमध्ये काही जागा राखीव ठेवल्या जातात. त्याचप्रमाणे इतर मागासवर्गीयांसाठीही राखीव जागांची तरतूद आहे.

**अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्यावरील अत्याचारांपासून संरक्षण देणारा कायदा :**

सामाजिक न्याय आणि समता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने हा एक महत्त्वाचा कायदा करण्यात आला. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीतील व्यक्तींवर कोणत्याही प्रकारचा अन्याय करण्यास या कायद्याद्वारे प्रतिबंध करण्यात आला असून अत्याचार घडल्यास शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे.



**करून पहा.**

वरील कायद्यातील तरतुदी वाचा. शिक्षकांच्या मदतीने त्या समजून घ्या. अत्याचार होऊच नयेत म्हणून कोणत्या प्रयत्नांची गरज आहे ?

**अल्पसंख्याकांविषयीच्या तरतुदी :** भारतीय संविधानाने अल्पसंख्याकांचे संरक्षण करण्यासाठी अनेक तरतुदी केल्या आहेत. अल्पसंख्याकांना शिक्षणाच्या व रोजगाराच्या संधी मिळाव्यात यासाठी शासनाने अनेक योजना राबवल्या आहेत. भारतीय संविधानाने जात, धर्म, वंश, भाषा व प्रदेश इत्यादी घटकांवर आधारित भेदभाव करण्यास प्रतिबंध केला आहे. अल्पसंख्याकांविषयीची ही व्यापक तरतूद असून समतेचा हक्क, स्वातंत्र्याचा हक्क, शोषणाविरुद्‌धचा हक्क आणि सांस्कृतिक व शैक्षणिक हक्कांमुळे अल्पसंख्याकांना मूलभूत स्वरूपाचे संरक्षण मिळाले आहे.

**महिलांसंबंधी कायदे व प्रतिनिधित्वविषयक तरतुदी :** स्वातंत्र्योत्तर काळापासून महिला–सक्षमीकरणाच्या प्रयत्नांना सुरुवात झाली. महिलांमधील निरक्षरता दूर करणे, त्यांना विकासाच्या पुरेशा संधी देणे यासाठी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर महिलांच्या समस्यांची दखल घेऊन काही धोरणे निश्चित करण्यात आली.

वडिलांच्या व पतीच्या संपत्तीत महिलांना समान वाटा, हुंडाप्रतिबंधक कायदा, लैंगिक अत्याचारापासून संरक्षण देणारा कायदा, घरगुती हिंसाचार प्रतिबंधक कायदा अशा काही महत्त्वपूर्ण तरतुदींनी महिलांना त्यांचे स्वातंत्र्य जपण्यास आणि स्वतःचा विकास साधण्यास अनुकूल वातावरण निर्माण केले.

आपल्या देशात राजकारण आणि राजकीय संस्था यांच्यातील स्त्रियांचे प्रतिनिधित्व हे

सुरुवातीपासूनच कमी आहे. जगभरातल्या अनेक देशांनी महिलांचे प्रतिनिधित्व वाढवण्याचा प्रयत्न केला. भारतातही या दृष्टीने बदल होत आहेत. ७३ व्या व ७४ व्या घटनादुरुस्तीने स्थानिक शासनसंस्थांमध्ये ३३% जागा महिलांसाठी राखीव ठेवल्या. त्यानंतर हे प्रमाण महाराष्ट्रासह अनेक राज्यांमध्ये ५०% पर्यंत वाढवण्यात आले आहे. महिलांसाठी राष्ट्रीय महिला आयोग स्थापन करण्यात आला. राज्यामध्येही राज्य महिला आयोग आहे.

घरगुती हिंसाचारापासून महिलांना संरक्षण देणारा कायदा हे लोकशाहीकरणाला पोषक असलेले महत्त्वाचे पाऊल आहे. स्त्रीची प्रतिष्ठा व आत्मसन्मान राखण्याची आवश्यकता या कायद्याने अधोरेखित केली. पारंपरिक वर्चस्व आणि अधिकारशाहीला नाकारणाऱ्या या निर्णयाने भारतीय लोकशाहीचा आवाका वाढवला, त्यातील समावेशन (inclusion) अधिक अर्थपूर्ण केले.



**करून पहा.**

### लोकसभेतील महिलांचे प्रतिनिधित्व

| अ. क्र. | वर्ष | महिला खासदारांची संख्या | महिला खासदारांची टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | १९५१-५२ | २२ | ४.५०% |
| २. | १९५७ | २२ | ४.४५% |
| ३. | १९६२ | ३१ | ६.२८% |
| ४. | १९६७ | २९ | ५.५८% |
| ५. | १९७१ | २८ | ५.४१% |
| ६. | १९७७ | १९ | ३.५१% |
| ७. | १९८० | २८ | ५.२९% |
| ८. | १९८४ | ४३ | ७.९५% |
| ९. | १९८९ | २९ | ५.४८% |
| १०. | १९९१ | ३९ | ७.३०% |
| ११. | १९९६ | ४० | ७.३७% |
| १२. | १९९८ | ४३ | ७.९२% |
| १३. | १९९९ | ४९ | ९.०२% |
| १४. | २००४ | ४५ | ८.२९% |
| १५. | २००९ | ५९ | १०.८७% |
| १६. | २०१४ | ६६ | १२.१५% |

शेजारील तक्ता काळजीपूर्वक वाचा व दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.

- सर्वांत कमी महिला खासदारांची संख्या कोणत्या वर्षीच्या निवडणुकीत आढळते ?
- सर्वाधिक महिला खासदारांची संख्या कोणत्या वर्षीच्या निवडणुकीत आढळते ?
- तक्त्यातील माहितीच्या आधारे लोकसभा निवडणुकीतील महिला खासदार (१९५१-२०१४) वृत्तालेख (Pie Chart)/स्तंभालेख (Bar Chart) तयार करा.

**तुम्हांला काय वाटते ?**

सार्वजनिक जीवनातील महिलांची दृश्यमानता (visibility) कमीच राहिलेली आहे. कुटुंब रचना, सामाजिक परिसर, आर्थिक क्षेत्र आणि राजकीय अवकाश अधिकाधिक खुले होत गेल्यास महिलांना निर्णयप्रक्रियेत सामील होऊन एकूण राज्यकारभाराला वेगळी दिशा देण्याची संधी मिळेल. यासाठी प्रातिनिधिक संस्थांमधील महिलांचा सहभाग वाढला पाहिजे.

### न्यायालयाची भूमिका

लोकशाही बळकट करण्याच्या प्रक्रियेत आणि सामाजिक न्याय व समता या उद्दिष्टांच्या दिशेने देशाची प्रगती करण्यात भारतातील न्यायालयांची भूमिकाही खूप महत्त्वाची आहे. न्यायालयाने संविधानातील तरतुदींचा अर्थ लावताना संविधानातील मूळ उद्दिष्टे आणि संविधानकारांचे हेतू यांना प्राधान्य दिले. न्यायालयाचे या संदर्भातील योगदान आपण

खालील मुद्द्यांच्या आधारे समजून घेऊ.

**(१) संविधानाची मूलभूत चौकट :** संविधान प्रवाही असते. एखाद्या जिवंत दस्तऐवजाप्रमाणे (living document) त्याचे स्वरूप असते. परिस्थितीनुसार संविधानात बदल करावे लागतात आणि तो अधिकार अर्थातच संसदेला आहे. संसदेचा हा अधिकार मान्य करत न्यायालयाने संविधानाला या तिच्या अधिकारावरील मर्यादांची जाणीव करून दिली. संविधानात बदल करताना संविधानाच्या मूलभूत चौकटीला (Basic structure of the Constitution) संसदेला धक्का लावता येणार नाही अशी न्यायालयाने भूमिका घेतली.

**हेही जाणून घ्या !**

संविधानाच्या मूलभूत चौकटीत साधारणतः पुढील तरतुदींचा समावेश होतो.

- शासनाचे प्रजासत्ताक आणि लोकशाही स्वरूप
- संविधानाचे संघराज्यात्मक स्वरूप
- देशाच्या ऐक्य व एकात्मतेचे संवर्धन
- देशाचे सार्वभौमत्व
- धर्मनिरपेक्षता आणि संविधानाची सर्वश्रेष्ठता

**(२) महत्त्वपूर्ण न्यायालयीन निर्णय :** संविधानातील मूलभूत हक्कांद्वारे नागरिकांना मिळालेले संरक्षण अधिक अर्थपूर्ण करण्याच्या दृष्टीने न्यायालयाने अनेक निर्णय दिले आहेत. न्यायालयाने ज्या काही महत्त्वाच्या विषयांवर निर्णय दिले आहेत त्यांत बालकांचे हक्क; मानवी हक्कांची जपणूक; महिलांची प्रतिष्ठा आणि त्यांचा सन्मान राखण्याची गरज; व्यक्तिस्वातंत्र्य; आदिवासींचे सक्षमीकरण यांसारख्या विषयांचा समावेश करता येईल. न्यायालयाच्या या विषयांवरील निर्णयातून भारतातील राजकीय प्रक्रिया परिपक्व होण्यास मदत झाली आहे.

**समजून घ्या ! काही महत्त्वाचे आहे.**

लोकशाहीसाठी सुशासन किंवा उत्तम शासनव्यवहार करणे आवश्यक असते. त्यासाठी खालील वैशिष्ट्यांचा समावेश आवश्यक असतो. सुशासनाची ही वैशिष्ट्ये लोकशाहीत आणण्यासाठी काय करावे लागेल ?

- उत्तरदायित्व/जबाबदारी जाणणारे सरकार
- प्रभावी आणि कार्यक्षम सरकार
- प्रतिसादात्मक सरकार
- पारदर्शी कारभार
- न्याय्य व सर्वसमावेशक विकास
- शासकीय यंत्रणेत व निर्णय प्रक्रियेत लोकांचा सहभाग

**जाणून घ्या !**

सर्वोच्च न्यायालयाने अलीकडच्या काही वर्षांत वरील विषयांवर काय निर्णय दिले आहेत ते शोधा व त्यावर चर्चा करा.

भारतातील लोकशाहीच्या संदर्भात संविधान व त्यावर आधारित शासनाने केलेली वाटचाल याचा आपण इथे आढावा घेतला. अर्थात भारतीय लोकशाहीपुढे अनेक आव्हाने आहेत. शासनाच्या कायद्यांमुळे व धोरणांमुळे सर्व समस्या संपुष्टात आल्या असा याचा अर्थ नाही. आजही आपल्यासमोर अनेक नवीन प्रश्न आहेत, परंतु लोकशाहीसाठी आवश्यक असे किमान जनमानस आकारास आले आहे.

पुढील पाठात आपण भारतातील निवडणूक प्रक्रिया याविषयी माहिती घेणार आहोत.



## स्वाध्याय

**१. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

(१) महाराष्ट्रात स्थानिक शासनसंस्थांमध्ये महिलांसाठी ........... जागा राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत.

(अ) २५%　　(ब) ३०%

(क) ४०%　　(ड) ५०%

(२) पुढील कोणत्या कायद्याद्वारे महिलांना त्यांचे स्वातंत्र्य जपण्यास आणि स्वतःचा विकास साधण्यास अनुकूल वातावरण निर्माण केले आहे ?

(अ) माहितीचा अधिकार कायदा

(ब) हुंडाप्रतिबंधक कायदा

(क) अन्नसुरक्षा कायदा

(ड) यांपैकी कोणतेही नाही.

(३) लोकशाहीचा गाभा म्हणजे ........

(अ) प्रौढ मताधिकार

(ब) सत्तेचे विकेंद्रीकरण

(क) राखीव जागांचे धोरण

(ड) न्यायालयीन निर्णय

**२. पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा.**

(१) भारतीय लोकशाही जगातील सर्वांत मोठी लोकशाही मानली जाते.

(२) माहितीच्या अधिकारामुळे शासनाच्या कारभारातील गोपनीयता वाढली आहे.

(३) संविधानाचे स्वरूप एखाद्या जिवंत दस्तऐवजाप्रमाणे असते.

**३. टीपा लिहा.**

(१) अल्पसंख्याकविषयक तरतुदी

(२) राखीव जागाविषयक धोरण

(३) लोकसभेतील महिलांचे प्रतिनिधित्व

**४. पुढील संकल्पना स्पष्ट करा.**

(१) हक्काधारित दृष्टिकोन

(२) माहितीचा अधिकार

**५. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

(१) मतदाराचे वय २१ वर्षांवरून १८ वर्षे केल्यामुळे कोणते परिणाम झाले ?

(२) सामाजिक न्याय प्रस्थापित करणे म्हणजे काय ?

(३) न्यायालयाने दिलेल्या कोणकोणत्या निर्णयांमुळे महिलांच्या सन्मान व प्रतिष्ठेची जपणूक झालेली आहे ?

### उपक्रम

(१) माहितीच्या अधिकारातून कोणत्या प्रकारची माहिती मिळवता येते, याची शिक्षकांच्या मदतीने माहिती मिळवा.

(२) अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी शासन कोणत्या सोई-सवलती देते त्यांची यादी करा.

(३) राष्ट्रीय निवडणूक आयोगाच्या अधिकृत संकेतस्थळास भेट देऊन त्याबद्दल अधिक माहिती मिळवा.

(४) आपल्या परिसरातील स्थानिक शासनसंस्थांमध्ये प्रतिनिधित्व करणाऱ्या महिला प्रतिनिधींची भेट घेऊन त्यांची मुलाखत घ्या.

2C9XD2

# २. निवडणूक प्रक्रिया

भारताच्या लोकशाहीच्या दिशेने होणाऱ्या वाटचालीत निवडणुकांचा फार मोठा वाटा आहे. निवडणुका आणि प्रतिनिधित्व या लोकशाहीशी संबंधित अत्यंत महत्त्वाच्या प्रक्रिया असून निवडणुकीच्या माध्यमातून लोकप्रतिनिधी निवडले जातात, हे आपणांस माहीत आहे. निवडणुकांमुळे सत्ता शांततामय मार्गाने बदलली जाते. वेगवेगळ्या पक्षांना राज्यकारभाराची संधी मिळते. शासनाच्या धोरणांमध्ये बदल घडतात व समाजजीवनही बदलते. आपण जे प्रतिनिधी निवडून देतो ते कार्यक्षम, प्रामाणिक, विश्वासू, जनमताची कदर करणारे असावेत अशी एक भावना असते. ज्या निवडणूक प्रक्रियेद्‌वारे आपण त्यांना निवडून देणार आहोत, ती निवडणूक प्रक्रियाही खुली, न्याय्य आणि विश्वासार्ह असावी लागते. यादृष्टीने भारताच्या संविधानाने निवडणुका घेण्यासाठी एका स्वतंत्र निवडणूक आयोगाची तरतूद केली आहे.

भारताचा निवडणूक आयोग आणि राज्यपातळीवर असणारा राज्य निवडणूक आयोग आपल्या देशातील सर्व महत्त्वाच्या निवडणुका घेतात. निवडणुकीच्या तारखा घोषित करण्यापासून ते निवडणुकांचे निकाल जाहीर करेपर्यंतची सर्व निवडणूक प्रक्रिया निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शनाखाली आणि नियंत्रणाखाली चालते. एका मोठ्या व व्यापक लोकशाही प्रक्रियेचा निवडणूक प्रक्रिया हा एक अविभाज्य भाग आहे.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

प्रतिनिधित्व म्हणजे काय ? आधुनिक लोकशाही ही प्रातिनिधिक लोकशाही आहे. लोकशाहीतील निर्णय प्रक्रियेत संपूर्ण जनतेला सामावून घेणे शक्य नाही. यातून जनतेने आपल्या वतीने काही लोकांना राज्यकारभार करण्यासाठी प्रतिनिधी म्हणून निवडून देण्याची पद्‌धत निर्माण झाली. प्रतिनिधींनी जनतेला जबाबदार राहून जनतेच्या कल्याणाला प्राधान्य देत राज्यकारभार करणे अपेक्षित असते.

प्रस्तुत पाठात आपण निवडणूक आयोगाची रचना, कार्ये व भूमिका समजावून घेणार आहोत. निवडणूक प्रक्रियेत कोणत्या सुधारणा आवश्यक आहेत, याचीही चर्चा आपण करणार आहोत.

## निवडणूक आयोग

भारतातील निवडणूक प्रक्रियेच्या केंद्रस्थानी अर्थातच निवडणूक आयोग आहे. भारतीय संविधानाच्या कलम ३२४ ने या स्वायत्त यंत्रणेची निर्मिती केली असून त्यात एक मुख्य निवडणूक आयुक्त व अन्य दोन निवडणूक आयुक्त असतात.

निवडणूक आयुक्तांची नेमणूक राष्ट्रपती करतात. निवडणूक आयोगाचे स्वातंत्र्य जपले जावे म्हणून मुख्य निवडणूक आयुक्तांना सहजासहजी अथवा एखाद्या राजकीय कारणावरून पदभ्रष्ट केले जात नाही. निवडणूक आयोगाच्या खर्चासाठी स्वतंत्र आर्थिक तरतूद असते.

**माहीत आहे का तुम्हांला ?**


सुकुमार सेन

स्वतंत्र भारतातील पहिले मुख्य निवडणूक आयुक्त सुकुमार सेन होते. १९२१ साली सेन हे ब्रिटिशकालीन भारतीय प्रशासकीय सेवेत दाखल झाले. पुढे १९५० मध्ये निवडणूक आयोगाची स्थापना झाल्यानंतर त्यांना निवडणूक आयुक्तांचा पदभार दिला. अतिशय प्रतिकूल व कठीण परिस्थितीत देखील सेन यांनी अगदी कौशल्याने आयोगाचे कामकाज सांभाळले.

निवडणूक आयोगाकडे स्वतंत्र कर्मचारी वर्ग नाही. इतर शासकीय विभागांतील अधिकारी, शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या मदतीने निवडणूक प्रक्रिया पार पाडली जाते.

## निवडणूक आयोगाची कार्ये

**(१) मतदार याद्या तयार करणे :** वयाची १८ वर्षे पूर्ण केलेल्या प्रत्येक भारतीय नागरिकाला मतदानाचा हक्क आहे. तो बजावण्यासाठी त्याचे नाव मतदार यादीत असावे लागते. मतदार याद्या तयार करणे, त्या अद्ययावत करणे, नव्या मतदारांचा समावेश करणे इत्यादी कामे निवडणूक आयोग करते. मतदारांना ओळखपत्र देण्याचा अधिकार निवडणूक आयोगाला आहे.



**माहीत आहे का तुम्हांला ?**

मतदार नोंदणीसाठी विशेष मतदार जागृती मोहीम आखण्यात येते. त्यासाठी राष्ट्रीय मतदार दिवस साजरा केला जातो.

**(२) निवडणुकांचे वेळापत्रक व संपूर्ण कार्यक्रम ठरवणे :** निवडणुकीचे संपूर्ण संचालन ही निवडणूक आयोगावरील जबाबदारी असल्याने कोणत्या राज्यात केव्हा व किती किती टप्प्यांत निवडणुका घ्यायच्या हे निवडणूक आयोग ठरवते.

**(३) उमेदवारांच्या अर्जांची छाननी :** निवडणुकांच्या तारखा जाहीर झाल्यानंतर विविध राजकीय पक्ष आपले उमेदवार निवडणुकीसाठी उभे करतात. तसेच कोणत्याही पक्षाचा पाठिंबा न घेता स्वतंत्रपणे काही उमेदवार निवडणूक लढवतात. अशा अपक्ष उमेदवारांसह निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या या सर्व उमेदवारांना अर्ज भरावा लागतो व त्यात स्वतःसंबंधी सर्व माहिती द्यावी लागते. या अर्जांची काटेकोर छाननी निवडणूक आयोग करते व पात्र उमेदवारांना निवडणूक लढवण्यास परवानगी देते.



**असे का करावे लागते ?**

- उमेदवारांना फक्त वयाची अट असताना त्यांनी इतर माहिती निवडणूक आयोगाला देणे का महत्त्वाचे आहे ?
- उमेदवारांना त्यांच्याकडील मालमत्तेची माहिती निवडणूक आयोगाला का द्यावी लागते ?

**(४) राजकीय पक्षांना मान्यता देणे :** आपल्या देशात बहुपक्षपद्धती आहे. तसेच नवनवे पक्ष निर्माण होतात. पक्षांमध्ये फूट पडून नवे पक्ष अस्तित्वात येतात. अशा सर्व पक्षांना निवडणूक आयोगाची मान्यता आवश्यक असते. एखाद्या पक्षाची मान्यता रद्द करण्याचा अधिकारही निवडणूक आयोगाला असतो. निवडणूक आयोग राजकीय पक्षांना निवडणूक चिन्ह देते.

**(५) निवडणुकीसंबंधी वाद सोडवणे :** निवडणुकीसंबंधी काही वाद निर्माण झाल्यास ते सोडवण्याची जबाबदारी निवडणूक आयोगावर असते. त्यानुसार एखाद्या मतदारसंघात पुन्हा निवडणुका घेणे अथवा उमेदवाराची अपात्रता घोषित करणे ही कामे निवडणूक आयोगाची आहेत.

**तुम्ही सांगू शकाल ?**

राजकीय पक्षांना मान्यता देताना निवडणूक आयोग कोणते निकष लावते ?



**असे का ?**

- अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींसाठी काही मतदारसंघ राखून ठेवले जातात.
- सर्वच राजकीय पक्षांना निवडणूक चिन्हे असतात.
- मतदानाच्या वेळी आणि मतमोजणी करताना राजकीय पक्षांचे अधिकृत प्रतिनिधी हजर असतात.
- दूरदर्शन, आकाशवाणी या प्रसार माध्यमांवर आपली बाजू मांडण्याची सर्व मान्यताप्राप्त पक्षांना समान संधी असते.

**मतदारसंघाची पुनर्रचना :** लोकसभेतील एकूण सदस्यसंख्या ५४३ आहे. हे सभासद कसे निवडून येतात ? प्रत्येक सभासद एका मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करतो. म्हणजेच लोकसभेचे ५४३ मतदार संघ आहेत. हे मतदारसंघ निर्माण करण्याचे काम निवडणूक आयोगाच्या परिसीमन समितीचे (Delimitation Commission) असते. कोणत्याही दबावाखाली न येता ही यंत्रणा तटस्थपणे मतदारसंघाची पुनर्रचना करते.

**तुम्ही काय कराल ?**

मतदान करणे हे आपले कर्तव्य आहे आणि जबाबदारीही !




**खालीलपैकी कोणत्या दोन बाबी आचारसंहितेचा भंग करणाऱ्या आहेत असे तुम्हांला वाटते ?**

* उमेदवाराकडून वसाहतीत घरगुती वापराच्या वस्तूंचे वाटप.
* निवडून दिल्यास पाणीप्रश्न सोडवण्याचे आश्वासन.
* घरोघरी जाऊन मतदारांना भेटणे व निवडून देण्याची विनंती करणे.
* जातीचे वा धर्माचे आवाहन करून पाठिंबा मिळवणे.

मतदारांसाठीच्या आचारसंहितेत तुम्ही कोणत्या नियमांचा समावेश कराल ?



**लक्षात ठेवा.**

हिमाचल प्रदेश या राज्यातील श्याम शरण नेगी भारताचे पहिले मतदार ठरले. २५ ऑक्टोबर १९५१ रोजी घेण्यात आलेल्या लोकसभा निवडणुकीत त्यांनी आपला मतदानाचा हक्क बजावला.

## निवडणूक प्रक्रिया

मतदारसंघाची निर्मिती
↓
मतदार याद्या निश्चिती
↓
उमेदवारांकडून नामांकन पत्र व छाननी
↓
निवडणूक प्रचार
↓
प्रत्यक्ष मतदान
↓
मतमोजणी
↓
निवडणुकांचे निकाल
↓
निवडणुकीसंबंधीच्या वादांचे निराकरण

### आचारसंहिता म्हणजे काय ?

भारतातील निवडणुका जास्तीत जास्त खुल्या व न्याय्य वातावरणात होण्यासाठी निवडणूक आयोगाने स्वतंत्रपणे ज्या उपाययोजना राबवल्या आहेत, त्यांत आचारसंहितेचा (code of conduct) समावेश करता येईल. गेल्या काही दशकांपासून निवडणूक आयोगाने आपले सर्व अधिकार वापरून निवडणुकीतील गैरप्रकारांना आळा घालण्याचा प्रयत्न केला आहे. निवडणुकीपूर्वी काही काळ व निवडणुकीच्या दरम्यान सरकार, राजकीय पक्ष व मतदारांनी निवडणुकीसंबंधी कोणत्या नियमांचे पालन करावे ते आचारसंहितेत स्पष्ट केलेले असते. या नियमांचा शासनालाही भंग करता येत नाही. गेल्या काही निवडणुकांमध्ये आचारसंहितेच्या संदर्भातील कारवायांमुळे सामान्य मतदार आश्वस्त झाल्याचे दिसते.

**मुक्त व न्याय्य निवडणुका घेण्यासमोरील आव्हाने :** आपल्या देशाचा विस्तार व मतदारसंख्या लक्षात घेता निवडणुका घेणे हे अतिशय आव्हानात्मक काम आहे. निवडणूक आयोगाला कायद्याच्या चौकटीत राहून या आव्हानांचा सामना करावा लागतो. काही आव्हानांचा येथे उल्लेख केला आहे. उदा.,

- निवडणुकांमध्ये आर्थिक गैरव्यवहार मोठ्या प्रमाणावर होत आहे. तो रोखण्यासाठी निवडणूक आयोगाला अनेक उपाययोजना कराव्या लागतात.
- काही उमेदवारांची गुन्हेगारी पार्श्वभूमी असूनही राजकीय पक्ष त्यांना तिकीट देतात व ते निवडूनही येतात. यामुळे राजकारणाचे गुन्हेगारीकरण तर होतेच; पण त्याचबरोबर निवडणूक आयोगाला मुक्त वातावरण राखण्यात अडचणी येतात.
- निवडणुकांमध्ये होणारी हिंसा हेही एक मोठे आव्हान आहे. निवडणुकीदरम्यान होणाऱ्या हिंसेचे प्रमाण वाढत आहे. हिंसा रोखण्यासाठी सर्वच राजकीय पक्षांनी पुढाकार घेऊन निवडणूक आयोगाला मदत केली पाहिजे.



**माहीत आहे का तुम्हांला ?**

पहिल्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी मतदार याद्या तयार करण्याचे काम आव्हानात्मक होते. आपल्या देशात निरक्षरतेचे प्रमाण अधिक होते व त्यामुळे मतदान करण्याची विशेष पद्धत वापरली गेली. मतदानासाठी स्टीलच्या जवळजवळ वीस लाख मतपेट्या तयार केल्या गेल्या आणि त्या मतपेट्यांवर पक्षांची निवडणूक चिन्हे चिकटवली गेली. ज्या पक्षाला मतदान करायचे त्या पक्षाचे निवडणूक चिन्ह असलेल्या पेटीत मतदारांनी कोऱ्या कागदाची घडी करून टाकायची अशी पद्धत ठरवण्यात आली. त्यामुळे निरक्षर लोकांना मतदान करता आले.

- राजकारणावर आपल्याच कुटुंबाचा प्रभाव राहील यासाठी नातेवाइकांनाच निवडणूक उमेदवारी देण्याचा प्रयत्न केला जातो. त्यामुळे प्रातिनिधिक संस्थांमध्ये कौटुंबिक मक्तेदारी निर्माण होऊ शकते.

**विचार करा.**

- घराणेशाहीमुळे राजकीय पक्षांचे कोणते नुकसान होत असेल ?
- 'एक मत, एक मूल्य' यातून तुम्हांला काय समजते ?

**निवडणूक सुधारणा :** निवडणुका ही एक सातत्याने चालणारी प्रक्रिया आहे. निवडणुकांवर लोकशाहीचे भवितव्य अवलंबून असते. योग्य सुधारणा केल्यास निवडणूक प्रक्रियेची विश्वासार्हता वाढते. इथे काही निवडणूक सुधारणा सुचवल्या आहेत. त्याचे कोणते परिणाम होतील असे तुम्हांला वाटते ?

- स्त्रियांचे राजकारणातील प्रतिनिधित्व वाढवण्यासाठी राजकीय पक्षांनी उमेदवारी देतानाच ५०% महिला उमेदवारांना द्यावी व त्यांना निवडून आणण्याचा प्रयत्न करावा.
- गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींना राजकीय पक्षांनी उमेदवारी देऊ नये. या संदर्भात न्यायालयांनी दिलेल्या निर्णयाचे काटेकोर पालन करावे.
- निवडणुकांचा खर्च सरकारने करावा. त्यामुळे राजकीय पक्ष आर्थिक गैरव्यवहार करणार नाहीत व निवडणुकीतील पैशांचा गैरवापर थांबवता येईल.
- लोकप्रतिनिधित्वाच्या कायद्यातही त्या दृष्टीने बदल करून गुन्हेगारी पार्श्वभूमीचे उमेदवार निवडणुकीत सामील होणार नाहीत याची काळजी घ्यावी.

## मतपेटी ते इव्हीएम मशीनपर्यंतचा प्रवास





स्वतंत्र भारतातील पहिली निवडणूक १९५१-५२ मध्ये पार पडली. निवडणुकीच्या राजकारणाला व त्यातून लोकशाही व्यवस्थेला आकार देण्यास या काळात सुरुवात झाली. सुरुवातीच्या अनेक निवडणुकांमध्ये मतपेट्यांचा वापर केला जात असे. १९९० च्या दशकापासून मात्र इलेक्ट्रॉनिक वोटिंग मशीन (EVM Machine) वापरण्यात येऊ लागले. मतदान करताना यंत्राचा वापर सुरू झाल्याने अनेक बाबी साध्य करता आल्या. इव्हीएम मशीनवर दर्शवलेल्या उमेदवारांपैकी कोणालाही मत द्यायचे नसेल तर वरीलपैकी कोणी नाही (None Of The Above-NOTA) हा पर्याय देता येणे मतदारांना शक्य झाले. दिव्यांग व्यक्तींनाही मतदान करणे सोपे जाऊ लागले. पर्यावरणाच्या रक्षणाला मदत झाली. विशेषतः वृक्षतोडीला प्रतिबंध झाला. तसेच निवडणुकांचे निकाल लवकर लागू लागले.

**हेही जाणून घ्या.**

**सार्वत्रिक निवडणुका** – दर पाच वर्षांनी होणाऱ्या लोकसभेच्या निवडणुकांना सार्वत्रिक निवडणुका असे म्हणतात.

**मध्यावधी निवडणुका** – निवडून आलेले सरकार मुदत पूर्ण होण्याआधीच अल्पमतात आले किंवा आघाडीचे शासन असल्यास अथवा घटक पक्षांनी पाठिंबा काढून घेतल्यास सरकारचे बहुमत संपुष्टात येते. पर्यायी सरकार स्थापन करण्याची शक्यता नसेल तर अशा वेळेस मुदत पूर्ण होण्याआधीच निवडणुका घ्याव्या लागतात. त्या मध्यावधी निवडणुका म्हणून ओळखल्या जातात.

**पोटनिवडणुका** – विधानसभा, लोकसभा आणि स्थानिक शासनसंस्थांमधील एखाद्या लोकप्रतिनिधीने राजीनामा दिल्यास अथवा एखाद्या लोकप्रतिनिधीचा मृत्यू झाल्यास ती जागा रिकामी होते. त्या जागेसाठी पुन्हा निवडणूक घेतली जाते, त्यास पोटनिवडणूक असे म्हणतात.



**माहीत आहे का तुम्हांला?**

८ ऑक्टोबर २०१० रोजी निवडणूक आयोगाने तज्ज्ञांचा समावेश असलेल्या एका समितीची स्थापना केली. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांमध्ये मतदाराची पडताळणी पावती VVPAT (Voter Verified Paper Audit Trail) ही सुविधा समाविष्ट करण्याचे ठरले व त्यास सर्व राजकीय पक्षांनी पाठिंबा दिला. मतदारांना त्यांनी दिलेले मत योग्य प्रकारे नोंदवले गेले आहे की नाही हे तपासण्याची सुविधा उपलब्ध झाली. निवडणुकीतील गैरव्यवहार रोखण्यासाठी हे महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले.

या पाठात आपण निवडणूक प्रक्रियेचा अनेक बाजूंनी विचार केला. पुढील पाठात आपण भारतातील राजकीय पक्षांचा अभ्यास करणार आहोत.



## स्वाध्याय

**१. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

(१) निवडणूक आयुक्तांची नेमणूक ........... करतात.
(अ) राष्ट्रपती (ब) प्रधानमंत्री
(क) लोकसभा सभापती (ड) उपराष्ट्रपती

(२) स्वतंत्र भारतातील पहिले मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून ........... यांची नेमणूक झाली.
(अ) डॉ.राजेंद्रप्रसाद (ब) टी.एन.शेषन
(क) सुकुमार सेन (ड) नीला सत्यनारायण

(३) मतदारसंघ निर्माण करण्याचे काम निवडणूक आयोगाची ....... समिती करते.
(अ) निवड (ब) परिसीमन
(क) मतदान (ड) वेळापत्रक


**२. पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा.**

(१) निवडणूक आयोग निवडणुकीदरम्यान आचारसंहिता लागू करते.
(२) विशिष्ट प्रसंगी निवडणूक आयोग एखाद्या मतदार संघात पुन्हा निवडणुका घेतात.
(३) एखाद्या घटकराज्यात केव्हा व किती टप्प्यात निवडणुका घ्यायच्या हे राज्यसरकार ठरवते.

**३. टीपा लिहा.**

(१) मतदारसंघाची पुनर्रचना
(२) मतपेटी ते इव्हीएम मशीनपर्यंतचा प्रवास

### ४. पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा.




### ५. थोडक्यात उत्तरे लिहा.

(१) निवडणूक आयोगाची कार्ये स्पष्ट करा.

(२) निवडणूक आयुक्त पदाविषयी अधिक माहिती लिहा.

(३) निवडणूक आचारसंहिता म्हणजे काय हे स्पष्ट करा.

**उपक्रम**

अभिरूप मतदान प्रक्रिया (mock poll) शाळेत आयोजित करून मतदान प्रक्रिया समजून घ्या.

# ३. राजकीय पक्ष

मागील पाठात आपण संविधानाची वाटचाल आणि निवडणूक प्रक्रियेचे स्वरूप समजून घेतले. सामान्य जनता, लोकशाही, प्रतिनिधित्व आणि निवडणुका या सर्वांना जोडणारा सर्वांत महत्त्वाचा दुवा राजकीय पक्ष असतो. आपण राजकारणाविषयी जे ऐकतो अथवा वाचतो ते बरेचसे पक्षांशी संबंधित असते. राजकीय पक्षांचे अस्तित्व सर्व लोकशाही व्यवस्थांमध्ये असते. किंबहुना लोकशाहीमुळे राजकीय पक्ष सत्तेसाठी स्पर्धा करतात. प्रस्तुत पाठात आपण भारतातल्या राजकीय पक्षपद्धतीची ओळख करून घेणार आहोत.

तुमच्या शाळेत आणि परिसरात तुम्ही अनेक गट, संस्था अथवा संघटना कोणत्यातरी कामाचा पाठपुरावा करताना पाहिल्या असतील. सार्वजनिक प्रश्न सोडवण्यासाठी एखादी संघटनाही पुढाकार घेते. विविध चळवळींच्या आंदोलनाविषयीही तुम्ही वाचता. याचा अर्थ असा की समाजात ज्याप्रकारे गट, संस्था, चळवळी सक्रिय असतात त्याचप्रकारे राजकीय पक्षही निवडणुका लढवण्यात पुढाकार घेताना दिसतात. समाजातील अन्य संस्था, संघटना व राजकीय पक्ष यांच्यात फरक आहे. राजकीय पक्ष हेसुद्धा सामाजिक संघटनाच असतात, परंतु त्यांची उद्दिष्टे व कार्यपद्धती मात्र वेगळी असते. या पार्श्वभूमीवर आपल्याला असे म्हणता येईल, की राजकीय सत्ता प्राप्त करण्यासाठी जेव्हा लोक एकत्र येऊन निवडणूक प्रक्रियेत सहभागी होतात तेव्हा त्या संघटनांना 'राजकीय पक्ष' म्हटले जाते. राजकीय पक्ष म्हणजे निवडणूक लढवून ती जिंकण्यासाठी व त्यानंतर सत्ता मिळवून आपल्या पक्षाचे शासन स्थापन करणाऱ्या लोकांचा गट होय.

राजकीय पक्षांची काही ठळक वैशिष्ट्ये आपल्याला पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**सत्ता मिळवणे :** राजकीय पक्षांचा हेतू केवळ निवडणुकांच्या माध्यमातून सत्ता मिळवणे हाच असतो. त्यामुळे सत्तेसाठी विविध राजकीय पक्ष परस्परांशी सतत स्पर्धा करत असतात. अशी स्पर्धा करण्यात अयोग्य काहीच नाही. परंतु स्पर्धेचे स्वरूप निकोप असावे.

**विचारसरणीचा आधार :** प्रत्येक राजकीय पक्ष काही धोरणांचा, विचारांचा पुरस्कार करणारा असतो. सार्वजनिक प्रश्नांबाबत पक्षांची एक विशिष्ट भूमिका असते. या सर्वांच्या समावेशातून पक्षाची विचारसरणी तयार होते. ही विचारसरणी ज्यांना योग्य वाटते ते लोक त्या त्या पक्षाला पाठिंबा देतात. पक्षाला लोकांचा जो पाठिंबा मिळतो, त्याला त्या 'पक्षाचा जनाधार' असेही म्हटले जाते. आधुनिक काळात सर्वच राजकीय पक्षांची विचारसरणी सारखीच दिसते. त्यामुळे पक्षांमध्ये विचारसरणीवर आधारित फरक करणे अवघड झाले आहे.

**पक्ष कार्यक्रम :** विचारसरणी प्रत्यक्षात आणण्यासाठी राजकीय पक्ष त्यावर आधारित कार्यक्रम निश्चित करतात. सत्ता मिळाली की या कार्यक्रमांची अंमलबजावणी केली जाते. सत्ता नाही मिळाली तरी कार्यक्रमांच्या आधारे लोकांचा पाठिंबा मिळवण्याचा प्रयत्न राजकीय पक्ष करतात.

**सरकार स्थापन करणे :** राजकीय पक्ष सरकार स्थापन करतात आणि देशाचा राज्यकारभार करतात. अर्थात हे कार्य निवडणुकीत बहुमत मिळवणाऱ्या पक्षाचे असते. ज्या पक्षांना बहुमत मिळत नाही ते विरोधी पक्ष म्हणून कार्य करतात.

**शासन व जनता यांच्यातील दुवा :** राजकीय पक्ष शासन आणि जनता यांच्यातील दुवा म्हणून काम करतात. जनतेच्या मागण्या आणि गाऱ्हाणी शासनापर्यंत पोहचवण्याचे कार्य राजकीय पक्ष करतात, तर शासन पक्षांमार्फत आपल्या धोरण-कार्यक्रमांना पाठिंबा मिळवण्याचा प्रयत्न करते.

**वर्तमानपत्रांतील या बातम्यांतून तुम्हांला काय समजले ते थोडक्यात सांगा.**

- सत्ताधारी पक्षाच्या विरोधात सर्व विरोधी पक्षांची मुंबईत बैठक झाली. शेतकऱ्यांचे प्रश्न हाती घेणार !
- सत्ताधारी पक्षाने ग्रामीण भागात संवाद यात्रांचे आयोजन केले.

समजा, तुम्ही विरोधी पक्षनेते आहात आणि आरोग्य क्षेत्रात सरकारने चांगली कामगिरी केली नाही, हे तुमच्या पक्षाच्या नजरेत आले आहे. विरोधी पक्षनेता म्हणून तुम्ही काय कराल ?

**विचार करा व लिहा.**

महात्मा गांधी, विनोबा भावे आणि जयप्रकाश नारायण यांनी 'पक्षविरहित' लोकशाहीची कल्पना मांडली. आधुनिक काळात अशी लोकशाही आणायची असेल तर काय करावे लागेल ?

## भारतातील पक्षपद्धतीचे बदलते स्वरूप

(१) स्वातंत्र्योत्तर काळात काँग्रेस हा एक प्रबळ पक्ष होता. काही अपवाद वगळता केंद्र व राज्य पातळीवर या पक्षाला बहुमत होते. भारतातील राजकारणावर या पक्षाची पकड होती. म्हणून या काळातील पक्षपद्धतीचे वर्णन 'एक प्रबळ पक्ष पद्धती' असे केले जाते.

(२) एक प्रबळ पक्ष पद्धतीला १९७७ मध्ये आव्हान दिले गेले. हे आव्हान काँग्रेसेतर पक्षांनी एकत्र येऊन दिले.

(३) १९८९ च्या लोकसभा निवडणुकांनंतर राजकारणात एकाच पक्षाचे वर्चस्व असणे ही बाब संपुष्टात आली. त्यानंतरच्या काळात अनेक पक्षांनी एकत्र येऊन आघाडीचे शासन स्थापन करण्यास सुरुवात केली. आघाडी सरकार स्थापन करण्याचे प्रयोग भारतीय जनता पक्ष व काँग्रेस या दोन्ही पक्षांनी केले. आघाडी शासनातून अस्थिरता निर्माण होते हा समज आपल्या देशातील पक्ष पद्धतीने खोटा ठरवला. आघाडीचे शासन ही बाब आता भारताच्या राजकीय व्यवस्थेत स्थिरावली आहे.



**माहीत आहे का तुम्हांला ?**

- एकाच राजकीय पक्षाच्या हाती सत्ता दीर्घकाळ असल्यास व अन्य कोणतेच पक्ष राजकारणात प्रभावी नसल्यास त्या पक्षपद्धतीला 'एकपक्ष पद्धती' असे म्हणतात.
- राजकारणात दोन राजकीय पक्ष प्रभावी असतात आणि आलटून पालटून या दोन राजकीय पक्षांच्या हाती सत्ता जाते तेव्हा ती शासनपद्धती 'द्विपक्ष पद्धती' होय.
- अनेक राजकीय पक्ष सत्तेच्या स्पर्धेत असतात आणि सर्वांचा कमी-अधिक प्रमाणात राजकीय प्रभाव असतो. अशी पद्धती 'बहुपक्ष पद्धती' म्हणून ओळखली जाते.



**करून पहा.**

राजकीय पक्षांच्या प्रमुख दोन आघाड्या इथे दिल्या आहेत. त्यांतील घटकपक्ष शोधा व त्यांची नावे लिहा.

(१) राष्ट्रीय लोकशाही आघाडी (NDA)

(२) संयुक्त पुरोगामी आघाडी (UPA)

**हेही जाणून घ्या.**

राष्ट्रीय पक्ष आणि प्रादेशिक पक्ष कोणाला म्हणतात ?

**राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता मिळण्यासाठी निवडणूक आयोगाने स्पष्ट केलेल्या पुढील निकषांची पूर्तता व्हावी लागते.**

(अ) चार किंवा अधिक राज्यांमध्ये लोकसभा किंवा विधानसभेच्या मागील निवडणुकीत किमान ६% वैध मते मिळवणे आवश्यक असते. तसेच मागील निवडणुकीत कोणत्याही राज्यातून अथवा राज्यांमधून किमान चार सदस्य लोकसभेवर निवडून आले पाहिजेत.

किंवा

(ब) एकूण लोकसभा मतदारसंघाच्या किमान २% मतदारसंघांमधून तसेच किमान तीन राज्यांमधून उमेदवार निवडून येणे आवश्यक असते.

**प्रादेशिक किंवा राज्यपातळीवरील पक्ष म्हणून मान्यता मिळवण्यासाठी निवडणूक आयोगाने पुढील निकष स्पष्ट केले आहेत.**

(अ) लोकसभा किंवा विधानसभेच्या मागील निवडणुकीत किमान ६% मते मिळवणे आणि किमान दोन सदस्य विधानसभेवर निवडून येणे आवश्यक असते.

किंवा

(ब) विधानसभेच्या एकूण सदस्यसंख्येच्या किमान ३% जागा किंवा किमान ३ जागा प्राप्त करणे आवश्यक आहे.

भारतातील काही प्रमुख राजकीय पक्षांची आपण ओळख करून घेऊ.

## राष्ट्रीय पक्ष

(संदर्भ : Election Commission of India, Notification No. 56/201/PPS-111, dated 13 December 2016)

**(१) भारतीय राष्ट्रीय काँग्रेस :** १८८५ साली भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाली. स्थापनेच्या वेळी काँग्रेस ही सर्वसमावेशक स्वरूपाची राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी प्रयत्न करणारी चळवळ होती. त्यामुळे त्यात विविध विचारसरणीचे गट एकत्र आले होते. स्वातंत्र्योत्तर काळात काँग्रेस एक सर्वांत प्रभावी पक्ष म्हणून आकारास आला. धर्मनिरपेक्षता, सर्वांगीण विकास, दुर्बल घटकांसाठी आणि अल्पसंख्याक वर्गासाठी 'समान हक्क, व्यापक समाजकल्याण' हे या पक्षाचे सुरुवातीपासूनचे धोरण आहे. त्यानुसार या पक्षाने अनेक कार्यक्रमही राबवले. लोकशाही समाजवाद, आंतरराष्ट्रीय शांतता व सामाजिक समता यांवर या पक्षाचा विश्वास आहे.

**(२) भारतीय कम्युनिस्ट पक्ष :** मार्क्सवादी विचारसरणीवर आधारलेल्या या पक्षाची स्थापना १९२५ साली झाली. भारतातला हा एक जुना पक्ष आहे. मजूर, कष्टकरी वर्ग व कामगारांच्या हितासाठी हा पक्ष कार्य करतो. या पक्षाचा भांडवलशाहीला विरोध आहे.

१९६२ च्या सुमारास चीन व सोव्हिएट युनियन या दोन्ही साम्यवादी देशांपैकी कोणाचे नेतृत्व स्वीकारायचे, यावरून या पक्षातील नेत्यांमध्ये वैचारिक मतभिन्नता निर्माण झाली व भारतीय कम्युनिस्ट पक्षात फूट पडली व त्यातून भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) हा पक्ष स्थापन झाला.

**(३) भारतीय जनता पक्ष :** भारतीय जनता पक्ष हा राष्ट्रीय स्तरावरील एक महत्त्वाचा पक्ष आहे.

भारतीय जनसंघ हा पक्ष १९५१ मध्ये स्थापन झाला. १९७७ मध्ये स्थापन झालेल्या जनता पक्षात भारतीय जनसंघ विलीन झाला, परंतु जनता पक्षाचे हे स्वरूप फार काळ टिकले नाही. पक्ष फुटला व त्यातील भारतीय जनसंघाने भारतीय जनता पक्ष या नावाने १९८० मध्ये नवा पक्ष स्थापन केला. प्राचीन भारतीय संस्कृती, परंपरा यांचे जतन केले पाहिजे अशी या पक्षाची भूमिका आहे. आर्थिक सुधारणांवर या पक्षाचा भर आहे.

**(४) भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) :** समाजवाद, धर्मनिरपेक्षता आणि लोकशाही यांचा हा पक्ष पुरस्कार करतो. साम्राज्यवादास या पक्षाचा विरोध आहे. कामगार, शेतकरी, शेतमजूर यांच्या हितसंबंधांची जपणूक करणे हे या पक्षाचे धोरण आहे.

**(५) बहुजन समाज पक्ष :** बहुजन समाज पक्ष हा समाजवादी विचारसरणीचा पक्ष आहे. बहुजनांचे हित हे या पक्षाचे उद्दिष्ट असून १९८४ साली या पक्षाची स्थापना झाली. दलित, आदिवासी, इतर मागासवर्गीय आणि अल्पसंख्य यांचा समावेश 'बहुजन' या शब्दात होतो. बहुजन समाजाला सत्ता मिळवून देणे हे या पक्षाचे उद्दिष्ट आहे.

**(६) राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष :** काँग्रेसमधून बाहेर पडून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना १९९९ मध्ये झाली. लोकशाही, समता, धर्मनिरपेक्षता या मूल्यांवर पक्षाचा विश्वास आहे. काँग्रेस पक्षाबरोबर युती करून हा पक्ष १९९९ ते २०१४ पर्यंत महाराष्ट्रात सत्तेवर होता. तसेच केंद्रामध्येही २००४ ते २०१४ इतक्या प्रदीर्घ काळात हा पक्ष काँग्रेसच्या नेतृत्वाखालील आघाडीचा एक घटकपक्ष होता.

**(७) तृणमूल काँग्रेस :** ऑल इंडिया तृणमूल काँग्रेस या पक्षाची स्थापना १९९८ मध्ये झाली. २०१६ मध्ये निवडणूक आयोगाने या पक्षाला राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता दिली. लोकशाही, धर्मनिरपेक्षता आणि दुर्बल घटकांचे संरक्षण हे या पक्षाचे धोरण आहे.

**लोकसभा निवडणूक २००९ व २०१४ मधील राष्ट्रीय पक्षांनी मिळवलेल्या जागा**

| राजकीय पक्षाचे नाव | मिळालेल्या जागा | |
|---|---|---|
| | २००९ | २०१४ |
| भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | २०६ | ४४ |
| भारतीय कम्युनिस्ट पक्ष | ४ | १ |
| भारतीय जनता पक्ष | ११६ | २८२ |
| भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) | १६ | ९ |
| बहुजन समाज पक्ष | २१ | – |
| राष्ट्रवादी काँग्रेस | ९ | ६ |




वर्तमानपत्रात तुम्ही अशा प्रकारच्या बातम्या वाचल्या असतील. यातून अर्थातच आपल्याला भारतीय संघराज्यातील विविध राज्यांमध्ये असणाऱ्या पक्षांबाबत माहिती समजते.

- हे पक्ष केवळ राज्यापुरतेच मर्यादित का आहेत ?
- राज्यातील काही नेते राष्ट्रीय पातळीवर दिसतात तर काही राज्यापुरतेच प्रभावी असतात. असे का ?

तुम्हांला पडलेल्या अशा प्रश्नांच्या आधारे आपण भारतातल्या काही प्रादेशिक पक्षांची थोडक्यात ओळख करून घेऊ. भारताच्या चारही दिशांच्या राज्यांमध्ये काही प्रातिनिधिक पक्षांचा आपण येथे विचार करणार आहोत.

भारताच्या विविध प्रदेशांत विविध भाषा बोलणारे आणि परंपरा, संस्कृती यांच्यातही विविधता असणारे लोक आहेत. प्रदेश आणि त्यांची एक स्वतंत्र भाषा असे चित्र आपल्याला दिसते. प्रदेशांच्या भौगोलिक रूपातही विविधता आहे. महाराष्ट्रातील विविध भौगोलिक प्रदेशांचा तुम्ही अभ्यास केला आहे. महाराष्ट्र जसा मध्यप्रदेश किंवा कर्नाटक यांच्यापेक्षा वेगळा आहे त्याचप्रमाणे महाराष्ट्रातही भौगोलिक, सांस्कृतिक विविधता दिसते.

आपली भाषा आणि आपला प्रदेश यांच्याविषयीची आत्मीयतेची भावना निर्माण होऊन काही काळानंतर तिच्याबाबत अस्मिता निर्माण होऊ लागली की त्यातून 'प्रादेशिकता' निर्माण होते. लोक आपल्या प्रदेशाच्या हिताचा व विकासाचा प्राधान्याने विचार करू लागतात. आपली भाषा, आपले साहित्य, परंपरा, सामाजिक सुधारणांचा इतिहास, शैक्षणिक व सांस्कृतिक चळवळी इत्यादींबाबत अभिमान वाटू लागतो व त्यातून भाषिक अस्मिता प्रबळ होऊ लागते. आपल्या प्रदेशाचा विकास व्हावा, तेथील साधनसामग्री व रोजगाराच्या संधीवर आपला हक्क असावा या भावनेतून प्रादेशिक अस्मिता आकारास येऊ लागते.

अशा प्रकारच्या भाषिक, प्रादेशिक, सांस्कृतिक व त्यांच्याशी संलग्न अस्मिता संघटित झाल्या की त्यातून प्रादेशिकतेची भावना बळावते. त्यातून काही वेळेस स्वतंत्र राजकीय पक्ष अस्तित्वात येतात, तर काही वेळेस विविध दबाव गट, चळवळी निर्माण होतात. या सर्वांचा हेतू एकच असतो व तो म्हणजे आपल्या प्रदेशाच्या हितसंबंधांचे जतन करणे.

## प्रादेशिक पक्ष

विशिष्ट प्रदेशाच्या वेगळेपणाचा अभिमान बाळगणारे आणि त्याचा विकास व्हावा म्हणून सत्तेच्या स्पर्धेत उतरणाऱ्या राजकीय गटांना 'प्रादेशिक पक्ष' म्हणतात. त्यांचा प्रभाव त्या-त्या प्रदेशापुरता मर्यादित असतो. तरीही आपल्या प्रदेशात प्रभावी भूमिका घेऊन ते राष्ट्रीय राजकारणावर आपली छाप पाडतात. प्रादेशिक पक्ष प्रादेशिक समस्यांना प्राधान्य

देतात. आपल्या प्रदेशाचा विकास करण्यासाठी त्यांना केवळ अधिकारांऐवजी स्वायत्तता आवश्यक वाटते. संघशासनाला सहकार्य करत आपले स्वायत्ततेचे क्षेत्र अबाधित ठेवण्याचा प्रादेशिक पक्ष प्रयत्न करतात.

तसेच प्रादेशिक समस्या प्रादेशिक पातळीवरच हाताळाव्यात. सत्ता ही त्या प्रदेशातील व्यक्तींच्याच हाती असावी. प्रशासनात आणि व्यवसायांमध्ये त्या प्रदेशाच्या रहिवाशांना अग्रक्रम दिला जावा, असा आग्रह प्रादेशिक पक्षांचा असतो.

**भारतातील प्रादेशिक पक्षांचे बदलते स्वरूप :** स्वातंत्र्योत्तर काळापासून भारतात प्रादेशिक पक्ष अस्तित्वात आहे, परंतु त्यांच्या स्वरूपात आणि भूमिकेत मात्र महत्त्वाचे बदल झाल्याचे दिसते.

(१) सुरुवातीच्या काळात प्रादेशिक अस्मितांमधून काही फुटीर चळवळी निर्माण झाल्या. स्वतंत्र खलिस्तान, द्रविडस्थान अशा मागण्यांचा हेतू संघराज्यातून बाहेर पडून स्वतंत्र देश निर्माण करण्याचा होता. पंजाब, तमिळनाडू, जम्मू आणि काश्मीर या राज्यातील प्रादेशिक पक्षांची उदाहरणे या संदर्भात देता येतील.

(२) प्रादेशिक पक्षांच्या भूमिका हळूहळू बदलू लागल्या. स्वतंत्र राज्याच्या मागणीऐवजी त्यांना अधिक स्वायत्तता मिळावी म्हणून प्रयत्न सुरू केले. हा प्रादेशिक पक्षांच्या विकासातील दुसरा टप्पा होय. या टप्प्याची सुरुवात साधारणतः १९९० नंतर झाली.

(३) आपल्या प्रदेशाच्या विकासासाठी आपल्या प्रदेशातील रहिवाशांना राज्यात आणि केंद्रात सत्ता मिळावी, अशी भूमिका प्रादेशिक पक्ष आता घेऊ लागले. उदा., शिवसेना, तेलुगु देसम.

(४) ईशान्य भारतातील प्रादेशिक पक्षांच्या विकासाचा एक वेगळा कल दिसतो. या प्रदेशांमधील राजकीय पक्षांनी फुटीरतेच्या मागण्या सोडून दिल्या व त्यांनी स्वायत्ततेची मागणी करण्यास सुरुवात केली. ईशान्य भारतातील सर्व प्रादेशिक पक्ष टप्प्याटप्प्याने मुख्य राष्ट्रीय प्रवाहात येत आहेत.

थोडक्यात सांगायचे झाल्यास भारतातील प्रादेशिक पक्षांचा प्रवास फुटीरता, स्वायत्तता आणि मुख्य राष्ट्रीय प्रवाहात सामील होणे अशा टप्प्यांमधून झाला आहे. तसेच राष्ट्रीय राजकारणातही त्यांचा प्रभाव वाढला असून आघाडीचे शासन हा त्याचा एक परिणाम आहे.

भारतात अनेक प्रादेशिक पक्ष आहेत. सर्व पक्षांची माहिती येथे घेणे शक्य नाही. म्हणूनच आपण भारताच्या पूर्व, पश्चिम, दक्षिण आणि उत्तर अशा क्षेत्रांमधील काही प्रातिनिधिक पक्षांची ओळख करून घेणार आहोत.

## काही प्रमुख प्रादेशिक पक्ष पुढीलप्रमाणे

**(१)**

**शिवसेना**

- महाराष्ट्रातील प्रमुख राजकीय पक्ष. १९६६ मध्ये स्थापना.
- मराठी माणसांच्या हक्कांची जपणूक, मराठी भाषेचे संवर्धन, परप्रांतीयांना विरोध.
- १९९५ मध्ये भारतीय जनता पक्षाशी युती करून शिवसेना हा पक्ष सर्वप्रथम महाराष्ट्रात सत्तेवर आला. २०१४ च्या निवडणुकीनंतर महाराष्ट्रात भाजपसोबत सत्तेत सहभागी.

(२)

**शिरोमणी अकाली दल**

- पंजाबमधील महत्त्वाचा प्रादेशिक पक्ष. १९२० मध्ये स्थापना.
- धार्मिक व प्रादेशिक अस्मिता जोपासण्यास प्राधान्य.
- पंजाबमध्ये अनेक वर्षे सत्तेवर.

(३)

**जम्मू आणि काश्मीर नॅशनल कॉन्फरन्स**

- काश्मीरमधील प्रमुख प्रादेशिक पक्ष. १९३२ साली स्थापना.
- काश्मीरी जनतेच्या हितसंबंधांचा पाठपुरावा. स्वायत्तता जोपासण्यासाठी प्रयत्नशील.

(४)

**आसाम गण परिषद**

- सरकारबरोबरील वाटाघाटीतून १९८५ मध्ये आसाम करार. १९८५ साली स्थापना.
- निर्वासितांचे प्रश्न सोडवणे, आसामचे सांस्कृतिक, भाषिक व सामाजिक वेगळेपण जपणे. आर्थिक विकासासाठी प्रयत्न.
- गेली अनेक वर्षे आसाममध्ये सत्ताधारी पक्ष.

(५)

| | |
|---|---|
| **द्रविड मुन्नेत्र कळघम**  | १९२० मधल्या जस्टीस पार्टी या ब्राह्मणेतर चळवळीचे रूपांतर द्रविड मुन्नेत्र कळघम या राजकीय पक्षात झाले. १९४४ मध्ये जस्टीस पार्टी द्रविड कळघम म्हणून ओळखली जाऊ लागली. १९४९ मध्ये यातून एक गट बाहेर पडला व त्या गटाने द्रविड मुन्नेत्र कळघम पक्ष स्थापन केला. त्यातूनही बाहेर पडलेल्या एका गटाने ऑल इंडिया अण्णा द्रविड मुन्नेत्र कळघम या पक्षाची १९७२ मध्ये स्थापना केली. <br> तमिळ अस्मिता जोपासण्याचे प्रयत्न. केंद्राच्या आघाडीतही काही काळ सहभाग. <br> सर्व स्तरांवरील मतदारांचा पक्षाला पाठिंबा. सत्तेत दीर्घकाळ राहिल्याने अनेक उपाययोजना राबवल्या. |

भारतात प्रत्येक राज्यात अनेक प्रादेशिक पक्ष आहेत. त्यांनी त्या त्या राज्याच्या राजकारणावर प्रभाव टाकलेला आहे. त्याचे एक उदाहरण म्हणून महाराष्ट्रातील प्रादेशिक पक्षांची दोन निवडणुकांच्या संदर्भातील कामगिरी खालील तक्त्यात दिली आहे.

**महाराष्ट्रातील प्रादेशिक पक्ष (विधानसभेतील प्रतिनिधित्व)**

| पक्षाचे नाव | जिंकलेल्या जागा | |
|---|---|---|
| | निवडणूक वर्ष २००९ | निवडणूक वर्ष २०१४ |
| शिवसेना | ४४ | ६३ |
| महाराष्ट्र नवनिर्माण सेना | १३ | १ |
| शेतकरी कामगार पक्ष | ४ | ३ |
| भारिप बहुजन महासंघ | १ | १ |
| भारतीय रिपब्लिकन पक्ष | – | – |
| समाजवादी पक्ष | ४ | १ |
| बहुजन विकास आघाडी | २ | ३ |

| पक्षाचे नाव | जिंकलेल्या जागा | |
|---|---|---|
| | निवडणूक वर्ष २००९ | निवडणूक वर्ष २०१४ |
| राष्ट्रीय समाज पक्ष | १ | १ |
| ऑल इंडिया मजलीस-ई-इतेहदुल्ला मुसलमीन | * | २ |
| जनसुराज्य शक्ती | २ | – |
| लोकसंग्राम | १ | – |
| स्वाभिमानी पक्ष | १ | – |

(* हा पक्ष २००९ मध्ये अस्तित्वात नव्हता.)

**सांगा पाहू ?**

भारतातल्या सर्वच राज्यांमध्ये प्रादेशिक पक्ष आहेत. त्या सर्वांची येथे दखल घेता येणार नाही. भारताच्या नकाशाच्या आधारे आणखी काही प्रादेशिक पक्षांविषयी माहिती मिळवा.

या पाठात आपण भारतातील राष्ट्रीय आणि प्रादेशिक पातळीवरील राजकीय पक्षांचा आढावा घेतला. पुढील पाठात राजकीय चळवळींचे आपल्या जीवनातील महत्त्व समजून घेऊ.

## स्वाध्याय

**१. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

(१) राजकीय सत्ता प्राप्त करण्यासाठी जेव्हा लोक एकत्र येऊन निवडणूक प्रक्रियेत सहभागी होतात, तेव्हा त्या संघटनांना ....... म्हटले जाते.

(अ) सरकार (ब) समाज

(क) राजकीय पक्ष (ड) सामाजिक संस्था

(२) नॅशनल कॉन्फरन्स हा पक्ष ...... या राज्यात आहे.

(अ) ओडिशा (ब) आसाम

(क) बिहार (ड) जम्मू आणि काश्मीर

(३) जस्टीस पार्टी या ब्राह्मणेतर चळवळीचे रूपांतर ........... या राजकीय पक्षात झाले.

(अ) आसाम गण परिषद

(ब) शिवसेना

(क) द्रविड मुनेत्र कळघम

(ड) जम्मू आणि काश्मीर नॅशनल कॉन्फरन्स

**२. पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा.**

(१) राजकीय पक्ष शासन व जनता यांच्यातील दुवा म्हणून काम करतात.

(२) राजकीय पक्ष या सामाजिक संघटनाच असतात.

(३) आघाडी शासनातून अस्थिरता निर्माण होते.

(४) 'शिरोमणी अकाली दल' हा राष्ट्रीय पक्ष आहे.

**३. पुढील संकल्पना स्पष्ट करा.**

(१) प्रादेशिकता (२) राष्ट्रीय पक्ष

**४. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) राजकीय पक्षांची ठळक वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

(२) भारतातील पक्षपद्धतीच्या स्वरूपात काय बदल झाला आहे ?

### उपक्रम

(१) तुमच्या आई-बाबांचे नाव ज्या लोकसभा मतदार संघात येते तो मतदारसंघ महाराष्ट्राच्या नकाशा आराखड्यात दाखवा.

(२) भारताच्या नकाशा आराखड्यात प्रमुख राजकीय प्रादेशिक पक्षांचा प्रभाव कोठे-कोठे आहे ती ठिकाणे दाखवा.

2CSPGC

# ४. सामाजिक व राजकीय चळवळी

एका स्थानिक वर्तमानपत्रातील ही बातमी वाचा.

> बालविवाहाविरोधीच्या चळवळीला बरेच यश आले असून बालविवाहाच्या प्रमाणात सुमारे ५०% घट झाली आहे. या चळवळीतील कार्यकर्त्यांनी खूप सजगपणे काम केले.
>
> हुंडाविरोधी चळवळीच्या कार्यकर्त्यांनीही त्यांना मदत केली. याच परिसरात आता कुपोषणाविरोधी मोहीम हाती घेणे आवश्यक आहे. कारण गरिबी आणि कुपोषण या आणखी दखल घेण्याजोग्या समस्या आहेत.

- वर्तमानपत्रातल्या या बातमीत चळवळींचा उल्लेख आहे. त्याचा अर्थ तुम्ही सांगू शकाल का ?
- या बातमीत सुटे सुटे असे एकेक विषय दिसतात. म्हणजे चळवळी एकाच विषयाशी संबंधित असतात का ?
- चळवळींनी परस्परांना सहकार्य केल्यास ती अधिक प्रभावी होईल असे तुम्हांला वाटते का ?

मागील पाठात आपण राष्ट्रीय आणि प्रादेशिक पक्षांविषयी जाणून घेतले. राजकीय पक्ष सत्तेच्या स्पर्धेत असतात व निवडणुका जिंकून ते सामान्य जनतेचे प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करतात. राजकीय पक्षांची भूमिका सर्वसमावेशक स्वरूपाची असते. त्यांना कोणत्यातरी एकाच प्रश्नावर लक्ष केंद्रित करून चालत नाही. सार्वजनिक स्वच्छतेपासून ते अवकाश संशोधनापर्यंतच्या सर्व बाबींचा त्यांना राष्ट्रीय भूमिकेतून विचार करून निर्णय घ्यावा लागतो. समाजातल्या सर्व समाजघटकांच्या समस्यांसाठी राजकीय पक्षांकडे काही कार्यक्रम असावा लागतो. शेतकरी, कामगार, उद्योजक, महिला, युवा वर्ग, ज्येष्ठ व्यक्ती अशा सर्वांचा विचार करून राजकीय पक्ष धोरणे ठरवतात.

## चळवळी का ?

समाजातल्या सर्वच व्यक्तींना राजकीय पक्षात सहभागी होऊन सार्वजनिक हितासाठी काही करणे शक्य असतेच असे नाही. काही लोक एखाद्याच प्रश्नावर लक्ष केंद्रित करून त्या प्रश्नाचा पाठपुरावा करतात. त्याच्या निराकरणासाठी लोकांना संघटित करून शासनावर एखादी कृती करण्यासाठी दबाव आणण्याचा प्रयत्न करतात. सातत्याने कृतिशील राहून त्या समस्येबाबत जनमत तयार करून राजकीय पक्ष व सरकारवर दबाव आणण्याचे काम केले जाते. या सामूहिक कृतींना 'चळवळ' असे म्हणतात. सामूहिक कृती हा चळवळीचा गाभा असतो.

लोकशाहीमध्ये चळवळींना फार महत्त्व असते. चळवळींतून अनेक सार्वजनिक प्रश्न चर्चेत येतात. शासनाला त्या प्रश्नांची दखल घ्यावी लागते. चळवळींतील नेते व कार्यकर्ते शासनाला त्या प्रश्नाच्या संदर्भात आवश्यक ती सर्व माहिती पुरवतात. धोरण आखताना अशा माहितीचा शासनाला उपयोग होतो.

शासनाच्या काही निर्णयांना अथवा धोरणांना विरोध करण्यासाठीही चळवळी उभ्या केल्या जातात. निषेध अथवा प्रतिकार करण्याचा हक्क (Right to protest) हा लोकशाहीतील एक महत्त्वाचा हक्क आहे. परंतु तो अत्यंत संयमाने व जबाबदारीने वापरला पाहिजे.



**सांगा पाहू ?**

> विस्थापितांचे पुनर्वसन योग्य प्रकारे व्हावे, त्यांचे उपजीविकेचे साधन सुरक्षित राहावे म्हणून आपल्या देशातील सक्रिय चळवळी कोणत्या ?

## चळवळ म्हणजे काय ?

- चळवळ ही एक सामूहिक कृती असते. त्यात अनेक लोकांचा सक्रिय सहभाग अपेक्षित असतो.
- चळवळ हे लोकांचे विशिष्ट प्रश्नाभोवती निर्माण झालेले संघटन असते. उदा., प्रदूषण हा एकच प्रश्न घेऊन चळवळ उभी राहू शकते.
- चळवळीसमोर एखादा निश्चित सार्वजनिक हेतू अथवा प्रश्न असतो. उदा., भ्रष्टाचारविरोधी चळवळीचा हेतू भ्रष्टाचार नष्ट करण्याचा असतो.
- चळवळीला नेतृत्व असते. नेतृत्वामुळे चळवळ क्रियाशील राहते. चळवळीचा हेतू, कार्यक्रम, आंदोलनात्मक पवित्रा यांविषयी निर्णय घेता येतात. खंबीर नेतृत्व असेल तर चळवळ परिणामकारक होते.
- चळवळींच्या संघटना असतात. संघटनांशिवाय चळवळींना सातत्याने प्रश्नांचा पाठपुरावा करता येत नाही. उदा., शेतकऱ्यांच्या चळवळीसाठी शेतकरी संघटना काम करते.
- कोणत्याही चळवळीला जनतेचा पाठिंबा आवश्यक असतो. चळवळ ज्या प्रश्नाभोवती निर्माण झाली आहे तो प्रश्न जनतेला आपला वाटला पाहिजे. त्यासाठी निश्चित कार्यक्रम ठरवून त्याआधारे चळवळी जनमताला आकार देण्याचा प्रयत्न करतात.

**चर्चा करा.**

चळवळी जरी एकाच प्रश्नाचा पाठपुरावा करत असल्या तरी चळवळींमागे एक व्यापक विचारसरणी असते. उदा., बालविवाह अथवा हुंडाबंदी चळवळींचा लोकशाही, महिलांचे सक्षमीकरण, सामाजिक समता अशा मूल्यांवर विश्वास असतो. काही चळवळींचे यथावकाश राजकीय पक्षात रूपांतर होते.

**सांगा पाहू ?**

- भारतातल्या कोणत्या चळवळींमुळे न्यायालयात जनहितार्थ याचिका दाखल होऊन न्यायालयाला त्यावर निर्णय द्यावा लागला ?
- महात्मा फुले, महात्मा गांधी, संत गाडगे महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कोणत्या चळवळी उभ्या केल्या ?

**खालील संवाद वाचा व त्यावर एक परिच्छेद लिहा.**



**चर्चा करा.**

भारतातील भूमिपुत्रांच्या चळवळी कोणत्या मुद्द्यांबाबत आग्रही आहेत ?

**करून पहा.**

अंधश्रद्धा निर्मूलन चळवळ, नद्यांचे प्रदूषण रोखण्यासंबंधी चळवळ, स्त्री भ्रूण हत्येविरोधी चळवळ, 'नॉट इन माय नेम' अशा चळवळींविषयी वर्तमानपत्रांमध्ये येणाऱ्या बातम्यांचे संकलन करा.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

- सार्वजनिक प्रश्न केवळ सामाजिक क्षेत्रातले असतात असे नव्हे, तर ते समाजाच्या कोणत्याही क्षेत्रातून निर्माण होऊ शकतात. समाजसुधारणेसाठी आपल्या देशात आणि विशेषतः महाराष्ट्रात अनेक चळवळी उभ्या राहिल्या व त्यातून समाज आधुनिक होण्यास सुरुवात झाली.
- आपला स्वातंत्र्यासाठीचा लढा हीसुद्धा एक सामाजिक चळवळच होती.
- राजकीय व आर्थिक चळवळींतून नागरिकांच्या हक्कांचे जतन, मताधिकार, किमान वेतन, आर्थिक सुरक्षितता असे प्रश्न हाताळले जातात. स्वदेशी ही एक महत्त्वाची आर्थिक चळवळ आहे.

## भारतातील प्रमुख चळवळी

**आदिवासी चळवळ :** स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिशांनी आदिवासींच्या जंगल संपत्तीवर उदरनिर्वाह करण्याच्या हक्कावर गदा आणली. छोटा नागपूर परिसरातील कोलाम, ओडिशातील गोंड, महाराष्ट्रातील कोळी, भिल्ल, रामोशी, बिहारमधील संथाळ, मुंडा आदिवासींनी मोठ्या प्रमाणात उठाव केला. तेव्हापासून आदिवासींचा संघर्ष चालू आहे. भारतातील आदिवासींचे अनेक प्रश्न आहेत. त्यांतील प्रमुख प्रश्न म्हणजे त्यांचा वनावरील अधिकार नाकारला जातो. आदिवासी चळवळीची प्रमुख मागणी म्हणजे आदिवासींचे वनावरील अधिकार मान्य करावेत, वनातील उत्पादने गोळा करण्याचा आणि वनजमिनीवर लागवड करण्याचा अधिकार त्यांना मिळावा.



बिरसा मुंडा

**भारतातील शेतकरी चळवळ :** भारतातील शेतकरी चळवळ ही एक अत्यंत महत्त्वाची चळवळ आहे. ब्रिटिशांच्या राजवटीत वासाहतिक काळातील सरकारच्या शेतीविरोधी धोरणामुळे शेतकरी संघटित होऊ लागले. बारडोली, चंपारण्य, खोतीचा प्रश्न या शेतकऱ्यांच्या चळवळीविषयी तुम्हांला माहीत असेलच. शेतकरी चळवळींच्या प्रेरणा महात्मा फुले, न्यायमूर्ती रानडे आणि महात्मा गांधी यांच्या विचारांमधून घेतल्या जातात.

शेतीविषयक काही सुधारणांमुळे (उदा. कूळकायदा, कसेल त्याची जमीन इत्यादी.) शेतकरी चळवळ संथ राहिली. हरितक्रांतीनंतर मात्र शेतकरी चळवळ अधिक क्रियाशील आणि परिणामकारक होऊ लागली. शेतीचे उत्पादन वाढवण्यासाठी आणि अन्नधान्याबाबत स्वयंपूर्ण होण्यासाठी हरितक्रांती करण्यात आली, परंतु त्याचा गरीब शेतकऱ्यांना फायदा झाला नाही. शेतकऱ्यांमध्ये गरीब आणि श्रीमंत असे वर्ग निर्माण झाले. त्यांच्यातील असंतोष वाढला व शेतकऱ्यांच्या आंदोलनाला सुरुवात झाली.

शेतमालाला योग्य भाव मिळावा, शेतीला उद्योगाचा दर्जा मिळावा, स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशी स्वीकाराव्यात, कर्जमाफी, कर्जमुक्ती आणि राष्ट्रीय शेतीविषयक धोरण या शेतकरी संघटनांच्या प्रमुख मागण्या आहेत.

शेतकरी संघटना, भारतीय किसान युनियन, ऑल इंडिया किसान सभा या भारतातील काही महत्त्वाच्या शेतकऱ्यांच्या संघटना आहेत.



**करून पहा.**

शेतकऱ्यांच्या व शेतमजुरांच्या कल्याणासाठी शासनाने कोणत्या योजना राबवल्या आहेत ?

**कामगार चळवळ :** भारतातल्या कामगार चळवळीला औद्योगिकीकरणाची पार्श्वभूमी आहे. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात भारतात कापड गिरण्या, रेल्वे कंपन्या यांसारख्या उद्योगांची सुरुवात झाली होती. १८९९ मध्ये रेल्वेच्या कामगारांनी आपल्या मागण्यांसाठी संप केला. कामगारांचे प्रश्न सोडवण्यासाठी व्यापक संघटना मात्र १९२० मध्ये स्थापन झाली. ती 'ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस' म्हणून उल्लेखली जाते.

स्वातंत्र्योत्तर काळात कामगार चळवळ अधिक प्रभावीपणे काम करू लागली. १९६० आणि ७० च्या दशकात कामगार चळवळीची अनेक आंदोलने झाली. परंतु १९८० पासून कामगार चळवळ विखुरली गेली. भारतभर कामगारांचे प्रश्न नव्याने उभे राहत आहेत. कारण जागतिकीकरणाचा परिणाम कामगार चळवळीवर झाला. अस्थिर रोजगार, कंत्राटी कामगार, आर्थिक असुरक्षितता, कामगार कायद्यांचे संरक्षण नसणे, अमर्याद कामाचे तास, कामाच्या ठिकाणी असणारी असुरक्षितता, अनारोग्य इत्यादी आजच्या कामगार चळवळीपुढील समस्या आहेत.

भारतातल्या कामगार चळवळीला औद्योगिकीकरणाची पार्श्वभूमी आहे. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात भारतात कापड गिरण्या, रेल्वे कंपन्या यांसारख्या उद्योगांची सुरुवात झाली होती.

**स्त्री चळवळ :** स्वातंत्र्यपूर्व काळात भारतात स्त्री चळवळीची सुरुवात पुरोगामी पुरुषांच्या पुढाकाराने झाली. स्त्रियांवर होणारा अन्याय, त्यांचे शोषण थांबून त्यांना सन्मानाने जगता यावे व सार्वजनिक जीवनात सहभाग घेता यावा यासाठी अनेक सुधारणा चळवळी सुरू झाल्या. ईश्वरचंद्र विद्यासागर, राजा राममोहन रॉय, महात्मा जोतीराव फुले, सावित्रीबाई फुले, महर्षी धोंडो केशव कर्वे, पंडिता रमाबाई, रमाबाई रानडे यांच्या पुढाकारामुळे सतीच्या प्रथेला विरोध, विधवा पुनर्विवाह, स्त्री शिक्षण, बालविवाहास विरोध, स्त्रियांना मतदानाचा अधिकार यांसारख्या सुधारणा होऊ शकल्या. स्वातंत्र्यानंतर भारताच्या संविधानात स्त्रियांना सर्वच बाबतीत समान हक्क देण्यात आले आहेत. परंतु अनेक क्षेत्रांत स्त्रियांना प्रत्यक्षात मात्र समान वागणूक दिली जात नव्हती. स्त्री स्वातंत्र्य हे या काळातील स्त्रियांच्या चळवळीचे उद्‌दिष्ट होते. या काळातील स्त्रियांची चळवळ प्रामुख्याने माणूस म्हणून दर्जा मिळावा यासाठी होती. स्त्रियांचे स्वातंत्र्य हाही त्यामागील एक उद्देश होता.



सावित्रीबाई फुले



रमाबाई रानडे

भारतामध्ये भ्रष्टाचार, जातिव्यवस्थेला विरोध, कट्टर धार्मिकतेला विरोध या समस्यांविरोधात आंदोलने सुरू झाली. या आंदोलनांमध्ये स्त्रिया मोठ्या प्रमाणावर सहभागी झाल्या होत्या. त्यांतून स्त्रियांना आपल्यावर होणाऱ्या अन्यायाची जाणीव

झाली. स्त्रियांच्या पुढाकाराने स्त्रियांची चळवळ सुरू झाली. भारतातील स्त्री चळवळींचे स्वरूप एकसंघ नाही, परंतु स्त्रियांचे आरोग्य, त्यांची सामाजिक सुरक्षितता, त्यांचे आर्थिक स्वावलंबन आणि सक्षमीकरण या मुद्द्यांचा विचार विविध पातळीवर या स्त्री संघटना करताना दिसतात. स्त्रियांचे शिक्षण आणि त्यांना माणूस म्हणून दर्जा व प्रतिष्ठा मिळावी याचा आग्रह हे स्त्री चळवळीसमोरील आजचे आव्हान आहे.

**पर्यावरण चळवळ :** पर्यावरणाचा ऱ्हास ही आजच्या काळातील एक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील गंभीर समस्या आहे हे आपण जाणतोच. पर्यावरणाचा ऱ्हास रोखण्यासाठी आंतरराष्ट्रीय



डॉ.राजेंद्रसिंह राणा

भारताचे जलपुरुष या नावाने ओळखले जाणारे डॉ.राजेंद्रसिंह राणा यांनी राजस्थान येथे मोठी जलक्रांती घडवून आणली आहे. राजस्थानमध्ये हजारो 'जोहड' (नद्यांवरील मातीचे बंधारे) निर्माण करण्याच्या माध्यमातून राजेंद्रसिंह प्रसिद्धीस आले होते. सिंह यांनी राजस्थानच्या वाळवंटात नद्या पुनरुज्जीवित केल्या. त्यांनी 'तरुण भारत संघ' या संघटनेची स्थापना करून शेकडो गावांमध्ये सुमारे अकरा हजार जोहड निर्माण केले. देशभर पदयात्रा काढून जलसंवर्धन, नद्या पुनरुज्जीवित करणे, वनसंवर्धन, वन्यजीवन संवर्धन मोहीम राबवली आहे. गेली ३१ वर्षे त्यांची ही सामाजिक चळवळ सुरू आहे. डॉ.राजेंद्रसिंह राणा हे पाण्याचे नोबेल समजल्या जाणाऱ्या 'स्टॉकहोम वॉटर प्राइझ'चे मानकरी आहेत.



पर्यावरण रक्षण

पातळीवरही अनेक चळवळी सक्रिय आहेत आणि या क्षेत्रात आंतरराष्ट्रीय सहकार्यही खूप मोठ्या प्रमाणावर आहे.

भारतातही पर्यावरणातील विविध विषयांना प्राधान्य देत अनेक चळवळी सक्रिय आहेत. जैवविविधतेचे संरक्षण, पाण्याच्या विविध स्रोतांचे जतन, जंगल आवरण, नद्यांचे प्रदूषण, हरितपट्ट्याचे संरक्षण, रासायनिक द्रव्यांचा वापर व त्यांचे दुष्परिणाम इत्यादी प्रश्न घेऊन चळवळी संघर्ष करत आहेत.

**ग्राहक चळवळ :** १९८६ साली ग्राहक संरक्षण कायदा अस्तित्वात आला. त्यानंतर ग्राहक चळवळीचा उदय झाला. या चळवळीचे उद्दिष्ट व्यापक आहे. समाजातील प्रत्येक घटक हा ग्राहक असतो. अर्थव्यवस्थेतील बदलांमुळे, तसेच समाजव्यवस्था बदलल्यामुळे ग्राहकांवर परिणाम होतो. त्याला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. जसे भेसळ, वस्तूंची वाढवलेली किंमत, वजन-मापातील फसवणूक इत्यादी. अशा प्रकारच्या फसवणुकीपासून ग्राहकांचे संरक्षण करण्यासाठी ग्राहक चळवळ अस्तित्वात आली.

चळवळी नागरिकांचा सार्वजनिक जीवनातील सहभाग वाढवतात. १९८० नंतरच्या चळवळींना 'नवसामाजिक चळवळी' म्हटले जाते. कारण त्यांचे स्वरूप आधीच्या चळवळींपेक्षा वेगळे होते. त्या

अधिक विषयनिष्ठ होऊ लागल्या, म्हणजेच एकेका विषयाभोवती जनआंदोलन उभे करण्याचे प्रयत्न होऊ लागले.

पुढील पाठात आपण लोकशाहीसमोरील आव्हानांचा विचार करणार आहोत.

## स्वाध्याय

**१. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

(१) शेतकरी चळवळीची ...... ही प्रमुख मागणी आहे.

(अ) वनजमिनीवर लागवड करण्याचा अधिकार मिळावा.

(ब) शेतमालाला योग्य भाव मिळावा.

(क) ग्राहकांचे संरक्षण करणे.

(ड) धरणे बांधावीत.

(२) शेतीचे उत्पादन वाढवण्यासाठी आणि अन्नधान्याबाबत स्वयंपूर्ण होण्यासाठी ...... करण्यात आली.

(अ) जलक्रांती (ब) हरितक्रांती

(क) औद्योगिक क्रांती (ड) धवलक्रांती

**२. टीपा लिहा.**

(१) आदिवासी चळवळ

(२) कामगार चळवळ

**३. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) पर्यावरण चळवळीचे कार्य स्पष्ट करा.

(२) भारतातील शेतकरी चळवळीचे स्वरूप स्पष्ट करा.

(३) स्वातंत्र्यपूर्व काळात स्त्री चळवळी कोणत्या सुधारणांसाठी लढत होत्या?

**४. खालील विधाने सकारण स्पष्ट करा.**

(१) लोकशाहीमध्ये चळवळींना फार महत्त्व असते.

(२) चळवळीला खंबीर नेतृत्वाची गरज नसते.

(३) ग्राहक चळवळ अस्तित्वात आली.

### उपक्रम

(१) विविध सामाजिक चळवळींच्या आंदोलनाविषयी वर्तमानपत्रातील बातम्यांचे संकलन करा.

(२) आपल्या परिसरातील सार्वजनिक समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या चळवळींच्या कार्याचा अहवाल लिहा.

(३) भाजी अथवा धान्य विकत घेताना तुमची वजनात फसवणूक झाली तर ग्राहक संरक्षण कायद्यांतर्गत तुम्ही कशी तक्रार कराल, याचा नमुना तयार करा.

2NX2V9

# ५. भारतीय लोकशाहीसमोरील आव्हाने

यापूर्वी म्हटल्याप्रमाणे लोकशाही ही एक सातत्याने चालणारी जिवंत प्रक्रिया आहे. लोकशाहीचा स्वीकार केला म्हणजे लोकशाही अस्तित्वात आली असे होत नाही. त्यामुळे लोकशाही टिकवण्यासाठी दक्ष राहावे लागते, जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतात. लोकशाहीला असणारे धोके वेळीच ओळखून त्यांचे लोकशाहीच्या मार्गानेच निराकरण करणे आवश्यक असते. प्रस्तुत पाठात आपण भारतीय लोकशाहीसमोर कोणती आव्हाने आहेत याचा प्रामुख्याने विचार करणार आहोत. तत्पूर्वी जागतिक पातळीवर लोकशाहीसमोरील आव्हानांचा आपण थोडक्यात विचार करू.

- आज जगातला प्रत्येक देश आपण लोकशाहीवादी असल्याचे म्हणतो. परंतु प्रत्यक्षात मात्र लोकांचे हक्क आणि स्वातंत्र्य अबाधित ठेवणारी आणि जनकल्याणाला प्राधान्य देणारी लोकशाही फारच थोड्या देशांमध्ये आहे. लष्करी राजवटींचा मोठा धोका लोकशाहीसमोर आहे. त्यामुळे जागतिक पातळीवर खऱ्या लोकशाहीचा प्रसार होणे व प्रत्येक देशात तिचा अवलंब हे लोकशाहीसमोरील मोठे आव्हान आहे. लोकशाही प्रसाराचे हे जागतिक पातळीवरील आव्हान आहे.

बिगर लोकशाही व्यवस्थेकडून लोकशाही व्यवस्थेकडे प्रवास करायचा झाल्यास कोणत्या लोकशाही संस्था निर्माण कराव्या लागतील ?

- ज्या देशांमध्ये लोकशाही रुजली आहे असे आपण म्हणतो तेथेही लोकशाहीचा वावर मर्यादितच आहे. भारतासारख्या अन्य देशांमध्येही लोकशाही म्हणजे केवळ मतदान, निवडणुका, शासनव्यवहार, न्यायालय इत्यादींचा बोध होतो. परंतु हे लोकशाहीचे केवळ राजकीय स्वरूप आहे. लोकशाही जर एक जीवनमार्ग व्हायचा असेल तर लोकशाही समाजाच्या विभिन्न क्षेत्रांत पोहचली पाहिजे. सर्व समाज घटकांचे सामीलीकरण, सामाजिक संस्थांना स्वायत्तता, नागरिकांचे सक्षमीकरण, मानवी मूल्यांचे जतन इत्यादी मार्ग त्यासाठी अवलंबावे लागतील. खरी लोकशाही रुजवण्याचे हे कार्य पूर्ण होण्याची गरज आहे.



**सांगा पाहू ?**

लोकशाहीत राजकीय पक्ष निवडणुकीत सामील होऊन सत्तेत प्रवेश करतात, परंतु राजकीय पक्षांच्या अंतर्गत निवडणुका होतात का ? राजकीय पक्षांनी संघटनांतर्गत निवडणुका घेणे आवश्यक असते, परंतु अशा निवडणुका होतात का ?

**मला पडलेले प्रश्न...**

चीनने आर्थिक सुधारणा स्वीकारल्या. जागतिक व्यापार संघटनेचे सदस्यत्वही स्वीकारले. परंतु तिथे एकाच पक्षाचे वर्चस्व कसे असू शकते ? चीन हे लोकशाही राष्ट्र आहे का ?

- लोकशाहीची पाळेमुळे आणखी खोलवर नेणे हे जगातल्या सर्वच लोकशाही राष्ट्रांपुढील मोठे आव्हान आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय, शांतता, विकास आणि मानवतावाद ही मूल्ये समाजाच्या सर्व स्तरांवर नेणे आवश्यक आहे. त्यासाठी आवश्यक व्यापक सहमतीही पुन्हा लोकशाही मार्गानेच निर्माण करता येणे शक्य आहे. लोकशाही खोलवर नेण्यासाठी या सुधारणांची आवश्यकता आहे.

## भारतीय लोकशाहीसमोरील आव्हाने

लोकशाही अधिक अर्थपूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने सत्तेचे विकेंद्रीकरण करणे व महिला आणि दुर्बल घटकांना आरक्षण या उपाययोजना राबवल्या.

परंतु त्यातून नागरिकांच्या हाती खरी सत्ता आली का या प्रश्नाचा विचार करणे आवश्यक आहे.

**जमातवाद व दहशतवाद :** धार्मिक संघर्ष आणि त्यातून निर्माण होणारा दहशतवाद हे भारतीय लोकशाहीसमोरील सर्वांत मोठे आव्हान आहे. समाजात धार्मिक तेढ वाढल्यामुळे सामाजिक स्थैर्य नाहीसे होते. दहशतवादासारख्या घटनांमुळे लोकांचा लोकशाहीतील सहभाग कमी होतो.

**डावे उग्रवादी (नक्षलवादी) :** नक्षलवाद ही भारतातील खूप मोठी समस्या आहे. भूमिहीन शेतकरी, आदिवासी यांच्यावर होणाऱ्या अन्यायाला दूर करण्यासाठी नक्षलवाद सुरू झाला. या नक्षलवादाने आता उग्र रूप धारण केले आहे. पण यातील शेतकरी-आदिवासी यांच्या समस्यांचे महत्त्व कमी होऊन सरकारला हिंसक पद्धतीने विरोध करणे, पोलीसदलांवर हल्ले करणे, यांसारख्या मार्गांचा वापर नक्षलवादी गटांकडून केला जातो.

**भ्रष्टाचार :** भारतामध्ये सार्वजनिक क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचाराची समस्या दिसून येते. राजकीय आणि प्रशासकीय स्तरावरील भ्रष्टाचारामुळे सरकारची कार्यक्षमता कमी होते. सरकारी कामांना लागणारा वेळ, सार्वजनिक सोई व सुविधांची घसरलेली गुणवत्ता, वेगवेगळे आर्थिक घोटाळे यांमुळे एकूण व्यवस्थेबद्दल अविश्वास आणि असमाधानाची भावना लोकांमध्ये निर्माण होते. निवडणूक प्रक्रियेमध्ये होणारा भ्रष्टाचार, बनावट मतदान, मतदारांना लाच देणे, पळवून नेणे यांसारख्या घटनांमुळे लोकांचा लोकशाही प्रक्रियेवरील विश्वास उडू शकतो.

**तुम्हांला काय वाटते ?**

राजकारणातील घराणेशाही ही आपल्या लोकशाहीसमोरील मोठी समस्या आहे. राजकारणात एकाच कुटुंबाची मक्तेदारी निर्माण झाल्याने लोकशाहीचा अवकाश (democratic space) आक्रसतो. सामान्य लोकांना सार्वजनिक क्षेत्रात सहभाग मिळत नाही.

**राजकारणाचे गुन्हेगारीकरण :** राजकीय प्रक्रियेमध्ये गुन्हेगारांचा वाढता सहभाग ही लोकशाही व्यवस्थेसमोरील एक गंभीर समस्या आहे. गुन्हेगारी पार्श्वभूमी, गुन्हेगारी स्वरूपाचे आरोप, भ्रष्टाचाराचे आरोप असलेल्या व्यक्तींना काही वेळा राजकीय पक्षांकडून उमेदवारी दिली जाते. त्यामुळे राजकारणामध्ये पैसा आणि गुंडगिरी यांचे महत्त्व वाढते. निवडणुकीच्या वेळी हिंसाचाराचा वापर होऊ शकतो.

**सामाजिक आव्हाने :** वर उल्लेखलेल्या आव्हानांव्यतिरिक्त लोकशाहीसमोर काही सामाजिक आव्हानेही आहेत. बेरोजगारी, व्यसनाधीनता, दुष्काळ, साधनसंपत्तीचे असमान वितरण, गरीब-श्रीमंत यांच्यातील वाढती दरी, जातीयता इत्यादी सामाजिक प्रश्न सोडवणे आवश्यक आहे.

### भारतीय लोकशाही यशस्वी करण्यासाठी काय करता येईल ?

(१) लोकशाहीत बहुमताला खूप महत्त्व आहे. लोकशाही शासनप्रकारात बहुमत मिळवणारा पक्ष सत्तेवर येतो. संसदेमध्ये सर्व निर्णय बहुमताने घेतले जातात. बहुसंख्य समाजाचे कल्याण हा लोकशाहीचा उद्देश असतो. बहुमताला महत्त्व देताना अल्पमतात असणारे आणि अल्पसंख्य असणारे यांच्यावर अन्याय होण्याची शक्यता असते. लोकशाही हे जरी बहुमताने चालणारे सरकार असले तरी अल्पमतात असणाऱ्या लोकांना निर्णयप्रक्रियेत सामावून घेणे, त्यांच्या हितसंबंधांचा विचार करणे हे देखील सरकारचे कर्तव्य आहे. थोडक्यात लोकशाही शासनामध्ये सर्वांच्या मतांना महत्त्व असायला हवे. त्याचप्रमाणे बहुमताचे सरकार हे बहुसंख्य असलेल्या समाजाचे सरकार असू नये. सर्व धार्मिक, वांशिक, भाषिक, जातीय गटांना लोकशाहीमधील निर्णय प्रक्रियेमध्ये सहभागी होण्याची समान संधी मिळायला हवी.

(२) भारतातील न्यायालये राजकीय प्रक्रिया

अधिकाधिक पारदर्शक होण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करताना दिसत आहेत. विशेषकरून राजकारणाचे गुन्हेगारीकरण रोखण्यासाठी गुन्हेगारांना कडक शिक्षा आणि राजकीय प्रक्रियेत सहभागी होण्यास बंदी असे निर्बंध न्यायालयाने घातले आहेत.

(३) भारतातील लोकशाही यशस्वी करण्यासाठी केवळ सरकार, प्रशासन व न्यायालयीन पातळीवर प्रयत्न होणे पुरेसे नाही. यासाठी सामाजिक व वैयक्तिक पातळीवर प्रत्येकानेच जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत. शासकीय आणि प्रशासकीय पातळीवर सर्व शिक्षा अभियान, स्वच्छ भारत अभियान, ग्राम समृद्धी योजना, स्व-मदत गटांची स्थापना, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजना यांसारखे अनेक उपक्रम राबवले जातात. स्त्रियांचे राजकीय प्रतिनिधित्व वाढवण्यासाठी स्थानिक शासन संस्थांमध्ये स्त्रियांसाठी ५०% जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत.




(४) भारतातील लोकशाही यशस्वी व्हायला हवी असेल तर सर्वच पातळ्यांवर नागरिकांचा सहभाग वाढला पाहिजे. विशेषतः शासनव्यवहारांच्या पातळीवर तो वाढल्यास सार्वजनिक धोरणांचे स्वरूप बदलेल. संवादांतून त्यांची निर्मिती होईल. सत्तेवर न येऊ शकलेल्यांबरोबरही देवाण-घेवाण असणे लोकशाहीच्या यशासाठी आवश्यक आहे.

समता, स्वातंत्र्य, सामाजिक न्याय, धर्मनिरपेक्षता आपल्या वैयक्तिक जीवनातही या मूल्यांचा आदर व जोपासना करायला हवी. आपण देशाचे एक जबाबदार नागरिक आहोत, ही जाणीव प्रत्येकाने ठेवली तरच लोकशाही यशस्वी होईल.



## स्वाध्याय

2P6XHH

**१. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

(१) लोकशाहीमध्ये ......... निवडणुकीत सामील होऊन सत्तेत प्रवेश करतात.
(अ) राजकीय पक्ष (ब) न्यायालये
(क) सामाजिक संस्था (ड) वरीलपैकी नाही.

(२) जगातील सर्वच लोकशाही राष्ट्रांपुढील मोठे आव्हान म्हणजे ........... .
(अ) धार्मिक संघर्ष
(ब) नक्षलवादी कारवाया
(क) लोकशाहीची पाळेमुळे आणखी खोलवर नेणे.
(ड) गुंडगिरीला महत्त्व

**२. पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा.**

(१) लोकशाही टिकवण्यासाठी दक्ष राहावे लागते.
(२) डाव्या उग्रवादी चळवळीत आज शेतकरी व आदिवासी यांच्या समस्यांचे महत्त्व वाढत आहे.
(३) निवडणुकीतील भ्रष्टाचारामुळे लोकांचा लोकशाही प्रक्रियेवरचा विश्वास उडू शकतो.

**३. टीपा लिहा.**

(१) डावे उग्रवादी
(२) भ्रष्टाचार

**४. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) भारतात लोकशाहीच्या यशासाठी कोणत्या बाबी आवश्यक आहेत ?
(२) राजकारणाचे गुन्हेगारीकरण झाल्यामुळे कोणते परिणाम होतात ?
(३) राजकीय प्रक्रिया पारदर्शक होण्यासाठी कोणते प्रयत्न केले जातात ?

**उपक्रम**

(१) भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी तुम्ही कोणत्या उपाययोजना सुचवाल याची यादी करा.
(२) 'भारतातील दहशतवाद' या समस्येवर वर्गात गटचर्चेचे आयोजन करा.
(३) 'व्यसनमुक्ती' या विषयावर पथनाट्य सादर करा.

## राज्यशास्त्राच्या अभ्यासाने....

भारतातील प्रत्येक नागरिक, मग तो गावात, तालुक्याच्या ठिकाणी अथवा शहरात राहणारा असो, दररोज अनेक नागरी आणि राजकीय प्रश्नांशी सातत्याने जोडलेला असतो. रहिवासाचा दाखला, जातीचा दाखला, आधारकार्ड यांसाठी कोणाला भेटावे ? पाणी, सार्वजनिक स्वच्छतेविषयी कोठे तक्रार करावी ? घरासंबंधी कागदपत्रे कोठून मिळवावीत ? सार्वजनिक सुविधा मिळवण्यासाठी काय करावे ? यांसारख्या अनेक बाबींविषयीची माहिती नागरिकशास्त्र आणि राज्यशास्त्राच्या अभ्यासातून मिळते. देशाचा नागरिक म्हणून आपल्याला असलेल्या हक्क-कर्तव्यांची जाणीव या अभ्यासातून होते. भारतात आणि भारताबाहेर तुम्हांला प्रवास करायचा असेल तर नागरिक म्हणून आवश्यक जाणीवा या विषयाच्या अभ्यासातून निर्माण होतात..

शाळा संपवून तुम्ही जेव्हा भविष्याविषयी नियोजन कराल तेव्हाही तुम्हांला राज्यशास्त्र विषयाची मदत होणार आहे. केंद्रीय लोकसेवा आयोग, महाराष्ट्र लोकसेवा आयोग आणि बँकांमधील भरतीसाठी असणाऱ्या परीक्षांच्या अभ्यासक्रमात भारतीय शासन आणि राजकारण या विषयाचा समावेश असतो. तुम्ही व्यवसायाच्या संधीसाठी कोणतेही क्षेत्र निवडा, राज्यशास्त्र हा त्याचा पाया आहे. त्याचप्रमाणे आंतरराष्ट्रीय राजकारण, लोक प्रशासन, शांतता व संघर्ष या विषयाचा अभ्यास राज्यशास्त्राशिवाय होऊ शकत नाही. या अभ्यास विषयांमध्ये रोजगाराच्या आता अनेक संधी उपलब्ध आहेत. त्या केवळ अध्यापन आणि संशोधन याच क्षेत्रांत नाहीत तर माहिती तंत्रज्ञान, धोरण विश्लेषण, राजकीय नेत्यांच्या सल्लागार संघटना यांतही उपलब्ध आहेत.

जागतिकीकरणाने राज्यशास्त्राचा व्यावहारिक उपयोग करता येईल अशा अनेक संधी निर्माण झाल्या आहेत. शासन आणि राजकारण जाणणाऱ्या संशोधक आणि मध्यस्थ व्यक्तींची आज राजकीय पक्ष, दबाव गट, बिगर शासकीय संघटना, स्वयंसेवी संघटना यांना गरज आहे. राजकीय प्रक्रिया आणि नोकरशाहीची गुंतागुंत समजणाऱ्या व विश्लेषणात्मक कौशल्य असणाऱ्या व्यक्तींची सर्वत्र गरज आहे.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

इतिहास व राज्यशास्त्र इ. १० वी (मराठी माध्यम) ₹ ५६.००











स्वच्छ भारत

एक कदम स्वच्छता की ओर